मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

जुलै ऑगस्ट '८५



अनुक्रमणिका

युगवाणी

वर्ष एकेचाळीसावे | अंक ७/८ | जुलै / ऑगस्ट '८५

अनुक्रम

• संपादक : प्रकाश देशपांडे कार्यकारी संपादक : केशव जोशी

• संपादक मंडळ : भा. ल. भोळे, इंदुमती शेवडे, अ. द. वेलणकर, पंकज चांदे, अक्षयकुमार काळे

• विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या युगवाणीस महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त झाले आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२

सर्जनशीलता

म. वा. कुंडले

कलावंतांच्या विविध प्रकारच्या कलाकृतींचा आपण रसिक वृत्तीने आस्वाद घेत असतो. त्याच बरोबर कलावंतांना या सुंदर कलाकृती कशा निर्माण करता येतात याचेही आश्चर्य वाटत असते. लेखक, कवी, चित्रकार, शिल्पकार हे ज्या शक्तीच्या सहाय्याने कलाकृती निर्माण करतात ती शक्ती कोणती, तिचे स्वरूप कसे असते, तिची प्रक्रिया कशी चालते असेही प्रश्न अनेक जिज्ञासू मनात निर्माण होत असतात. सर्वसामान्यपणे या शक्तीला आपण 'प्रतिभा' असे संबोधतो. प्रतिभा ही निसर्गप्राप्त शक्ती आहे, ते 'ईश्वराचे देणे' आहे व ही प्रतिभा फारच थोड्या लोकांच्या अंगी असते असाही प्रचलित समज आहे. प्रतिभा ही 'नव-नवोन्मेषशालिनी' असते, ती अद्वितीय कल्पनाशक्ती व रचनाशक्ती आहे असेही तिचे वर्णन केले जाते. प्राचीन काव्यशास्त्रावरील ग्रंथात प्रतिभेची वैशिष्ट्येही स्पष्ट करण्याचा प्रयत्न काही मीमांसकांनी केला आहे. त्यावरून प्रतिभा ही एक गूढ व अनाकलनीय शक्ती आहे, तिचे विश्लेषण अतिशय अवघड आहे, त्या भानगडीत पडण्यापेक्षा कलाकृतींचा रसास्वाद घेण्यात समाधान मानावे असे बहुतेकांना वाटल्यास नवल नाही. तसेच कलावंत, प्रतिभावंत ही आपल्यासारखी सामान्य माणसे नव्हत असाही गैरसमज रसिकांच्या मनात निर्माण झाल्यास आश्चर्य वाटावयास नको. केशवसुतादि कवींनी 'आम्ही कोण'सारख्या कवितांमध्ये आपल्या काव्यशक्तीचे जे वर्णन केले आहे तेही या गैरसमजाला दृढमूल करते.

परंतु आजच्या विज्ञान युगात अनेक समस्यांवरील गूढतेचे आवरण दूर होऊन त्यांचे यथार्थ स्वरूप प्रगट होऊ लागले आहे. प्रतिभेच्या बाबतीतही हेच झाले आहे व होत आहे. हल्ली प्रतिभेसाठी सर्जनशीलता ही संज्ञा सर्वत्र रूढ झाली आहे. प्रतिभाशाली कलावंतांना सर्जनशील कलावंत म्हणतात. गेल्या काही वर्षात पाश्चात्य देशातील मानसशास्त्रज्ञांनी या सर्जनशील शक्तीचा शोध घेण्याचा बराच प्रयत्न केला. अनेक प्रकारचे प्रयोग व संशोधन करून तिचे स्वरूप व कार्य यावर बराच प्रकाश टाकला आहे. मानसशास्त्रज्ञांनी सर्जनशीलतेची जी संकल्पना मांडली आहे तिचा या लेखात थोडक्यात परिचय करून देत आहे.

बुद्धी व सर्जनशीलता

सर्जनशीलतेचा शोध घेऊन तिचे स्वरूप स्पष्ट करण्याचे श्रेय पाश्चात्य मानसशास्त्रज्ञ गिल्फर्ड याला द्यावे लागते. तत्पूर्वी अनेक मानसशास्त्रज्ञांनी बुद्धी या मानवी शक्तीसंबंधी भरपूर संशोधन करून तिच्या विविध अंगोपांगांचे स्पष्टीकरण केले होते. बराच काळपर्यंत बुद्धी हीच मानवाला लाभलेली सर्वश्रेष्ठ शक्ती मानली जात होती. मानवाने आजवर जी प्रचंड प्रगती करून घेतली आहे ती बुद्धीच्याच बळावर असा सर्वांचा विश्वास असल्यामुळे बुद्धीला विलक्षण प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. बुद्धीचे मापन करण्यासाठी बुद्धिमापन कसोट्या तयार करण्यात आल्या होत्या, व ज्याचा बुद्ध्यंक अधिक तोच अधिक हुशार, त्याच्याच अंगी सर्व क्षेत्रात प्रगती करण्याची योग्यता असे समीकरणच बनून गेले होते. शिक्षणक्षेत्रातही बौद्धिक विकास हेच प्रमुख उद्दिष्ट बनले होते.

परंतु हळूहळू बुद्धीच्या मर्यादाही शास्त्रज्ञांच्या

अनुक्रमणिका

लक्षात येऊ लागल्या. तीव्र बुद्धिमता असलेल्या व्यक्तींही अनेक क्षेत्रात असफल झाल्याची तर प्रखर बुद्धीची देण न लाभलेल्या व्यक्तींनी विविध क्षेत्रात असामान्य कर्तृत्व गाजविल्याची उदाहरणे त्यांना आव्हान देऊ लागली. अनेक शास्त्रज्ञ, कलावंत, संशोधक बुद्धिवान व पंडित नव्हते हे त्यांच्या चरित्रातच नमूद केले गेले आहे. तरी त्यांनी नव-नवीन शोध कसे लावले, असामान्य कलाकृती कशा निर्माण केल्या, अभिनव सिद्धांत व उपपत्ती सादर करून वैचारिक क्षेत्रात कशी मौलिक भर घातली हे प्रश्न त्यांच्यासमोर उभे ठाकले. या प्रश्नांची उत्तरे शोधताना त्यांना जाणीव झाली की बुद्धी हीच मानवाला प्राप्त झालेली एकमेव शक्ती नव्हे. तर बुद्धीबरोबर, बुद्धीला समतुल्य किंबहुना श्रेष्ठ अशी वेगळी शक्ती माणसाच्या अंगी असली पाहिजे. ही शक्ती कोणती असावी यांचा शोध सुरू झाला. बुद्धीमध्ये नसलेले कोणते गुणधर्म या शक्तीत आहे, ती बुद्धीपेक्षा वेगळी कशी आहे, तिची वैशिष्ट्ये कोणती याचा अभ्यास होऊ लागला व यातूनच सर्जनशीलतेची संकल्पना जन्माला आली.

गिल्फर्डच्या मते बुद्धी ही एका विशिष्ट दिशेनेच, विशिष्ट पद्धतीनेच व ठराविक चाकोरीतून विचार करणारी शक्ती होय. गिल्फर्डने तिचे वर्णन 'Convergent thinking' या शब्दात केले. एकदिश, एकमार्गी, एकसूरी विचारशक्ती किंवा वैज्ञानिक परिभाषेत आपण तिला अभिसारी विचारप्रक्रिया म्हणू या. या विचारप्रक्रियेच्या सहाय्याने व्यक्ती अनेक ग्रंथांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करू शकते, कोणत्याही विषयात प्रावीण्य संपादन करू शकते, विद्वान व पंडित बनू शकते.

परंतु अशी ही बुद्धी मानसिक शक्तीचे एक परिमाण होय ! तिचे दुसरे परिमाण म्हणजे गिल्फर्डच्याच शब्दात–'Divergent thinking' विविध प्रकारे विचार करणे, विचारांच्या नवनवीन वाटा चोखाळणे, नवनवीन उन्मेष प्रगट करणे. ही बहुदिश, अनेकमार्गी, अपसारी विचारप्रक्रिया.

Convergent thinking ही बंदिस्त विचार प्रक्रिया तर divergent thinking ही विमुक्त व स्वतंत्र विचार प्रक्रिया ! पहिली परंपरेच्या चाकोरीत फिरणारी तर दुसरी परंपरेची कास सोडून स्वैर विहार करणारी ! पहिलेचे कार्य केवळ पूर्वसूरींच्या सिद्धांतांचे अर्थस्पष्टीकरण करणे, अन्वयार्थ लावणे, तर दुसरीचे नवनिर्मिती करणे !

ही divergent thinking ची शक्ती म्हणजेच सर्जनशीलता ! तत्त्वज्ञान, विज्ञान, साहित्य, संगीत, अन्य कला, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्य-शास्त्र इत्यादि सर्व क्षेत्रात नवनवीन सिद्धांत, नव-नवीन शोध, नवनवीन उपपत्ती व नवनवीन विचारप्रवाह व नवनवीन पद्धतीची निर्मिती ही बुद्धीची नसून सर्जनशीलतेचीच फलप्राप्ती होय ! सर्जनशील निर्मिती ही केवळ कलेच्याच क्षेत्रात होते असे मानण्याचे कारण नाही. कोणत्याही क्षेत्रात पूर्वप्रचलित व पारंपारिक विचारांच्या व कल्पनांच्या आवर्तांच्या बाहेर पडून जेव्हा एखादी व्यक्ती वेगळ्या विचारसरणीचा पुरस्कार करते तेव्हा तिला सर्जनशील विचारवंत म्हणावे. धर्माच्या क्षेत्रात देखील सर्जनशीलता वास करू शकते. 'स्त्रियोवैश्यास्तदाशूद्रास्तेपि यांति परागतिम्' अशी घोषणा करणारा श्रीकृष्ण हा सर्जनशील विचारवंतच होय. 'मराठीचिये नगरी। अध्यात्मविद्येचा सुकाळू' करण्याचा नवा पायंडा पाडणारा ज्ञानेश्वर हा सर्जनशीलच ! गांधीजींचा अहिंसात्मक सत्याग्रह ही त्यांनी राजकारणाला दिलेली सर्जनशील देणच ! एकूण कोणतीही अभिनव, क्रांतिकारी विचारसरणी, प्रयोग किंवा पद्धती ही सर्जनशीलतेचीच अभिव्यक्ती होय !

गिल्फर्डने सर्जनशीलतेचे मर्मच प्रगट केले आहे. परंतु त्याच्या खालोखाल सर्जनशीलतेच्या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या टॉरन्स नावाच्या मानस-शास्त्रज्ञाने सर्जनशीलतेची व्याख्या दिल्यास तिचे स्वरूप स्पष्ट होऊ शकेल.

'Creativity is sometimes constrasted to conformity, and defined as the contribution of original ideas, a different point of view or a new way of looking at the problems...creativity may also be defined as a successful step into the unknown, getting away from the main track, breaking out of the mould, being

open to experience and permitting one thing to lead to another, recombining ideas or seeing relationships among ideas and so on.'

सर्जनशीलतेचे प्रमुख घटक

गिल्फर्ड, टॉरन्स इत्यादि मानसशास्त्रज्ञ सर्जनशीलता ही बुद्धीपासून कशी वेगळी आहे हे दाखवून व तिचे स्थूल वर्णन करूनच थांबले नाहीत. तर सर्जनशीलतेचे सूक्ष्म विश्लेषण करून तिच्यात कोणकोणते घटक अंतर्भूत होतात याचाही शोध घेऊन पुढील घटकांचा निर्देश केला आहे.

१. Fluency : विपुलता किंवा प्रवाहित्व ! कोणत्याही वस्तूच्या, व्यक्तीच्या घटनेच्या, परिस्थितीच्या किंवा विषयाच्या संदर्भात विपुल प्रमाणात किंवा अधिकाधिक कल्पना किंवा विचार सुचण्याची क्षमता ! विनासायास व भराभर कल्पना सुचणे म्हणजेच सहजता व वेग ही वैशिष्टये यात अभिप्रेत आहेत. उदाहरणार्थ— एखाद्या शब्दाला भराभर प्रतिशब्द किंवा तत्सम अर्थ प्रगट करणारे खूप शब्द आठवणे; एखाद्या वस्तूचे वर्णन करण्यासाठी समर्पक विशेषणे वेगाने सुचणे; एखाद्या दृश्याचे वर्णन करण्यासाठी अनेक उपमा किंवा कल्पना सुचणे; एखादी समस्या किंवा अडचण दूर करण्यासाठी विविध उपाय सुचणे, इ.

२. Flexibility : लवचिकता, विविधता वैचित्र्य !

अनेक प्रकारच्या कल्पना सूचूनही त्यात जर सारखेपणा, तोचतोचपणा असेल, त्या कल्पना एकसुरी असतील तर विपुलता असूनही त्यात विविधता किंवा वैचित्र्य हे वैशिष्टच आढळून येणार नाही. कल्पनांची विविधता व वैचित्र्य हा सर्जनशीलतेचा महत्त्वाचा घटक आहे. समजा एखाद्या व्यक्तीने फुलाला लागू पडणारी अनेक विशेषणे सुचविली : लाल, पिवळी, पांढरी, जांभळी, हिरवी, निळी. ही सर्व विशेषणे रंग दर्शविणारी म्हणजे एकाच प्रकारची किंवा जातीची होत. म्हणून त्यात वैचित्र्य नाही. सुगंधी, नाजुक ही दोन्ही विशेषणे वेगळी वैशिष्टचे दर्शवितात. किंवा आणखी पुढे जाऊन हसरी फुले, दुःखी फुले, लाजरी फुले अशी विशेषणे वेगळ्या प्रकारच्या गुणांचा बोध करवितात. यालाच Flexibility म्हणतात. एखादा लेखक आपला आशय स्पष्ट करण्यासाठी वेळोवेळी भिन्न पण खाद्य पदार्थांच्याच उपमा देत असेल तर त्याच्या अंगी वैचित्र्य हा गुण नाही असा निष्कर्ष काढावा लागेल.

३. Originality मौलिकता

सामान्यतः कोणाला सुचणार नाही अशी कल्पना मौलिक ठरेल. नाविन्य, असाधारणता, असामान्यता म्हणजे मौलिकता. ज्या कल्पना कोणालाही सुचू शकतात त्या मौलिक नव्हे. एखाद्या कवीच्या अंगी असामान्य कल्पनाशक्ती आहे असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ त्या कल्पना तत्पूर्वी इतर कोणाला सुचल्या नाही, सुचण्याची शक्यता नाही. या दरूनच आपण त्याला सर्जनशील हे विशेषण बहाल करतो. सांख्यिकीय परिभाषेत बोलावयाचे म्हणजे कल्पनेची Fluency जितकी जास्त तितकी तिची Originality कमी व Fluency जितकी कमी तितकी Originality अधिक ! मौलिकता हे सर्जनशीलतेचे प्रधान व सर्वश्रेष्ठ लक्षण होय !

४. Elaboration स्पष्टीकरण, विस्तार किंवा पूर्ती

एखादी अपूर्ण कल्पना, अर्धवट योजना पूर्ण करणे, तपशील भरणे. समस्यापूर्ती, अर्धवट कविता किंवा कथा पूर्ण करणे, अर्धवट काढलेल्या आकृतीत रंग भरणे, अर्धवट सोडलेला कामाचा आराखडा, आपल्या कल्पनेने पूर्ण करणे, मध्यवर्ती कल्पनेचा विस्तार करणे, एखाद्या काल्पनिक व्यक्तींची स्वभाववैशिष्टचे व त्याच्यावर आलेला प्रसंग यांचा निर्देश करून तदनुसार भूमिका वठवायला लावणे, नाटककाराने नाटचसंहितेत लिहिलेल्या वाक्यांच्या जोडीला त्यातील आशय व भावार्थ परिणामकारकपणे पुढे मांडण्यासाठी मुद्रा व शरीराभिनयाच्या बारकाव्यांची जोड देणे हे सर्व स्पष्टीकरण किंवा विस्तार क्षमतेचीच उदाहरणे होत.

५. Redefinition पुनर्व्याख्या, पुनर्रचना

ठराविकापेक्षा, रूढ चाकोरीपेक्षा वेगळ्या मार्गाची संकल्पना सादर करणे, एखाद्या कडव्याची

वेगळ्या वृत्तान्त रचना करणे, एखाद्या कथेचा शेवट बदलविणे किंवा संपूर्ण पुनर्रचना करणे, एखाद्या विषयाचे वेगळ्या पद्धतीने प्रतिपादन करणे, एखाद्या भूमिकेचा वेगळा अन्वयार्थ लावणे.

६. Sensitivity to Problem : समस्या संवेदन क्षमता

कोणत्याही गोष्टीतील दोष किंवा उणीव चटकन ध्यानात येणे. उदा. साहित्यातील भाषादोष, चित्रातील रंगसंगतीमधील चूक, संगीत ऐकताना चुकलेला स्वर, यंत्रात झालेला बिघाड, एखाद्या आराखड्यात झालेली चूक किंवा राहून गेलेली उणीव, रोग्याच्या विकृतीचे निदान करण्याची क्षमता. अर्थात इथे अशीच उणीव किंवा असाच दोष अभिप्रेत आहे की जो सहजासहजी इतरांच्या लक्षात येणार नाही. केवळ उणीव किंवा दोषाची जाणीवच नव्हे तर त्याच्या निवारणार्थ काय करावे हेही सांगता येण्याची क्षमता या घटकात अंतर्भूत आहे.

अशा प्रकारे सर्जनशीलता या मानसिक शक्तीचे विश्लेषण करून तीत अंतर्भूत असलेल्या घटकांचे स्पष्टीकरण करून तिची गूढता दूर करण्याचा व तिचे यथार्थ स्वरूप प्रगट करण्याचा मानसशास्त्रज्ञांनी प्रयत्न केला आहे.

सर्जनशीलता व प्रतिमा :

या संदर्भात मानसशास्त्रज्ञांनी सर्जनशीलतेची आणखी जी वैशिष्टचे सांगितली आहेत तीही आपण समजून घेऊ या. प्रतिभा ही एक देवदत्त अलौकिक शक्ती मानली गेल्यामुळे प्रतिभा (Genius) व सर्जनशीलता या दोन्ही शक्ती एकच नव्हत असे त्यांचे म्हणणे. प्रतिभेचे वरदान हे अत्यल्प व्यक्तींच्या वाट्याला येते. असे हे भाग्यवंत असामान्य कलावंत, शास्त्रज्ञ व विचारवंत म्हणून गणले जातात. परंतु सर्जनशीलतेच्या बाबतीत असे नाही. सर्जनशीलतेचा लाभ प्रत्येक व्यक्तीला कमी अधिक प्रमाणात झाला असतो जसा प्रत्येक माणूस हा तीव्र बुद्धिवान म्हणजे प्रज्ञावंत नसला तरी त्याला बुद्धी असतेच. त्या अर्थाने प्रत्येक माणूस हा सर्जनशील असतोच! तसेच सर्जनशीलतेचा आविष्कार हा केवळ श्रेष्ठ कलाकृती, अद्वितीय विचारसंपदा अलौकिक संशोधन किंवा असामान्य नवनिर्मिती यांच्या स्वरुपातच होतो असे नव्हे. तर निम्न स्तरावरील लेखन, गायन, चित्र, संशोधन, वस्तुनिर्मिती यांतूनही होऊ शकतो. एवढेच नव्हे तर व्यक्तीच्या दैनंदिन व्यवहारातूनही सर्जनशीलता प्रगट होऊ शकते. उदा. सुंदर पत्रलेखन, घरगुती उद्योगातून निर्मिती, आकर्षक गृहसजावट, नवनवीन खाद्यपदार्थ, विवाह–सणवार–समारंभ यांचे नाविन्यपूर्ण पद्धतीने आयोजन, विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी वापरलेली नवीन पद्धती, त्रासदायक व गुंड विद्यार्थ्यांना हाताळण्याचे कौशल्य, आकर्षक बोलून कोणाहीकडून आपले काम करून घेण्याचे चातुर्य, आपले प्रश्न वा समस्या सोडविण्यासाठी केलेली अभिनव उपाययोजना इत्यादि सर्व सर्जनशीलतेच्याच अभिव्यक्तीचे प्रकार होत. तात्पर्य सर्जनशीलता ही प्रतिभावंतांची मिरासदारी नव्हे· फार तर आपण एवढे म्हणू की प्रतिभा ही अत्युच्च पातळीवरील सर्जनशीलता. परंतु सर्जनशीलता ही केवळ त्या उच्च पातळीवरच वास करते असे नाही. जेथे जेथे divergent thinking चा स्पष्ट प्रत्यय येतो, तेथे तेथे सर्जनशीलताच प्रगट होत असते. व या अर्थाने तुम्ही आम्ही सगळेच काही प्रमाणात तरी सर्जनशील आहोत!

सर्जनशीलतेचे दुसरे वैशिष्टच म्हणजे ती विकासक्षम आहे. प्रोत्साहनाने, योग्य त्या मार्गदर्शनाने व अनुकूल वातावरणातून सर्जनशीलतेचा विकास होऊ शकतो. प्रतिभा ही जन्मजात असली तरी ती फुलविण्यासाठी, विकसित करण्यासाठी मार्गदर्शन व परिश्रम हवेतच. 'Genius is ten precent inspriation and ninety percent perspiration' असे जे लिव्हिंग्स्टन म्हणतो ते तर सर्जनशीलतेला किती तरी अधिक पटीने लागू पडते.

सर्जनशीलतेची उपेक्षा :

मानसशास्त्रज्ञ म्हणतात त्याप्रमाणे प्रत्येक मनुष्यामध्ये सर्जनशीलता असून देखील तिचे दर्शन आपल्याला होत नाही असे कां? हा प्रश्न कोणालाही पडेल. पण याचे कारण सर्जनशीलतेबद्दलचे आपले अज्ञान व आपली अनास्था किंवा उपेक्षा. आज घरी–दारी, शाळा–कॉलेजात, नोकरी–व्यव-

अनुक्रमणिका

सायात सर्वत्र convergent thinking चीच अपेक्षा केली जाते. आईवडिलांची इच्छा मुलांनी आपलेच ऐकावे. आपण म्हणतो तसे वागावे, परंपरागत पद्धतीनेच विचार करावा, आज्ञाधारक बनावे. शाळा–कॉलेजातही ठराविक ज्ञानदान व पोपटपंचीवर अधिक भर! स्वतंत्रपणे विचार करणे, नवीन कल्पना मांडणे, शंकाकुशंका उपस्थित करणे; प्रश्न विचारणे, मतभेद व्यक्त करणे हे ना पालकांना मानवत ना शिक्षकांना सहन होत. 'सांगतो ते मुकाट्याने ऐका', 'आपली अक्कल चालवू नका', 'नसत्या पंचायती करू नका' 'जास्त शहाणपणा दाखवू नका' असा अहेर पदोपदी स्वतंत्र वा मुक्त विचार करणाऱ्या मुलांच्या-विद्यार्थ्यांच्या वाटयाला येतो. नोकरीतही हाताखालच्या कर्मचाऱ्यांनी प्रयोगशीलता किंवा कल्पकता दाखविणे वरिष्ठ अधिकाऱ्यांना खपत नाही. प्रत्येक कर्मचारी हा 'most obedient servant' बनावा ही प्रत्येक अधिकाऱ्याची अपेक्षा! राजकारण किंवा समाजकारणातही स्वतंत्र विचार मांडणारा बंडखोर ठरतो, त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई होते. लोकशाही नुसती नावालाच, बाकी प्रत्यक्षात सर्वत्र हुकुमशाही! परंपरेचे पाईक होण्यातच धन्यता मानणाऱ्या समाजात पारंपारिक पद्धतीने विचार करणाऱ्यांचेच कौतुक होणार, प्रशंसा होणार, तेच फायद्यात राहणार! अशा प्रतिकूल परिस्थितीत ज्यांच्या अंगी सर्जनशीलतेची तीव्र उर्मी असेल तेच स्वतंत्र divergent पद्धतीने विचार करण्याचे धाडस करतात. उलट बहुसंख्य लोकांना आपली सर्जनशीलता दडपूनच टाकावी लागेल. सर्वसाधारण व्यक्तिमात्राच्या वर्तनातून सर्जनशीलतेचा प्रत्यय न येण्याचे हे महत्त्वाचे कारण होय!

सर्जनशीलतेचे मापन :

विशिष्ट क्षेत्रात ज्या ज्या व्यक्तीच्या हातून सर्जनशील निर्मिती झाल्यावर ती व्यक्ती सर्जनशील आहे हे सिद्धच होते. तसेच त्या निर्मितीचे मूल्यमापन करून तिच्या सर्जनशीलतेचा स्तर किंवा तिची गुणवत्ताही ठरविता येते. परंतु कोणाच्या अंगी सर्जनशीलता आहे याचा शोध आपण आगाऊच कसा घेणार? तर त्यासाठी मानसशास्त्रज्ञांनी सर्जनशीलता मापन कसोटयाही तयार केल्या आहेत. सर्जनशीलतेच्या ज्या घटकांचा निर्देश केला आहे त्यावर आधारित विविध प्रकारचे प्रश्न या कसोटयांमध्ये विचारले जातात. काही प्रश्नांचे नमुने पुढे देत आहे.

१. दिलेल्या शब्दाला समानार्थी किंवा तत्सम छटा व्यक्त करणारे जितके अधिक शब्द देता येतील तितके द्या.

२. अ, नि, दु हे उपसर्ग लागून तयार होणारे अधिकाधिक शब्द लिहा.

३. 'शील' हा प्रत्यय लागून शेवट होणारे अधिकाधिक शब्द लिहा.

४. व, द, स, र या आद्याक्षरांनी सुरू होणाऱ्या चार शब्दांची वाक्ये लिहा.

वरील प्रश्नांतून प्रामुख्याने शब्दप्रवाहित्व किंवा शब्दनिर्मिती कौशल्य तपासणे हा उद्देश असतो.

५. पांढऱ्या रंगांच्या व घनस्वरूप खाद्यपदार्थांची अधिकाधिक नांवे लिहा.

६. दिलेल्या कथेला किंवा कवितेला शीर्षक द्या.

७. व्यंगचित्रावर तदर्थक विनोदी वाक्य लिहा.

८. दिलेल्या चित्रातील किंवा आकृतीतील दोष ओळखा.

९. दिलेल्या टिंबांना जोडून आकृती पूर्ण करा.

१०. कथापूर्ती करा किंवा दिलेल्या माहितीच्या आधारे पंधरा वाक्यांची कथा तयार करा.

११. काव्यपूर्ती करा किंवा दिलेल्या विषयावर दहा ओळींची कविता तयार करा.

१२. समानार्थी म्हणी तयार करा.

१३. दगड, वर्तमानपत्र, काठी अशा एखाद्या वस्तूचे अपरिचित (unusual) असे जास्तीत जास्त उपयोग सांगा.

१४. समजा उद्यापासून सूर्याने रजा घेतली तर काय काय होईल ?

१५. समजा माणसाच्या पायाला चाके लावली तर त्याचे काय परिणाम होतील ?

अशा प्रकारचे अनेक प्रश्न विचारता येतात. उत्तरे देण्यास वेळेचीही मर्यादा असते. येथे केवळ नमून्यादाखल व सहज समजू शकतील अशा काही प्रश्नांची उदाहरणे दिली आहे. प्रात्यक्षिक कृती-

अनुक्रमणिका

स्वरूपाच्याही काही कसोटया आहेत. प्रत्येक प्रश्न विचारताना त्याचा उद्देश, त्यातून नेमकी कोणती क्षमता तपासली जाणार हे स्पष्ट केले असते. तसेच आलेल्या उत्तरांचे मूल्यमापन कसे करायचे, प्रवाहित्व, वैचित्र्य, मौलिकता इत्यादि घटकांची गुणवत्ता कशी ठरवायची याच्याही सूचना दिल्या असतात. त्यानुसार मूल्यांकन करून गुण निर्धारित केले जातात, व त्यावरून सर्जनशीलतेची श्रेणी ठरविली जाते. या कसोटया व त्यांचे मूल्यांकन या सर्व प्रक्रियांचे सविस्तर स्पष्टीकरण एकाच लेखाच्या मर्यादेत देणे शक्य नाही व त्याची गरजही नाही. या सर्व बाबींची फक्त तोंडओळख करून देणे एवढेच या लेखाचे प्रयोजन आहे.

आज तरी या कसोटयांचा वापर विद्यार्थ्यांवरच अधिक प्रमाणात करण्यात येत असून त्यातून त्यांच्या सर्जनशीलतेचा शोध घेण्याचा प्रयत्न होत आहे.

वाङ्मयीन सर्जनशीलता :

सर्जनशीलता ही सर्वसामान्य शक्ती असली व एखाद्या व्यक्तीच्या अंगी ती विशेष प्रमाणात असली तरी सर्व क्षेत्रात तिचा सारख्याच प्रमाणात आविष्कार होईल असे नाही. एखादा श्रेष्ठ कवी चित्रकार होऊ शकेलच असे नाही. किंवा वैज्ञानिक संशोधकाला उत्तम कविता करता यावी अशी अपेक्षाही कोणी करणार नाही. यावरून सर्जनशीलतेचे प्रकार असतात काय, कलापरत्वे सर्जनशीलतेचे स्वरूप, तिची जात वेगवेगळी असते काय असेही प्रश्न उपस्थित होतात. या संबंधी संशोधन सुरू आहे. प्रत्येक क्षेत्रातील सर्जनशीलतेची काही व्यवच्छेदक वैशिष्टये असणे स्वाभाविकच आहे. मूळ शक्ती किंवा घटक हे सर्वसामान्य असले तरी अभिव्यक्तीची माध्यमे वेगवेगळी असल्यामुळे तदनुसार काही फरक पडणारच ! सर्जनशील लेखकाला शब्दप्रभुत्वाची गरज असली तरी चित्रकाराला त्याची गरज नाही. तसेच कवी होण्यासाठी भावनाशीलतेची आवश्यकता असली तरी वैज्ञानिक संशोधनासाठी किंवा अभिनव यंत्र निर्मितीसाठी त्याची गरज नाही. परंतु प्रत्येक क्षेत्रातील सर्जनशीलतेची वैशिष्टये व त्यांचा शोध घेण्यासाठी अधिकृत कसोटया अजून तयार झाल्या नाहीत. आपल्या देशात वैज्ञानिक सर्जनशीलतेवर काही संशोधन झाले. वाङ्मयीन सर्जनशीलतेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न पूर्वसंशोधनात आढळून येत नाही. म्हणून पीएच्. डी. च्या संशोधनाच्या निमित्ताने हे कार्य मी सर्वप्रथम हाती घेतले व मराठीच्या संदर्भातच वाङ्मयीन सर्जनशीलतेचा अभ्यास हाती घेतल्यामुळे त्याचा थोडक्यात परिचय करून देत आहे. हे शास्त्रशुद्ध संशोधन असल्यामुळे संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन पद्धती व त्यातून निघणारे निष्कर्ष या क्रमाने हा परिचय करून देत आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट :

प्रस्तुत संशोधन दोन उद्दिष्टे समोर ठेवून करण्यात आले–

१. वाङ्मयीन सर्जनशीलतेचा शोध घेणारी– कोणकोणत्या विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मयीन सर्जनशीलता वास करते–कोणते विद्यार्थी भावी काळात सर्जनशील लेखक होण्याची शक्यता आहे याचा शोध घेणारी सर्जनशीलता कसोटी तयार करणे.

२. वाङ्मयीन सर्जनशीलतेचे विश्लेषण करून तिच्यातील मूलभूत घटकांचा शोध घेणे.

कसोटी :

कथा, कादंबरी, नाटक, काव्य किंवा कोणत्याही प्रकारची सर्जनशील वाङ्मयनिर्मिती करण्याला आधारभूत असलेले घटक कोणते हे प्रथम ठरविण्यात आले. यासाठी जवळजवळ २५–कवी, कथाकार, नाटककार, कादंबरीकार, लघुनिबंधकार, समीक्षक-अशा साहित्यकारांशी चर्चा करून त्यांची मते व मानसशास्त्रज्ञांनी निर्देशिलेले सर्जनशीलतेचे घटक यांचा समन्वय साधून पुढील घटक निश्चित करण्यात आले.

१. शब्दप्रवाहित्व, शब्दप्रभुत्व
(Verbal Fluency)
२. वाक्य प्रवाहित्व–वाक्य प्रभुत्व
(Sentence Fluency)
३. वर्णनशैली
(Descriptive style)
४. भावनोत्कट लेखन
(Emotional Writing)
५. संवादलेखन
(Dialogue Writing)

६. प्रतिमानिर्मिती
(Imagery)
७. कथापूर्ती
(Story Completion)
८. कथालेखन
(Story Writing)
९. काव्यपूर्ती
(Poetry Completion)
१०. कवितालेखन
(Poetry Writing)

त्यानंतर वरील प्रत्येक घटकावर आधारित प्रश्न तयार करण्यात आले.

शब्दसंपदा कसोटी :

१. दिलेल्या शब्दांना जास्तीत जास्त समानार्थी शब्द लिहा.

२. दिलेले उपसर्ग व प्रत्यय लावून जास्तीत जास्त शब्द तयार करा.

३. दिलेल्या वाक्यात सुयोग्य क्रियापदे लिहा.

४. दिलेल्या विशेष्यांना जास्तीत जास्त विशेषणे द्या.

५. नादसाम्य दर्शविणारे अधिकाधिक शब्द लिहा.

अशा प्रकारचे पुष्कळ प्रश्न विचारण्यात आले.

वाक्यप्रभुत्व :

या कसोटीत १५ स्वतंत्र वाक्ये देण्यात आली व प्रत्येक वाक्य अर्थ कायम ठेवून जितक्या विविध प्रकारे लिहिता येतील तितक्या प्रकारे लिहिण्यास सांगण्यात आले. वेगवेगळया शब्दरचना, म्हणी, वाक्प्रचार, अलंकार, वाक्यरचना इत्यादींचा वापर करून !

वर्णनशैली :

या कसोटीत तीन दृश्ये दिली असून त्यांचे कलापूर्ण सुंदर शैलीत वर्णन करण्यास सांगितले. प्रत्येकी साधारणपणे १० वाक्ये !

भावनोत्कट लेखन :

या कसोटीत पाच भावपूर्ण प्रसंगांचा निर्देश करून प्रत्येक प्रसंगाचे वर्णन भावनोत्कट स्वरूपात करण्यास सांगितले. साधारणपणे प्रत्येकी ५–६ वाक्यात.

संवादलेखन :

* प्रसंगांची थोडी पार्श्वभूमी देऊन त्याला अनुरूप संवाद लिहिण्यास सांगण्यात आले. साधारणपणे १५ वाक्यात.

कथापूर्ती :

अगदी अपरिचित कथा निवडून ४–५ वाक्यात तिचे पूर्वकथन करून ती पूर्ण करण्यास सांगण्यात आले. अशा दोन कथा देण्यात आल्या.

कथालेखन :

प्रसंगाची पार्श्वभूमी, व्यक्ती व त्यांचे स्वभाव-विशेष देऊन त्यावर आधारित कथा रचण्यास सांगण्यात आले अर्थात स्थूल आराखडा !

काव्यपूर्ती :

अपरिचित कवितांच्या विद्यार्थ्यांना समजतील अशा काही ओळी निवडून त्यातील काही महत्त्वपूर्ण शब्द वगळण्यात येऊन त्या देण्यात आल्या काही उदाहरणात एक दोन ओळी वगळण्यात आल्या व या रिकाम्या जागा पूर्ण करण्यास सांगण्यात आले. यात १० प्रश्न दिले.

काव्यलेखन :

दोन सोपेसे विषय देऊन त्यावर ८–१० ओळींची कविता करण्यास सांगण्यात आले.

प्रतिमानिर्मिती :

काही दृश्यांचा किंवा वस्तूंचा निर्देश करून तत्सदृश जितक्या कल्पना किंवा प्रतिमा सुचतील तितक्या लिहिण्यास सांगण्यात आले. यातही १० प्रश्न विचारले.

या कसोट्या जवळजवळ १५०० विद्यार्थ्यांना–१० व्या वर्गातील–देण्यात आल्या व त्यातील ज्यांनी सर्व उत्तरे दिलीत अशा १००० उत्तर, पत्रिकांची निवड केली. प्रवाहित्व, वैचित्र्य-मौलिकता वगैरे घटकांना भारांक देऊन या १००० उत्तर–पत्रिकांचे मूल्यांकन करण्यात आले. म्हणजेच संख्या व गुणवत्ता या दोन्हीही बाबी विचारात घेण्यात आल्या. शब्द, वाक्य, प्रतिमा इत्यादि कसोट्यांमधील उत्तरांचे निकष ठरवून मी स्वतःच, मूल्यांकन केले. वर्णनशैली, भावनोत्कट लेखन व संवादलेखन या कसोट्यांतील उत्तरांचे मूल्यांकन ज्येष्ठ, जाणकार व सर्जनशील शिक्षकां-

अनुक्रमणिका

कडून करून घेतले, कथा व कवितांचे मूल्यांकन नागपुरातीलच नामवंत कथाकार व कवी यांच्याकडून करून घेतले.

त्यानंतर या १००० विद्यार्थ्यांना १० ही कसोट्यावर प्राप्त झालेल्या एकूण गुणांवर मध्यमान (Mean), प्रमापविचलन (Standard Deviation) सहसंबंध (Correlation) व मूलघटक विश्लेषण (Factor Analysis) या सांख्यिकीय प्रक्रियांचा अवलंब करण्यात आला.

निष्कर्ष–

वरील सांख्यिकीय प्रक्रियांचा अवलंब करून दहा आधारभूत घटकांच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वपूर्ण किंवा मूलघटक कोणते याचा शोध घेण्यात आला. या प्रक्रियेतून दोन घटक निष्पन्न झाले. ते म्हणजे–

१. रसात्मक किंवा कलात्मक अभिव्यक्तीसाठी आवश्यक असलेले शब्दप्रभुत्व, व कल्पकता.

२. रचनाकौशल्य, सुंदर व आकर्षक रचनानिर्मिती, घाट, किंवा आकृतीबंध निर्माण करण्याची क्षमता.

सर्जनशील लेखन करण्यासाठी वरील दोन क्षमता अंगी असणे आवश्यक आहे. ज्यांच्या अंगी या दोन क्षमता विशेष प्रमाणात आढळून येतील ते कवि, कथाकार, नाटककार, कादंबरीकार किंवा अन्य प्रकारचे ललित लेखक होण्याची शक्यता आहे किंवा राहील हा माझ्या संशोधनातून निघालेला निष्कर्ष आहे.

अर्थात केवळ सुप्त शक्ती असून भागत नाही. तर या सुप्त शक्ती जागृत होण्यासाठी अनुकूल, प्रेरक व पोषक वातावरण हवे, अभ्यास हवा, प्रयत्न हवेत व मार्गदर्शनही हवे. म्हणून वाङ्मयीन सर्जनशीलतेच्या विकासासाठी जर काही प्रयत्न करायचे असतील, काही योजना आखायच्या असतील तर त्यात उपरिनिर्दिष्ट दोन शक्तींचा विकास घडवून आणण्यावर भर दिला पाहिजे.

उपयुक्तता–

लेखक तयार करण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळातर्फे कृतिसत्रे आयोजित करण्यात येत आहेत, अन्यत्रही प्रयत्न होत आहेत. परंतु हे उपक्रम शास्त्रीय तत्त्वे व पद्धती यावर आधारले नाहीत. अनुभवी लोक आपापल्या अनुभवानुसार, दृष्टिकोनानुसार व व्यक्तिगत पद्धतीने उदयोन्मुख लेखकांना मार्गदर्शन करतात. त्या ऐवजी प्रस्तुत संशोधनातून निघालेल्या निष्कर्षांचा जर या कृतिसत्रात मार्गदर्शनासाठी उपयोग करून घेतला तर या प्रयत्नांमध्ये अधिक शास्त्रीयता येईल. संशोधनासाठी तयार करण्यात आलेल्या कसोट्यांमधील प्रश्न किंवा तत्सम प्रश्न अभ्यासासाठी देण्यात येऊन लेखक होऊ इच्छिणाऱ्यांची प्रारंभिक तयारी करून घेता येईल. सर्जनशीलतेच्या विकासाला योग्य प्रकारचे वळण देता येईल.

सर्जनशीलतेच्या विकासासंबंधीचे हे सिद्धांत केवळ वाङ्मयीन क्षेत्रातच लागू पडतात असे नाही. कोणत्याही कलांच्या क्षेत्रात त्या त्या पद्धतीने त्यांचा वापर होऊ शकतो व प्रत्येक कलाक्षेत्रातील भावी कलावंतांना मार्गदर्शन करण्यासाठी, कलानिर्मितीच्या प्रशिक्षणासाठी व्हावा ही अपेक्षा आहे.

उपरिनिर्दिष्ट प्रयत्नांतून खरोखरच कलावंत निर्माण होऊ शकेल काय असाही प्रश्न अनेकजण उपस्थित करतील. सर्जनशीलतेचे अनेक श्रेष्ठ संशोधकांनी केलेले विश्लेषण व त्याच्या आधारे वाङ्मयीन सर्जनशीलतेचे मी केलेले विश्लेषण हेही काहींना अपुरे व असमाधानकारक वाटेल. यावर उत्तर एवढेच की कलानिर्मितीची प्रक्रियाच इतकी सूक्ष्म व गुंतागुंतीची असते की त्यासंबंधी भौतिक शास्त्रांतील प्रक्रियांप्रमाणे व संकल्पनांप्रमाणे निर्णायक विधाने करता येत नाहीत. सामाजिक व मानवीय शास्त्रांतील संशोधनाच्या या मर्यादा लक्षात घ्यायलाच हव्यात. पण म्हणून या क्षेत्रातील संशोधन अनावश्यक किंवा टाकाऊ ठरू शकत नाही. हेच सर्जनशीलतेसंबंधीच्या संशोधनाला लागू आहे. म्हणूनच याही क्षेत्रातील संशोधनांचे निष्कर्ष मर्यादित स्वरूपात का होईना ग्राह्य मानायला हरकत नाही. तसेच मार्गदर्शनातून कलावंत निर्माण होऊ शकेल हा मुद्दा जरी आपण वादग्रस्त मानला तरी मार्गदर्शनपर प्रयत्न करायला हरकत कसली ? आणि जर असे प्रयत्न आपण करीतच आहोत तर ते शास्त्रशुद्ध स्वरूपात करणे योग्य ठरणार नाही काय ? □□

डॉ. म. वा. कुंडले
जोशीवाडी, सीतावर्डी, नागपूर

वेशीबाहेरची पाने / तीन कथा

बापू यशवंत जाधव

बेवारस

तो कैक वर्षे राहिला. कुठला माहीत नाही. कधी आला ठावं नाही. कोणाचा होता समजलं नाही. गावानं सांभाळला. वाढवला. मोठा झाला. कोण टेकूजी ह्यो ? असं गावानं कधी म्हटलं नाही. आणि गावानं सांगितलंही नाही. आजारी पडल्याचं माहीत नाही. काम अबोल्यानं करीत राहिला. दगदग नाही आणि कामात बदल नाही. कापडात नवंपण नाही. पायात कधीच काही नाही. उघड्या माळावर खोपटात राहिला.

लांब नाक, निळे डोळे. ओठावर फक्त मिशाच. दाढी नव्हती. ती आलीच नाही. पुढल्या दातावर दोन आडवे दात तिरके उभारलेले. हातात चारपदरी काळा दोरा. हातोपं वर सारल्यालं. खोचलेलं धोतर. सपाट पायाला किराळ फुटल्यासारखी वोटं.

माळावरल्या स्टँडवर हमाली करायचा. उरलावेळ शेणासाठी पाटी घेऊन फिरायचा. गावफेरी व्हायची. जागो जागी शेणाची पाटी रिकामी करायचा. सकाळला वरली आळी–सांच्याला खालली आळी. आठवड्याला गाडीभर शेण व्हायचं. गाडीभर जमलं की पाटील–वाड्याला वर्दी द्यायचा. वीस रुपयाला गाडी. रतीब्रच तो.

गावात जैन वस्तीजवळ पाच–सहा उपाध्याची घरं. ते निवदाच्या भाकरी विकत. दहा पैशाला भाकरी. दुपारला तो बस्तीकडं वळायचा. चार भाकरी घ्यायचा, माळावरल्या हॉटेलातली उसळ घ्यायचा. खोपटात भाकरी कुसकरायचा. न चावता गिळायचा. मिशा पुसून चिलीम भरायचा. चिलमितली रांकुंडी वेलटयात ठेवायचा. वलट उशालाच असायचं. घटकाभर कलंडायचा.

दुपारचं उन घेऊन उठायचा. डेऱ्यातलं पाणी घेऊन तोंड धुवायचा. धोतराचा सोगा टावेल करायचा. माळावर हॉटेलात एका साईडला बसायचा. रोज तीच जागा. बदलायचा नाही. न मागता चहा यायचा. चहा प्यायचा. पैसे देऊन बाहेर पडायचा.

त्याचा शेणाचा उकरंडा गराडा रचल्यासारखा. शेणात काडी नाही. खडा नाही, माती नाही. नुस्तं शेण, तेही–पाटलानंच घ्यायचं. उन्हाळा; पावसाळा, शेण आणि स्टँडवर हमाली. तो अधिकृत हमाल नव्हता. लोकही त्याला हमाल म्हणत नसत.

राजा त्याचं नाव. कोण राजेखान म्हणत, कोणी राजोबा तर कोणी राजगोंडा. कोणी त्याला मराठा समजत होते. कोणी "हमारे जमातका" म्हणत; तर काहींनी त्याला लिंगायत मानला. का कोणास ठाऊक त्याला कोणी ब्राह्मण केला नाही आणि हरिजनही केला नाही.

हमाली द्यायला कोणी वांधा काढला तर डोस्कीवरनं सामान खाली टाकायचा. दोन वाकडे दात ओठावर दाबायचा. लाल व्हायचा. दाढी नसलेल्या हुनवटीवर घाम यायचा. थरथर कापायचा. गावातल्यांना हे नवं नव्हतं. ते जुळतं घेत.

"आवंदा पोळचा हायती का ?" असं कोणी विचारलं तर तो दात काढायचा.

"काय धंदा काढायचा हाय व्हय मला." विचार-

अनुक्रमणिका

णारा खजील व्हायचा.कोण-तरी त्याला आई बाप विचारलं होतं. त्यानं एका हाताचा बोट वर केला. दुसरा हात खाली करून बोटानं जमीन दाखवली. हे उत्तर !

नभीलालनं इद आला तेव्हा कपडे केले, त्यानं ते घातले नाहीत. जानू गायकवाडनं दीपावळीत फराळाला घातलं, पण ते खाल्लं नाही. हिरेमठानं मठ लोटून हिथंच राहा म्हणून सांगितलं पण तो राहिला नाही. गावातल्या कोणत्याही बाईला आई-आव्वा, अम्मा म्हणायचा.

दसऱ्याचा दिवस होता तो. सारा गाव सीमेवर आला. राजोबा खोपीतच होता. "राजोबा आज दसरा-पालखी आलीया."

"मी पालखी बघत नाही."

"आपटा लुटायला तरी ये."

"मी आपट्याला शिवत नाही."

हे म्हणत असताना त्याच्या डोळ्याच्या कडा ओल्या झाल्या होत्या. तो खोपटातनं बाहेर आला नाही. मुरगाळून पडून राहिला.

गावात पीर बसले. निवदं झाली. राजाखानला कुणीतरी पुडा बांधून मलिदा दिला. जाणीवपूर्वक बसल्याजागी पुडी ठेवून हॉटेलातनं उठून गेला. सारा गाव तकायाला गेला, राजेखान तिकडं फिरकला नाही. कोणत्याच देवळात त्याला गावानं पाहिला नाही. भंडारा लावताना मान फिरवायचा. उरसाचा प्रसाद खायचं नाही. हे सारं का म्हणून विचारायचं नाही.

आज पीर पाण्यात पडणार. सारा गांव जमला. चौकातनं अबीर, खारका, खोबरं, उधळत पीर स्टॅण्डवर आले. शेणाची पाटी घेऊन राजोबा जात होता. कुणीतरी त्याच्या अंगावर अबीर उधळली. त्यानं रागानं शेणाची पाटी खाली टाकली. दात बाहेर काढून ओठावर जोरात आवळले. थरथर कापायला लागला. आणि थरथरल्या पायानं तो ओढ्यावर गेला. स्वच्छ अंघोळ केली. खोपीत आला आणि अंधारात गप्प झाला.

दीस वर आला होता. खोपटापुढं खताची गाडी उभी होती. पाटलाचे गडी "राजाखान" म्हणून हाक मारत होते. राजाखान ओ देत नव्हता. बराच वेळ हे चाललं होतं. धाडस करून पाटलाचे गडी खोपटात शिरले. खोपटात राजाखाननं एक हात वर करून आकाशाकडे बोट केले होते. दुसरा हात खाली होता. त्या हाताजवळ जमीन उकरलेली होती. पाटलाला वर्दी गेली.

हां-हां म्हणता गावात बातमी गेली, मराठा समाजानं दर्गणी गोळा केली. गाडीभर लाकडं खोपटाजवळ आणाय ऑर्डर दिली. डोकीवर सापडेल ते गुंडाळून माणसं माळावर आली. इबीर गल्लीचे लोक डोलारा घेऊन माळाकडं निघाले. हिरेमठ स्वामीनं समाजाला गोळा करून खोपटाकडं धाडलं.

सारे सारे जमले, "ये हमाराच है"

"आरं टक्कूर फिरलंय कारं, मराठ्याला मुसलमान करायचं दिवस गेलं"

"इल्ला नम्माद ईदा" हिरेमठ स्वामीनं आपला आवाज गर्दीत सोडून दिला. समाज कडाडू लागला. जाती-जमाती भडकू लागल्या. भांडणं लागली. तीन फळ्या झाल्या. आवाज उठू लागला- "पाटील आलं" समाज शांत झाला.

"हे बेवारशी हाय-मी व्यवस्था केलीया तुम्ही फिरा मागं." सारी थंड पडली. गर्दीत पोलीस गाडी आली होती. राजोबाला पोलिसांनी गाडीत झोपवलं. सारे परताय लागले. गाडी तालुक्याच्या गावाला गेली. राजगौंडा बेवारस ठरला.

कैक वर्षं झाली या गोष्टीला; पण माळावर अजून गाडीभर लाकडं ऊन-पाऊस खात पडून आहेत.

आवतन

मारुती धनगराच्या थोरल्या पोराचं लगीन. पुजाऱ्यानं लग्ना आधीच पाच बकऱ्याची दावण तोडायचं कबूल केलं होतं. मांडवाच्या जवळ पालखी आली. "बिरूबाच्या नावानं-च्यांग भलं." ढोल जोरात वाजाय लागले. मांडवासमोर दहा धनगरांनी पाच बकरी धरली, एकानं पुढलं दोन पाय-एकानं मागलं दोन पाय. बकरी अंतराळी केली. दावण तयार झाली.

पुजारी 'च्यांग भलं' म्हणाला. साऱ्यांनी तेच म्हटलं. लगीन साखळ जायला पायजे. भंडारा उधळला गेला. सारे दावणीजवळ जमले.

एकट्याच्या अंगात आलं. पुजाऱ्यानं त्यास भंडारा लावला. "च्यांग भलं ऽऽ च्यांग भलं." ढोल घुमाय लागले. "एका झपाट्यात एक बकरं तुटायला पायजे." एक आवाज. "नाही तर लगीन साखळ जात नाही." दुसरा आवाज. बकरी अंतराळात लोंबकळत होती.

मारेकरी धावत आला. हातात सुरी होती. लोक मागं सरले. पुजाऱ्यानं भंडारा फासला. पुनः एकदा "च्यांग..." पहिला वार बरोबर मध्ये झाला. एक वार दोन तुकडं. दुसरा वार–तिसरा वार–चौथा वार–एकेका वारात दोन दोन तुकडं–प्रत्येक वाराला "च्यांग ऽऽ भलं ऽऽ" आता शेवटचा वार पडला. बकरं तुटलं नाही. बकरी निघाली. गावणी होती. बकरी लोंबकळाय लागली. पिशवीतनं पिलं बाहेर आलं.

पुजाऱ्यानं डोळं मोठं केलं. दाढीला हात लावला. तो एकदम ओरडला. "मारुत्या दुसरी दावण आण" आवाजानं मांडव हादरला. मारुतीच्या डोळ्याला अंधारी आली. तो खाली बसला. सारे गप्प राहिले. पुढं काय ?

एकटा पुढं आला "पुजारी दुसरी दावण न्हाय होगार." "मग लगीन साखळ जात नाही–तसंच केलासा तर बाई पोटूशी राहून–पोटसं बाहीर पडणार–मग ठरवा काय करायचं ते."

पोराच्या हळदी मध्येच थांबल्या. वल्या धोतरावर पोरगं मांडवाबाहेर आलं. एक मेंढरू अजून लोंबकळत होतं. बाला अंधारी आलेली. आई वडवून घेत होती.

पोर म्हणालं "पुजारी–तांदुळाची अेळ झाली–देवक थांबलंय. आता दुसरी दावण आमच्या हातनं हुणार नाय"

"तेवढं सलपं नसतय तुका–प्वाट पिकणार नाही."

"न्हाय पिकू दे. आमचं लगीन थांबवायचं नाय. वरमदेव आला तरी थांबवायचं नाय."

"मग बघा तुमचं तुमी." पुजारी निघाला. माणसं कुजबुजली. एकेक निघाला. ढोलकऱ्यांनी पाय काढला. पालखी निघाली. कोण कोणाला अडवणार ?

अंगावरचं तुकाचं धोतर वाळलं. मांडवातली कळाच गेली. पावणं मांडवाबाहेर जमले. उभा राहून कटाळले. खाली बसले. चर्चा झाली. एकटा मांडवात आला.

"तुका दुसरी दावण तोडाय पायजे–नाय तर... पोरगीचा बा म्हणतूय हे लगीन व्हायचं नाय."

तुका पावण्याच्या अंगावर वसकन् गेला.

"पोरगीला घिवून जावा–दुसरी दावण तोडणार नाय"

"मग हे लगीन मोडलं बघ तुका."

"मोडू दे. जोगता व्हईन."

सारं इसकटलं. मांडवात बा पडल्याला. घरात आई पडल्याली. नवरीला मांडवाबाहीर काढलं. गाड्या जुपल्या. वराड निघालं. मांडवाबाहेर बकरी–बकऱ्याची दावण पडल्याली.

तुकानं अंगात अंगरखं चढवलं. मांडवाबाहेर गेला. दावण आडवी पडल्याली. तो माघारी फिरला. मांडवातल्या डांबाला धरला. थांबला. मांडव रिकामा होता.

तुकाच्या अंगात आल्यासारखं झालं. तो झपाटून निघाला. अंगात पीर आल्यासारखा सुटला. अंग हळदीचं होतं. तो तराट सुटला. वेशीबाहेर म्हारवाड्यात थांबला. समोर पिरा उभा होता.

पिरा सगळ्या म्हारवाड्याला आवातनं देतोय–

"तुका धनगराच्यात राच्याला जेवायला या."

तुका मांडवाकडं येत होता.

निराधार

निराधार योजना आली तसं गाव ढवळून निघालं. ढेकूळ पाघळल्यागत निराधार पाघळले. सारे निराधार उठले. तालुक्याच्या गावाला गेले. निराधारांनी फॉर्मचा आधार घेतला. फॉर्म मिळाले तसे ते अंतराळी झाले. महिन्याला साठ रुपयं. बोटं मोडाय लागली. हिशेब होऊ लागला. तीन विसाचा जमा खर्च मनानं कैक वेळा केला.

गल्ली बोळात–घरा दारात योजनेला बाळसं आलं. योजना चुलीपतूर गेली. तलाटी–सरपंचाला दाखलं देऊन पोक आला. चिमटभर गावात मूठभर निराधार निघाले.

गावातले निराधार फॉर्म तालुक्याला सुटले. योजनेच्या वाऱ्यात आपण बी उफणून घ्यावं म्हणून

मांगाच्या पोरूनं आपलाबी अर्ज भरला. तालुक्याच्या गावाला गेली. मामलेदाराला भंडारा लावला. फॉर्म दिला. मामलेदार म्हणाले, "बाई तुम्हाला कोणी वारस नसले तर योजनेचा लाभ होईल."

"आई यल्लूबाई तुमाला आयुष देवू दे," असं म्हणून पारू परतली. भंडारा लावलाय म्हंजे काम वाया जात नाही–या बळावर ती मोटार अड्डयावर आली. मोकळं वाटलं. मोकळ्या मनात साठ रुपये मेंढरागत फिरत होतं.

दिवस वुडत होता. गावभर धूर पसरत होता. वळण संपलं. मोटार अड्डयावर थांबली. पारूचं शेजारी तिला न्यायला अड्डयावर आले होते. त्याना वाटत होते पारू आज पैसं घेऊन येणार. शेजारी पाहून पारू हरकली. मन सुपासारखं झालं. अंधारातलो वाट वसरत होती. वोलणं चालू होतं. आज पैसं मिळालं नाहीत हे शेजाऱ्यानी ताडलं. शेजाऱ्यानी अंधारातच म्हातारीला सोडलं. रोजच्या सवनं पारू खोपाटाकडं वळत होती. मनात योजनेचं मेंढरू चरत होतं.

दिवस उजाडला. गावात बातमी उगावली–पारूला पैसं मिळालं. बातमी पावण्या पैंच्या गावालावी पोहचली. तिसऱ्या दिवशी पावणं यायला सुरुवात झाली. खोपाट भरून गेलं. पारूच्या केसा एवढा गोतावळा बघून मांग वाड्याला कवतीक वाटलं.

पारूनं आपला झग कापडात बांधून ठेवला. "आता जोगवा कशाला मागतीस" या गावातल्या बोलण्यानं तिला ते पटलं. किराणा दुकानात खातं टाकलं. साठ रुपयं आलं की भागवून टाकू. अंगावर घडुता घेतला. बाकी साठ रुपयात भागवायची ठरली.

दुकानदारच्या पोटासारखी बाकी फुगत चालली. नात्या गोत्याची वर्दळ वाढत चालली. आई यल्लूबाईची सेवा केल्याली वाया जायची नाही. आता सुखाचं दिस भोगायचं.

महिना तवाच पालटला. तालुक्यासनं अजून पैसं कसं आलं नाहीत म्हणून ती तालुक्याला जाऊन आली. मामलेदार भेटले नाहीत. कारकुनानं सांगितलं "अजून मिटिंग व्हायची आहे. मिटिंग झाली की तलाटयाला कळवितोय."

रोज चावडीवर जायची. कटाळा आला रोज जाऊन. "अजून टपाल नाही" एवढंच तलाटी वोलायचा. पारूचा खर्च फुगाय लागला. मन वढाळ झालं.

आणि एके दिवशी तलाटयाला टपाल आलं. तलाटयानं सनद्याला पारूकडं धाडलं.

"पारू, तलाटयानं चावडीवर वोलावलयं." पारू हारखली. तिच्या खोपटल्या नातेवाईकांना बरं वाटलं. नात्या गोत्यासह पारू चावडीकडं निघाली. टेवलाजवळ अडकल्यालं पोट बाजूला करत दुकानदारानं पारूचं खातं चाळलं आणि तोही चावडीकडं वळला.

आपल्याकडं एवढी गर्दी बघून तलाठी उठला. पारू गोत्यावळयाच्या मधी होती. तलाटयाला बघून पारूनं भंडाऱ्याची चिमट कमरेतनं काढली. तलाटयाला भंडारा लावायला पारूनं चिमट पुढं केली–तलाटी म्हणाला पारू तुझं वय साठ वरसं नाही–तुझा अर्ज नामंजूर होऊन आलाय–पारूनं चिमट उधळली–नदरंसमोर झग फिराय लागला–ती घुमाय लागली. कोणीतरी म्हणालं, अंगात आलय–नाती गोती पायऱ्या उतरत होती–दुकानदाराचं पोट हालत होतं. पारू घुमत होती.

□ □

बापू यशवंत जाधव
श्रीकांत टी हाऊस मागे
मु. पो. म्हैसाळ
ता. मिरज जिल्हा–सांगली

मराठी साहित्यातील राजकीय वास्तवता

मधु जामकर

'मुक्तात्मा' ही ग. त्र्यं. माडखोलकरांची कादंबरी इ. स. १९३३ मध्ये प्रसिद्ध झाली. मराठीतील ही कादंबरी पहिली राजकीय कादंबरी मानली जाते. परंतु त्या अगोदर ह. ना. आपटे यांनी आपल्या 'यशवंतराव खरे' या कादंबरीला राजकीय विचारसरणीची पार्श्वभूमी दिली होती. इ. स. १९२० ते १९४५ चा राजकीय कालखंड हा मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. या कालखंडात प्रा. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर आणि ग. त्र्यं. मालखोलकर यांनी आपल्या कादंबरी लेखनाद्वारे बरेचसे राजकारणाचे चित्रण केले. इ. स. १९३५ च्या सुमारास सामुदायिक सत्याग्रहाच्या चळवळी अधिक प्रमाणात झाल्याने त्याचे पडसाद मराठी कादंबरीत होऊ लागले. इ. स. १९२० पर्यंत मराठी जीवनात लो. टिळकांच्या राजकारणाचा अधिक प्रभाव होता. परंतु लो. टिळकांच्या तथाकथित राजकारण विचारसरणीचे म्हणावे तसे प्रतिबिंब या कादंबरीत आले नाही. प्रा. ना. सी. फडके यांच्या 'प्रवासी' या कादंबरीत लो. टिळकांच्या राजकारणाचा प्रभाव राजारामाच्या व्यक्तिमत्त्वावर पडल्याचे दिसते. परंतु याशिवाय इतर कादंबरीत असे चित्रण दिसत नाही. त्यामानाने मराठी कादंबरीवर म. गांधींच्या राजकारणाचा विशेष प्रभाव दिसतो. म. गांधींचा समाजवाद, त्यांची दांडीयात्रा, मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह आदी बाबींचे चित्रण मराठी कादंबरीत दिसते. विशेषत: साने गुरुजी आणि वा. म. जोशी यांच्या कादंबरीत गांधीवादाचा विशेष जोर दिसतो.

स्वातंत्र्य चळवळ :

पुढे दुसरे भीषण महायुद्ध व त्याचे परिणाम होऊन मराठी जीवन अधिक विस्कळीत झाले. सुभाषचंद्रांची आझाद हिंदु सेनेची चळवळ मराठी कादंबरीत आली. या काळात स्वातंत्र्यसिद्धीकरिता विविध अशी आंदोलने होऊनही देशभक्तीची ज्वलंत भावना पेटवील अशी एकही कादंबरी मराठीत दिसत नाही. एवढेच नव्हे तर भारतास स्वातंत्र्य मिळाले, पण या स्वातंत्र्यसूर्यावर एकही कादंबरी लिहिली गेली नाही. यावेळच्या कादंबरीत राजकीय वास्तवापेक्षा राजकीय वाद भरपूर प्रमाणात आले. राजकारणातील हिंदुत्ववाद-गांधीवाद व साम्यवाद हे तीन वाद मराठी कादंबरीतून चर्चेच्या रूपाने येऊ लागले. माडखोलकरांनी गांधीवादाची टिंगल आपल्या कादंबरीतून केली. पण हिंदुत्ववादाने पछाडलेले त्यांचे मन मराठी कादंबरीत कुठेच दिसले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी राजकीय कादंबरी लिहिली गेली पण ती चळवळीच्या निमित्तानेच. ही राजकीय कादंबरी ऐतिहासिक कादंबरीशी मिळतीजुळती आहे. या संदर्भात कालची राजकीय कादंबरी उद्याची ऐतिहासिक कादंबरी होईल काय ? हा समीक्षकांनी उपस्थित केलेला प्रश्न विचारार्ह वाटतो.

स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी राजकीय कादंबरीचा विचार करतांना असे दिसून येईल की येथे राजकारण हे कादंबरीत साधन म्हणून झालरवजा आलेले दिसते. या लेखकांच्या कादंबरीत राजकीय घटनांपेक्षा राजकारणाच्या

प्रश्नावरील चर्चांना आणि वादविवादांना अधिक महत्त्व मिळाले आहे. शिवाय ही चर्चा प्रमाणशून्य असल्याने ती कादंबरीत दूषित वातावरण निर्माण करते. माडखोलकरांच्या कादंबरीत समाजवादावर भर असून दहशतवादी राजकारण दिसत असले तरी ते साधनाकडून साध्याकडे कधीच आलेले नाही. यावेळचे जीवन आंतर्बाह्य राजकीय झाल्यामुळे या कादंबरीतून राजकारणी घटना व राजकीय प्रश्न येणे अगदी अपरिहार्य आहे पण पूर्वग्रहदूषित वृत्ती, प्रचारकी थाटाच्या राजकारणी चर्चा एवढेच या कादंबरीचे स्वरूप राहिल्यामुळे ती कलेच्या पातळीवर नेहमीच प्रभावशून्य राहिली आहे. यामुळे प्रत्यक्ष राजकीय घटना व त्यांच्या मागे असलेल्या व्यक्ती यांच्याकडे दुर्लक्ष झाले आहे. एखाद्या राजकीय प्रवाहाचे चित्र लेखकाने व्यक्तीत केंद्रित केले असते तर ते अधिक प्रभावी होते. केवळ घटनांचे अलिप्तपणे केलेले वर्णन कितीही कलात्मक असले तरी व्यक्तिविषयी जर त्याला आपुलकी नसेल तर या घटनावर्णनात जीव राहत नाही. एका अर्थाने या कादंबरीत राजकारण हे रंजनाचा भाग होऊनच आले.

ग. त्र्यं. माडखोलकर

ज्या माडखोलकरांचा राजकीय कादंबरीकार म्हणून उल्लेख केला जातो त्यांची कादंबरीदेखील रंजनाचे मूल्य घेऊनच राजकारण चित्रित करते. माडखोलकरांचे मन राजकारणाविषयी संवेदनाक्षम आहे पण हे राजकारण कादंबरीत आले की त्यावर कादंबरीच्या तंत्राची हुकमत सुरू होते. माडखोलकरांची कलेविषयीची मते व त्यांचे साहित्य यात कसलाच मेळ दिसत नसल्याने ही कादंबरी धड राजकारणाच्या चित्रणास वाव देत नाही की कादंबरीचे खरे स्वरूप दाखवीत नाही. उरते ते शब्दसामर्थ्याने केलेले रंजन. याचे कारण राजकीय भूमिका व्यक्तिचित्रण यांचा समन्वय येथे दिसून येत नाही. माडखोलकरांचा कादंबरी नायक राजकीय जीवन खरोखर जगत आहे असे वाटत नाही. येथे फक्त राजकीय जीवनाचे अंधुक पडसाद दिसून येतात. त्यामानाने केतकरांच्या कादंबरीत राजकीय विचारप्रणालीच्या विवेचनाचे प्रमाण वाढले पण हे विवेचन रूक्ष व कथानकास ओझे देणारे झाले. राजकीय कादंबरीकाराजवळ व्यासंगाने मिळवलेली विपुल माहिती व महाराष्ट्राच्या जीवनसरणीविषयी कटाक्षाने विचार करण्याची वृत्ती असते. पण या बरोबरच अनुभवाची विविधता नसल्यास त्याचे कादंबरीलेखन वेगडी-वजा होते. माडखोलकरांची कादंबरी ही अशीच झाली आहे.

'सिंहासन' आणि 'कामायनी' या दोन कादंबऱ्यांनी मराठी राजकीय कादंबरीचा कायापालट केला असे म्हटले जाते. विरोधी पक्षाची कोंडी हा 'कामायनी'चा विषय आहे तर 'सिंहासन' ही कादंबरी सत्ताधारी पक्षाच्या वर्तुळातील आहे. 'कामायनी'त सत्तास्पर्धेचा मुख्य विषय आहे. येथे सत्ताधारी पक्षातील महत्त्वाकांक्षी व्यक्तींच्या आपापसातील झुंजीची कहाणी 'सिंहासन'मधून दिसते. परंतु सत्तास्पर्धा असूनही राजकीय भूमिकेच्या संघर्षाची ही कादंबरी दिसत नाही. 'सिंहासन' या कादंबरीचे एक वैशिष्टय असे सांगता येईल की राजकीय सत्तास्पर्धेचे इतके तपशिलवार व जिवंत वर्णन यापूर्वी मराठीत कधी आले नाही. 'सिंहासन' पूर्व कादंबरीत एक प्रमुख राजकीय घटना डोळ्यासमोर ठेवून तिच्या भोवती एक काल्पनिक कथानकाचा आभास निर्माण करून रंजनवाद केला जात असे. 'सिंहासन'मध्ये अरुण साधू या लेखकास राजकीय वास्तवाचे भान आहे. राजकीय व्यक्ती व सत्तास्पर्धा यांची जोड या कादंबरीत दिसते. शिवाय आकर्षक निवेदन, सार्वत्रिक सत्य संवाद, वातावरण आणि व्यक्ती यांना आपल्यात घेऊन जाणारी ही कादंबरी वाटते. या कादंबरीत घटना उलघडून दाखविण्याचे तंत्र अधिक प्रभावी वाटते.

सिंहासन

'सिंहासन'मधील राजकीय वास्तवाला देखील फार मोठ्या मर्यादा आहेत. येथे राजकीय तपशील भरपूर आहे पण तो अनुभवाच्या पातळीवर जात नाही. शिवाय या तपशीलास व्यक्तिजीवनाची साथ न मिळाल्याने तो कादंबरीत अपुरा वाटतो. त्यामुळे कित्येकवेळा हा राजकीय तपशील कादंबरीस गुदमरून टाकतो. लेखकाने राजकीय वास्तवाचा एवढा हव्यास घेतला की यापायी

इतर वास्तवाकडे त्याने डोळेझांक केली. सत्तास्पर्धेला महत्त्व दिल्याने लेखक व्यक्तीऐवजी गटावरच पूर्ण लक्ष देतो. राजकारण म्हणजे केवळ सत्तास्पर्धा नव्हे तर येथेही एक व्यापक तत्त्वविचाराचे क्षेत्र असते. राजकीय मूल्य नसल्यामुळे या कादंबरीत फार मोठी मर्यादा आली. मूल्य जपणाऱ्या व्यक्तीचा पराभव होत असला तरी त्यामागे असलेली व्यक्तीच्या संघर्षाची भूमिका अधिक महत्त्वाची असते. 'सिंहासन'मध्ये यादृष्टीने डावपेचापलीकडे काहीच दिसत नाही. त्यामुळे ती वाचकाच्या मनाची पकड घेत नाही.

'सिंहासन' वाचताना माडखोलकरांच्या 'मुखवटे' या कादंबरीची आठवण होते. दोन्ही कादंबरीतील प्रकरणाच्या मुळाशी काही महत्त्वपूर्ण तत्त्वे असण्याऐवजी केवळ वैयक्तिक चुका, हेवेदावे कसे होते याचे चित्रण झाले आहे. यामुळे कथेला केवळ एका कुटील राजकारणी डावाच्या चित्रणाचे स्वरूप आले आहे. कादंबरीतील विवेचन संकुचित व आक्रस्ताळेपणाचे वाटते. या दोन्ही कादंबरीत राजकीय अनुभव असूनही तो कलात्मक पातळीवर जात नाही. शेवटी हाती येते ते एका कुटील राजकारणी डावाच्या चित्रणाचे स्वरूप रंगविलेले. 'कामायनी'त लेखकाचा राजकीय दृष्टीकोन दाखविणे महत्त्वाचे झाले आहे. त्यामुळे ही कादंबरी एक विशिष्ट पोझ घेऊन येते. येथे देखील लेखकाने स्वतःच्या मूल्याच्या संदर्भात समकालीन मूल्ये तपासली नसल्याने तिचे स्वरूप एकांगी झाले आहे. शिवाय भावडेपणा कादंबरीत आल्याने तिचे निवेदन अघळपघळ झाले आहे. आदर्शवादामुळे वास्तवाचे भान सुटले. शेवटी उरतो तो राजकीय रिपोर्ट–तपशील. एकूण मराठी राजकीय कादंबरीचा विचार करता तिचा प्रवास ज्या वळणातून झालेला आहे ती वळणे कधी रंजन म्हणून, कधी साधन म्हणून तर कधी राजकीय तपशील म्हणून आलेली आहेत. राजकीय वास्तवाचे भान या कादंबरीत अभावानेच दिसते, ही बाब आजही विचारार्ह वाटते.

ध्येयवादी नाटके !

मराठी नाटकातील राजकारणाचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी नाटके एका ध्येयवादातून स्फुरलेली दिसतात. खाडिलकरांनी 'कीचकवध' एका राजकीय चित्रणातून लिहिले असले तरी त्यामागे त्यांचा प्रभावी ध्येयवाद दिसून येतो. शिवाय हे नाटक एका रूपकातून आले असल्यामुळे त्याचे बरेचसे स्वरुप बंदीस्त झाले आहे. खाडिलकरांचा राजकीय दृष्टीकोन प्रभावीपणे या नाटकातून दिसत असल्यामुळे त्याला राजकीय स्तराच्या वास्तवाचे भान दिसत नाही. त्यामानाने मामा वरेरकरांची नाटके ही राजकीय प्रश्नांशी अधिक मिळतीजुळती झालेली आहेत. पण वरेरकरांना जो राजकीय प्रश्न जाणवतो तो भावडेपणाने ते नाटकातून मांडून जातात. शिवाय त्या नाटकाला प्रचाराची पोझ मिळाल्यामुळे त्याचे स्वरूप बरेचसे प्रासंगिक झाले आहे. वरेरकर राजकारणाच्या निमित्ताने गांधीवादाचा प्रचार या नाटकातून करतात. या नाटकात राजकीय वाद दिसतात. समग्र राजकारण दिसत नाही. पर्यायाने राजकीय वास्तवता आढळत नाही. नाटक ही कला बरीचशी बहिर्मुख असल्याने व ती बहुअंगी असल्याने तिच्याद्वारे राजकीय वास्तवता प्रकट होणे कठीण आहे. त्या मानाने जयवंत दळवी यांचे 'सूर्यास्त' हे नाटक यशस्वी राजकीय नाटक आहे. याचे कारण येथे लेखक एका जिवंत व्यक्तीच्या माध्यमातून राजकीय वास्तव दाखविण्याचा प्रयत्न करतो. राजकीय व्यक्तीतील झुंजीत खरे नाटच असते. 'सूर्यास्त'मध्ये अशा प्रकारचे नाटच दिसते. पण याही नाटकाचा जेव्हां मेलोड्रॅमा होतो तेव्हा राजकीय स्तरावरील नाटच भडक होऊन त्याचे वेगळी नाटकीपण नेमके खाली राहते. आचार्य अत्रे यांचे 'मी मंत्री झालो' या नाटकातही केवळ राजकीय संदर्भ आहेत. बाकी खास विनोदी अत्रे शैलीने या नाटकाचे राजकीय वास्तवाचे भान पार नाहीसे झाले आहे. मराठी रंगभूमी प्रयोग–शीलतेत अडकली आहे, तिचा विचार करता राजकीय वास्तवाचे नाटक ती अद्यापी देऊ शकली नाही–तिच्या व्यावसायिक पातळीचा विचार करता तिने राजकारणाचे चित्रण नाटच म्हणून यशस्वी केले नाही. मराठी नाटक आणि राजकारण ही दोन ध्रुवे नाहीत ना? मराठी कवितेने राजकीय पातळीवर प्रवेश केलाच नाही. 'विडंबन' या

काव्यप्रकारात राजकारण येते पण तेथे कलात्मक समज नसल्याने मराठी कविता राजकीय वास्तवापासून कितीतरी मैल दूर राहिली आहे. अलिकडे पु. ल. देशपांडे यांच्या लिखाणातून राजकीय विडंबन आलेले आपण वाचतो पण त्यातही खास लेखकाची शैली व त्याचे विनोदकौशल्यच दिसून येते. पु. लं. ना राजकारणाचे वावडे नाही. पण राजकीय वास्तवातून त्यांचे लिखाण आले तर त्यास रंजनमूल्य राहील काय हा प्रश्न महत्त्वाचा आहे. दिवसेंदिवस आपले जीवन राजकारणी होत आहे. आपण राजकीय प्रश्नावर भरपूर वाद घालतो. आपल्या दैनंदिन जीवनाचा राजकारण हा एक अपरिहार्य भाग आहे. अलीकडे प्रत्येकजण राजकारणाविषयी संवेदनाक्षम आहे. पण हे राजकारण जेव्हा कलात्मक पातळीवर येते तेव्हा त्याला कलेच्या तंत्राशिवाय इतर वाबी मान्य नसतात.

आपण जेव्हा काकासाहेब गाडगीळ किंवा आचार्य अत्रे यांची आत्मचरित्रे वाचतो तेव्हा ती एका राजकीय पुरुषांची असल्याने त्यातून राजकीय वास्तव शोधू पाहतो. 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्रात आचार्य अत्रे यांनी गेल्या ५० वर्षातील महाराष्ट्रातील राजकारणाचा इतिहास दिलेला आहे. 'पथिक' या आत्मचरित्रात देखील गाडगीळांनी आपल्या राजकीय अनुभवांचे चित्रण केले आहे. पण या दोन्ही लिखाणात राजकीय जीवनाचा तपशील आहे पण त्यांना कलात्मक भान असलेले दिसत नाही. एक तर ते आत्मप्रौढीने लिखाण करतात किंवा आत्मसमर्थनासाठी आपली लेखणी वापरतात. अलिप्तपणे आपले राजकीय जीवन चित्रित करणे कठीण झाले आहे. याचे कारण प्रभावी निवेदन, राजकीय वातावरण आणि व्यक्ती यांना सुसंगतपणे एकाच मुशीत घेऊन हे लिखाण झाले नाही. वस्तुतः या दोन्ही लेखकाजवळ राजकीय अनुभवाचे केवढे गाठोडे आहे. पण ते चित्रित करण्यासाठी कलेकडे पाहण्याची दृष्टी यांच्याजवळ नसल्याने ही आत्मचरित्रे असामान्य माणसांची असूनही ती सामान्य होतात. राजकीय पातळीवर यशस्वी झालेला लेखक कलेच्या पातळीवर अयशस्वी होतो.

राजकीय वास्तवता किती ?

मराठी साहित्यात राजकीय वास्तवता किती प्रमाणात आली या प्रश्नाचे उत्तर बरेचसे गुंतागुंतीचे आहे. साहित्य ही कला अभिरुचीसंपन्न असल्याने ती ज्या समाजजीवनातून अवतरते तो समाज बहुरंगी असतो. येथे रंजनाला महत्त्व असते. परंपरेतून आलेल्या आदर्शवादाला महत्त्व असते. या समाजाने ध्येयवादाची स्वप्ने देखील उराशी बाळगलेली असतात. याच समाजाचा राजकारण हा देखील एक अतूट धागा असतो. केवळ स्वान्त-सुखाय म्हणून कलेकडे पाहताना देखील आपण समाजाशी तिचे निखळ नाते जोडतोच. मराठी साहित्याचा प्रवाह पाहता ते कधी साध्य म्हणून साधनाकडे तर कधी साधन म्हणून साध्याकडे गेलेले दिसते. हे साहित्य ज्या मातीतून वर येते त्या मातीचे गुणधर्म या लेखकाच्या व्यक्तिमत्वाशी जुळलेले असतात. आजपर्यंतचे मराठीतील राजकीय पातळीवरील साहित्य विचारात घेता त्यामागे लेखकाची कोणती प्रेरणा आहे ती पाहणे अगत्याचे वाटते. कारण या प्रेरणेतच या साहित्याचे यश आणि अपयश साठलेले आहे.

आमच्या लेखकांचा राजकारण हा आवडीचा भाग आहे. पण राजकीय पातळीवरील चिंतन मात्र करण्यास त्यास सवड नाही. एखादी राजकीय घटना पाहून अंतर्मुख झालेला लेखक क्वचितच दिसतो. राजकीय विडंबने मराठी साहित्यात बरीच दिसतील. पण अस्वस्थ करणारे राजकीय वास्तवाचे चित्रण फार कमी प्रमाणात दिसते. याचे कारण कलेविषयीची अपूर्व समज असणारा लेखक राजकारणापासून अलिप्त असतो. व जो राजकीय पातळीवर तरंगतो, त्याला कलेचे नियम मान्य नसतात. शिवाय कला आणि कारागिरी यांच्या सीमारेषा नेहमीच आपण पुसट ठेवत असल्याने दर्शन आणि प्रदर्शन यांचे तारतम्य आपण गमावलेले असते. यातूनच कलावाद, जीवनवाद या सारखे वाद येतात. कलेचा मुख्य धर्म रंजन करणे हा असेल तर ती जीवनमूल्ये धुडकावणारी असेल का ? एकदा रंजनाचे मूल्यमापन अगत्याचे झाले की साहित्याकडे एका विशिष्ट भूमिकेतून पाहिले जाते. मराठी साहित्यात राजकारण जी भूमिका

घऊन आले त्याच्या परंपरेत एक स्वच्छंदवादी वृत्ती आहे. मूलतः रोमँटिक दृष्टीने मराठी लेखक राजकारणाकडे पाहतो. आमच्या लेखकाची राजकारणाची जाणीव तीव्र असल्याने त्याचे सुरम्य चित्र रंगवून तो वाचकाला एका स्वरंजनातच नेतो. राजकारणाचे जसे तत्त्वज्ञान असते तसेच कलेचे देखील एक तत्त्वज्ञान असते. मुख्य म्हणजे या दोन्हीतही एक शिस्त असायला पाहिजे. परंतु आपण घेतलेली स्वच्छंदवादी भूमिका लेखक सोडत नसल्याने ही शिस्त कोलमडून जाते. त्याचा परिणाम हे साहित्य राजकीय वास्तव देऊ शकत नाही. राजकीय वास्तव मराठी साहित्यात जेव्हा येते तेव्हां ते त्या काळाचे आणि ते ज्या माणसात वावरले त्या माणसांची प्रतिबिंबे स्वच्छ उमटवून देते. मराठी लेखक राजकारणाबाबत आपली दृष्टी जेव्हा बदलेल तेव्हाच त्याची लेखणी अधिक राजकीय पातळीशी कलात्मक तोल सांभाळील.

पत्रकार लेखक :

आजपर्यंत राजकीय पातळीवर साहित्य लिहिणारे लेखक बहुतेक पत्रकार असल्याचे आपण पाहतो. पत्रकार ज्या भूमिकेतून जीवन जगत असतो ती भूमिका नेहमीच त्याच्या लिखाणात दिसते. ही भूमिका एक विशेष पोझ घेणारी झुंजार वृत्तीची असते. तिला संयमाचे कलापूर्ण नियमाचे फारसे बंधन मान्य नसते. प्रखर ध्येयवाद आणि परंपरेतून आलेला आदर्शवाद यामुळे हा पत्रकार लेखक म्हणून आपले साहित्य लिहितो. याच्याजवळ अनुभवाचा भरपूर साठा असतो. पण त्यातून निवड करून कलात्मक रूप देण्यास त्याला फारशी सवड नसते. पत्रकारास आपले लिखाण गर्दी खेचणारे असावे असे वाटते. यातून अनेक गुंते तो निर्माण करीत शेवटी रंजनाकडेच येतो. मराठी साहित्यातील राजकीय वास्तवाचा विचार करता या बाबींचा आवर्जून आढावा घ्यावा लागेल. कलेच्या संदर्भात जी राजकीय बैठक लेखकाजवळ असायला पाहिजे, ती नसल्याने आजच्या मराठी साहित्यात राजकीय वास्तवाचे चित्रण अपुरे असल्याचे दिसते. □ □

प्रा. मधु जामकर
'दिलासा' परळी हौसिंग सोसायटी
परळी - वैजनाथ–४३१५१५

अनुक्रमणिका

घट आणि कदौड

मधुकर वाकोडे

वैशाखातली दुपार. रखरखती. उभार. जमिनीच्या तव्यावर पापडासारखा वारा भाजून निघत होता. सारे कसे भगभगीत. पाखरं सुद्धा हिव्र्या पानांचा आसरा शोधीत होती. चैत्रानं त्यांच्यावर पाखर घातली होती. नागड्या झाडांना...विवस्त्र वेलींना त्यानं वल्कले नेसविली होती आणि पाखरांना तेवढीच ओली माया पुरेशी होती. कुठून तरी गटारातून लोळून आलेलं झावरं कुत्र जत्रीतल्या सोंगावानी आलं...तल्खलीनं त्याचं धपापणं चालू होतं. गावातल्या साऱ्या कौलारू छपराखाली उघडी माणसं ढेपाळली होती. ओसरीतल्या मायाबाया पदराच्या पंख्यानं आलेल्या वाऱ्यालाच निववीत होत्या. आणि घरादारातील लेकरांनी बाया...बाप्प्यांना चटांग देऊन आपल्या नेहमीच्या अड्ड्यावर खेळाचं वस्तान वसविलं होतं.

माझ्या समोर ओसरीत दोन चिमण्यांनी चिचोक्याचा घट मांडला होता आणि समोरच्या विदावुढीच्या निंबाखाली पोरांनी चेंडूदाण्डूची कदौड चालविली होती. ह्या वैशाख वणव्याला न जुमाणणाऱ्या मुलांनी उन्हाचंच वाळवणं घातलं होतं. समोरच्या निंबाखाली एका पार्टीची कदौड चालू होती. त्यांच्या कऽऽऽअऽऽअऽऽ चा आवाज कानात घुमला...माझ्या मनाचा वारू त्या रखरखत्या उन्हात भरारी मारीत पोरवयातल्या घटात जाऊन थांबला.

'ढज्जाऽऽ' स्वाती ओरडली. मी भानावर येऊन पाहू लागलो. तिनं तळहातानं चम्पला झाकून घेतल्या आणि गड जिंकल्यासारखा आनंद तिने त्या वैशाख वणव्यात उधळला. भारतीने तिचा घोडा झाकल्याने स्वातीला फक्त एका हाताच्या वाटचालीवरच समाधान मानावे लागले. पुन्हा त्यांचा खेळ सुरू झाला. स्वातीने चिचोक्याच्या चार चम्पला वर्तुळाकार घटात टाकल्या· दोन चित...दोन पट. चार बोटं तिचा घोडा पुढे सरकला. अश्वमेधातील अश्व जणू चार राज्यातून मिरवून आला. तिने पुन्हा चार चम्पला टाकल्या. चारही चित. हित्ताड...ती ओरडली. तिचा घोडा आणखी वीतभर पुढे सरकला. विजयी मुद्रेनं पुन्हा ती ढायी खेळली. पण ह्या वेळी तिला माघार घ्यावी लागली. तीनं चित...एक पट पडल्याने तिने डाव सोडला. खेळी भारतीच्या हाती गेली. स्वातीला मुलूख गेल्यासारखे वाटले.

बाहेर भर उन्हात कदौड रंगली होती. प्रतिस्पर्ध्याने फेकलेला चेंडू कोलन जवळील दांडूला न लागल्याने खेळणाऱ्या पोरानं चक्क वकट... लेंड...मुंड...नाल... अविज्य... आर... ठेक्या असा गणतीचा सपाटा सुरू केला.

भारती स्वातीपेक्षा अधिक चतुर. चम्पला जोडून टाकताना शकुनी डावपेचांचा ती आधार घेत होती. तिने चम्पला टाकल्याबरोबर चारही पट. ढज्जाऽऽ...ती ओरडली. चपळाई करून तिने एका हाताने घटातील चम्पला झाकल्या नि दुसऱ्या हाताने घोडा. मग तिने वर्तुळाकार घटाचे अंतर एक हात कापले. नंतर करंगळी ते अरंगळी मधले बोट चाफेकळी व अंगठा...असे अंतर मोजून आपला घोडा स्वातीच्या पुढे दामटला. आणि पुन्हा दोन चित...दोन पट. चम्पल. चार बोटं पुढे घोडा सरकला.

समोरचा घट आणि बाहेरची कदौड पाहून मी मोहरलो. चैत्र...वैशाखातील पलाशपुष्पासारखा.

अनुक्रमणिका

पोरींच्या चप्पल...हिंताड...ढज्ज्याच्या वर्तुळात गटंगळ्या खाऊ लागलो. बाहेरच्या चेंडूदांडूतील कदौडचा ओंडका अगतिकपणे पकडू लागलो. वयाचे पाणी नाकातोंडात गेल्याने अदमुसा झालो होतो. विंदावुढीचा निंब तोच...सुटीतला वैशाख वणवा तोच...दुपारचा डाव तोच...पण पिढी बदलली होती. वेटाळातील नव्या पिढीनं आदल्या पिढीचा घट आपल्या हाती घट्ट पकडला होता. आदल्या पिढीवर प्रपंचाची कात चढली होती. उमलती पिढी उन्हात तळपत होती.

घरच्यांना पाऱ्यासारखी हुलकावणी देऊन आम्ही पोरं त्या निंबाच्या सावलीत आमचा अड्डा जमवीत असू. त्या वेळी गावात असे चार पाच निंबाखाली अड्डे जमत असत. आणि मारोतीच्या देवळात मोठ्या माणसांचा चौसरचा पो ऽ ऽ चाले. तिकडल्या कोपऱ्यावरचा अड्डा हा पाणेरीच्या निंबाखाली असे. आता ह्या निंबाभोवतीच्या मैदानात फुकटपुरा वाढल्यानं हा अड्डा इतिहासजमा झाला. आणि तिसरा अड्डा हा चावडीच्या निंबाखाली होता.

माझ्या बरोबर चौथीत शिकणारे भिका... जना...नानू...वगैरे टोळभैरव ह्या खेळात तरबेज होते. एवढ्या भर उन्हात कदौडचे राज बहुधा आमच्यावर यायचे. रखरखत्या उन्हात आम्ही ऊर फुटेस्तोवर क ऽ ऽ अ ऽ ऽ चा दम घेऊन मी दौड मारीत असे. कोलनजवळ मातीत रेघा ओढता ओढता माझा दम न पुरल्याने मी कितीतरी वेळा रडकुंडीला आलो होतो. आणि परिकथेतील राजकुमाराच्या मदतीला कुणीतरी परी धावून यावी तशी शेजारची सुमित्रा धावून यायची. दुपारची गप्पाष्टके झोडत माय तिच्याकडे असली तर ती चक्क थाप मारायची. म्हणायची–'चल, तुया मायनं बलावलं.' पण पोरं राज फेडून मागायचे. दुसरी कुणी असती तर त्यांनी 'राज ना दे राजोटी...राजाची राणी वांझोटी'चा गलका केला असता. पण पोरं तिला वचकून होती. ती आमच्या वर्गातील श्रीमंताची पोर असल्यानं लेखणी... रबर... पेन्सिल... स्केल... अशा वस्तू तिच्याकडे मागण्याची पाळी सर्वांवर कधीमधी येत असे व ती त्या त्या वस्तू देतही असे. ती पोरांना न बधल्याने माझी सुटका झाली कितीतरी वेळा. 'पाय बरं तू घामाझोकल झाला की नाई तं...' ती हातानं माझ्या कपाळावरचा घाम निपटायची ती परकरी पोर होती. नाहीतर पदरानंही टिपला असता. ती फार समजदार होती. उगवत्या दिवसागणिक तिची वाटचाल गतीनं चालू होती. त्याच गतीनं तिचं शहाणपणही वाढत होतं आणि त्याच गतीनं आमचं गाढवपण. स्त्रीची वाढ एवढी झपाट्याने कशी होते? मुलांना न कळणाऱ्या कितीतरी गोष्टी मुलींना कशा काय कळू लागतात...न कळे. पण पोरी समजूतदार असतात एवढे खरे.

शाळेजवळ पॅगोडा टाईप छप्पर असलेले चौकोनी देऊळ होते. महादेवाचे. पिंड मध्येच असल्याने प्रशस्त मोकळी जागा. पाच पाच पोरींचा गट आधीच ठरत असे. शाळा सुटल्याबरोबर पोरी धावत जाऊन ते कोपरे जिंकून घेत. चार कोपरे चार मुलींनी धरायचे. आणि पाचवीवर राज. मग ती कोपऱ्यातल्या मुलीजवळ जाऊन... 'आईवाई पुरी?' करायची. उत्तर मिळायचे... 'जाय तिकडल्या घरी,' ती दुसऱ्या कोपऱ्यात जाताना चौफेर नजर टाकायची. कुण्यातरी मुलीचा कमकुवतपणा हेरायची. कारण त्या वेळात मुली झटकन घर बदलायच्या अन् ती पटकन धावायची. खाली घर पकडण्यासाठी. फार फार जीव मेटाकुटीला यायचा तिचा...घरासाठी. कुठे तरी चुकामूक झाली तर मात्र तिला घर मिळायचे. आणि बेघर झालेली मुलगी पुन्हा आपली आई वाई पुरी करीत भणंगपणे हिंडत राहायची.

त्या दिवशी सुमित्राच्या कंपूनं देऊळ शिवलं होतं. पण त्यांची पाचवी मैत्रीण भांडून निघून गेल्याने त्यांना पाचवा भिडू हवा होता. मी आपला दगडावर दगड मारीत चाललो होतो. तेव्हा त्या चौघींनी मला आईवाई पुरी साठी आग्रह धरला.

'हॅट...मी नाई तुमच्यात खेयत.' मी उत्तरलो.

'चल न ऽ रे, मी तुले संतरा गोई दिन.' नर्मदा म्हणाली.

'फेक् तुयी गोई अन् चोई तिकळे.' मी उद्धटासारखा बोललो.

एवढ्या शिताफीने त्यांनी देऊळ शिवलं होतं

आणि आता पाचवा जोडीदार नसल्यानं त्यांचा विरस झाला होता. पण स्त्री–जात कातणीसारखी. त्या सर्वजणी सुमित्राला म्हणाल्या–'तू म्हन त्याले.. तुया म्हटल्यानं आईकते तो.'

आता ते सुमित्राला आव्हान होतं. तिच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता तो. तिने त्यांच्याकडे पाठ केली. माझ्या डोळ्यात जीव ओतून मधाळ तंतू कातत म्हणाली, 'मी किनई तुले रंगीत ताव देईन पतंगीसाठी. म्हनसीन् तं पतंग करू लागीन पन आज माहा आईक.' आणि मी सुतासारखा सरळ झालो. दप्तर ठेवून खेळू लागलो. इतर मुलींना घर न सापडू देणारी ती पण माझ्यावर डायी आली की वेंधळ्यासारखी वागून घर सापडू देत असे, कारण ती जिंकली होती. तिला आधीच घर सापडलं होतं...ज्या घरासाठी पोरी झुरणी लागतात. आणि त्या दिवशी संध्याकाळी घराच्या पायरीवर बसता बसता तिनं ओच्यातील फुटाणे मला खाऊ घातले होते.

चौथी पास झाल्यावर मी तालुक्याला निघालो. शिक्षणासाठी. पास झालेल्या चारपैकी एकटा. मुलींचे शिक्षण थांबले. पोरं शेतीकडे वळले. तालुक्याला जाण्याआधी सुमित्रा भेटली. तिच्या पोरसुलभ निरागस डोळ्यात गंगायमुना उफाळल्या. जणू काही कृष्ण मथुरा सोडून चालला...एवढा आकांत तिच्या मुठीएवढ्या जिवाचा झाला. 'जतरीले येसीन हंऽऽ. मी किनई तुह्यासाठी भातक्याचे पैसे जमा करून ठुयीन. बिलवुल्या आला नाई तं तू कसा नाराज व्हतं. तसी मी नाराज होईनं बरं...अं.' ओल्या कांच्या लुकलुकल्या.

गाव लोण्याचं. भिंती झरल्या की मातीचे रवेदार ढीग साचत. आणि त्या ढिगात जागोजाग डोह असत. मातीचे. बिलवुल्याची घरे. एखादा बिलवुला आम्ही पकडत असू. मग मी सुमित्राच्या डोक्यातील लांबसडक केस उपटायचो. मोठ्या मेहनतीनं मग तो केस त्याच्या तंगडीला बांधून त्याला त्या घरात सोडत असू. आणि आळीपाळीने...' बिलवुल्याऽऽ तुयी माय आली...दार उघळ्' असं दोनतीन वेळा म्हटल्यावर त्याला ओढत असू. तो बिलंदर बिलवुल्या दुसऱ्या बिलवुल्याला घेऊन येत असे. कधी कधी बिलवुल्या सापडत नसे मग मी नाराज व्हायचा. मग ती दुसऱ्या घरात त्याला सोडीत असे.

शुक्रवार दिवस होता तो. आठवडी बाजाराचा. आम्ही पोरं संध्याकाळी बाजारगाववरून येणाऱ्या रस्त्यावर बसत असू. आपापल्या बापाची वाट पाहत. अधून मधून कुणी बाजारातून येतांना दिसले की 'बजारवाले आले...गोपीले पिल्लं झाले...' हे पालुपद सांघिकपणे म्हणत असू.

'वोऽऽ मोठेबाऽऽ माहे बाबा आले नाहीत काय होऽऽ !' कुणीतरी पोर त्या माणसाला विचारीत असे. आणि तो सुद्धा 'येऊन राह्यला ना तुवा बाप.' अशी थाप मारून देत असे.

मी बाहेरच्या उंबरठ्यावर असाच बसलो असताना सुमित्रा आली. म्हणाली, 'चलतं काय माह्या संगं आखरातल्या खयात. माहे बाबा बजारातून येलोग.'

'मी नाई येत जाय.' मी झिडकारले.

तेवढात माय दारात आली. सुमित्रा म्हणाली–'पाह्यनं वो आत्या. हा माह्यासंगं खयात येत नाई· जवारीची रास हाय खयात. बाबा बजारातून येलोग चल म्हणलं याले.'

'जानं रे पोराऽ नाईतं भल्ला लुंगूर लुंगूर करते तिच्या मांगं ! जाय तिच्या संगं.' मायनं फर्मान सोडलं.

मांजर झाकट पसरत चालली होती. खळ्याचातल्या खाटेवर आम्ही बसलो होतो. तिने खळ्यात जावं म्हणून तिच्या मायनं तिला एक खुरम दिली होती. आपल्या चिमणीच्या दातानं तिनं ती फोडून दोन्ही चिपा माझ्या तोंडात टाकल्या नि ती फक्त आठोळी तेवढी चघळत राहिली. प्रेमाचा लगाम घालून स्त्रीजात अवलख अश्वालाही कशी काबूत ठेवते याची प्रचिती सुमित्रानंच दिली. एकदा वेटाळात एक पाहुणं पोर आलं. आणि त्याला आम्ही घेरलं. त्याला भूताचा खेळ दाखवावा असं ठरलं.

'तुया गावात भूतं हायेत काय रेऽऽ.'

'नाई व्वॉऽऽ.' पाहुणा पोरगा.

'मंग भूत पाह्यतं काय ?' मी.

'होऽऽ.' तो धीटपणे उत्तरला.

मग आम्ही मातीचा ढीग केला. त्यात एक

उभी काडी रोवली. एक आडवी काडी खोचून दगडाची अटणी दिली. तोंडात काडी धरून त्यास पाहुण्यास सांगितले.

'भूत दिसते काय रे.'

'नाई.'

'डोये वासून पाय.' आमचा सल्ला.

कुणी तरी आडव्या काडीवर दणका हाणला. आणि पाहुणा पोरगा 'अरे बाप्पाऽऽ मेलो वो मावसी' म्हणून बोंबलू लागला. त्याची मावशी मायसोवत भांडली. पोराच्या डोळयातील माती काढण्यास किती तरी वेळ लागला. त्या दिवशी सुमित्रा बोलेना. संध्याकाळी भेटली. म्हणाली, 'निर्रा भूत हायेस भूतऽ. असे कसे रे खेयता तुमी. आता खेयसीन नाऽऽ तं कट्टी !' त्या दिवसापासून भुताचा खेळ बंद झाला.

मारलेल्या चापटीच्या आवाजानं माझी तंद्री भंगली. स्वातीच्या हातावर चापटी बसल्यानं मी भानावर आलो. तिचं पाणी भरणं चालू होतं. भारतीने पायाची विहीर करून त्यात चम्पला... चिचोक्याच्या चिपट्या टाकल्या. स्वाती पाणी शेंदू लागली. भारतीची थप्पड हुकली की ती एक चिपटी घेत होती. असं करता करता तिनं राज फेडलं.

ह्या खेळांनी मला भूतकाळात नेलं. माझी कात गळून पडली होती. चाळीशी उलटलेला मी चौदा-पेक्षाही लहान झालो होतो. आमच्या गावच्या मारुतीची सातफुटी शेंदरी खोळ पडल्यावर तो एका फुटाएवढा झाला होता. मी तसाच झालो होतो. गलिव्हरसारखा दोन रूपात विभागला गेलो. लिलिपुटच्या राज्यातील मी लिलिपुटीयन झालो होतो. मुलं राज जिंकतात...हरतात. आम्ही किती कमावलं...किती गमावलं ? प्रतिष्ठेच्या घटात आता आम्ही विसावलो. घराबाहेर जाणं असुरक्षित वाटतं. आणि त्या तकलादू घटात वेगळी संसाराची कदोड मारतो.

ती डावडुबली...कटकटीच्या...निंबगड्डी...हे एक राज्य होतं. कधी कधी वाटते प्रतिष्ठेच्या घटात पगाराच्या...संसाराच्या...शहरी सुखाच्या कदोड-पायी एक राज्य गमावलं !

□ □

डॉ. मधुकर वाकोडे
'अमेय', राजर्षी शाहूनगर,
अंजनगावसूर्जी ४४४७०५
(अमरावती)

अनुक्रमणिका

भुलाबाईची गाणी

नलिनी विष्णूपंत पाध्ये

आमच्या भारतीय कलेचे पाश्चिमात्य कलेपेक्षा वेगळेपण दाखविणारी विशेष गोष्ट म्हणजे तिला असणारे परमेश्वरी अधिष्ठान हे होय. चित्रकला, शिल्पकला किंवा आमची वाङ्मयीन कलाकृती असो, तिचा प्रादुर्भाव ईश्वरी अधिष्ठानातून आहे, हे विचारांती लक्षात येईल. अंजिठा, वेरूळ येथील कला बुद्धदेवतेच्या आराधनेतून उगम पावलेली आहे. श्रीहरीच्या बासरीने येथील संगीत मंगलमय झाले आहे. रामायण, महाभारत हे ग्रंथ देवदेवतांच्या लीलांनी विलोभनीय झालेले आहेत. आमची संस्कृती आस्तिक आहे. ईश्वर आणि धर्म ह्यांच्या प्रेरणेने ती विकसित झालेली आहे. भारतीय सणवार आणि उत्सव म्हणजे तर आमच्या ईश्वरविषयक श्रद्धेची जीवंत प्रतिके होत. आषाढी पौर्णिमेपासून कार्तिकी पौर्णिमेपर्यंत येणारे नागपंचमी राखीपौर्णिमा, कृष्णाष्टमी, पोळा, हरतालिका, गणेशोत्सव, भुलाबाईचा सण, नवरात्र, दसरा आणि दिवाळी हे सर्व देवपूजेला प्रवृत्त करून ईश्वरावरील श्रद्धा वाढविणारे आहेत.

आमच्या घरांतील कर्ते वयोवृद्ध स्त्रीपुरुष भारतीय संस्कृती ज्याला म्हणता येईल ती ह्या सर्व सणाउत्सवाद्वारेच घरांतील सुना, मुली आणि नातवंडे ह्यांच्या मध्ये रुजवितात. आम्ही ती जोपासावी, जतन करून ठेवावी अशी त्यांची मनापासून इच्छा असते.

भुलाबाईचा सण हा घराघरातील साधारणपणे १४ ते १५ वर्षे पर्यंतच्या छोटया बालिकांनी साजरा करण्याचा एक आनंदोत्सव आहे. हा सण एका दिवसापुरता मर्यादित नसून भाद्रपद पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमा म्हणजे कोजागिरीपर्यंत संपूर्ण एक महिनाभर चालतो. भुलजा आणि भुलाबाईचा जोड त्यांच्या चिमुकल्या बाळासह एका सजविलेल्या कोनाडयांत किंवा मखरांत रांगोळी, तोरण, केळीचे खांब लावून व पूजा अर्चा करून भाद्रपद पौर्णिमेला स्थापन केला जातो व दररोज तिसऱ्या प्रहरी समूहाने गाणी गाऊन, खिरापती वाटून व शेवटच्या दिवशी जागरण करून हा सण साजरा केला जातो. महिनाभर प्रत्येक दिवसाच्या तिसऱ्या प्रहरी गल्लीगल्लीतून, रस्त्यावरून लहान मुलींचे घोळके हाती टिपऱ्या घेऊन क्रमवार एकेका घरी जाऊन एका सुरांत टिपऱ्यांच्या तालावर भुलाई गीते तिन्हीसांजा होईपर्यंत म्हणत आनंदाने हिंडताफिरतांना दिसतात. त्यांची चिवचिव मन वेधून घेते. असा घोळका पाहिला की वाटते, पुन्हा बाळपण यावे आणि मग मस्त खुशीत टिपऱ्या घेऊन गाणी गात घराघरांतून खिरापती खात फिरावे ! पण छे ! गेले क्षण, दिवस, पुन्हा कां येत असतात ? आज आमचं बाळपण आम्ही आमच्या ह्या लहानग्या चिमण्यांना देऊन टाकलं आहे. ती परंपरा त्या पुढे चालवणार आहेत. नव्हे ती आपोआप नकळत त्यांच्या लेकी, सुना, नातीपर्यंत आणि त्याहीपुढे गतिमान होणार आहे. त्यातूनच आमची भारतीय संस्कृती टिकून राहणार आहे.

आमचे युग विज्ञानयुग आहे. आजच्या मुलांची जिज्ञासा प्रखर आहे. आकाशातील मेघांचा गडगडाट ऐकून—'सासू तुझी दळण हे दळीते मुला रे !' एवढें समजावल्याने त्यांचे समाधान होत नाही. आकाशांतला चंद्र आरशात दाखवला की संतुष्ट होणारी आजची नवीन पिढी नाही, आजच्या

अनुक्रमणिका

मुलामुलींना प्रत्येक गोष्टीची शास्त्रसंमत मीमांसा हवी असते. आजच्या कोवळया लहान बालिका विविध लेखांतून डॉ. सरोजिनीबाई बावर यांनी चितारल्या तशा नाहीत. वेणीफणी करून, काजळ-कुंकू लेऊन, बुगडया झुबे घालून, गळयांत वज्रटीक बोरमाळ लेवून, रेशीमकाठी परकरपोलका घालून, हातात रंगीबेरंगी टिपऱ्या घेऊन नाचत बागडत जाणारे चिमण्या बालिकांचे घोळके आज पाहायला मिळणे कठीणच ! आईने घालून दिलेली पांचपेडी वेणी आज वेडी ठरली आहे. त्यांच्यावरली मोत्याची जाळी हरपून गेलेली आहे. टिपऱ्या तर बाजारांतूनच नाहीशा झालेल्या आहेत. बॉबकट, मॅक्सी, बेलबॉटम अशी आजची वेषभूषा, केशभूषा. तथापि सुदैवाने भुलाबाईची गाणी मात्र बदलली नाहीत. घराघरातून परंपरागत महत्त्वाची भुलाबाईची गाणी आजही टिकून आहेत. ह्या गीतांबद्दलची आस्थाही कमी झालेली नाही. पण मुलींची जिज्ञासा वाढती आहे. चवथ्या वर्गातल्या लहान मुली गाण्यांचा अर्थ विचारतांना दिसतील. मंडोवा, खंडोवा म्हणजे काय ? वर्सा वर्सा आवसनी म्हणजे काय ? निळचा घोडयाचे पाय उलटे कां ? आणि घोडा निळाच का ? बाळाचे नाव हनुमंतच का ?असे कितीतरी प्रश्न विचारवंतांना चिंतनशील बनवितात. त्यादृष्टीनेच लोकसाहित्यांतील बरीचशी पुस्तके वाचून मी अभ्यास केला. महाराष्ट्र लोकसाहित्यसमितीच्या प्रमुख डॉ. सरोजिनीबाई बावर यांनी केवळ परंपरागत प्रतिमा आपल्या लेखांमधन साकारलेली आहे. रा. चिं. ढेरे, दुर्गा भागवत, डॉ. सविता जाजोदिया, पोहनेरकर, श्री. ना. बनहट्टी, भाऊ मांडवकर तसेच डॉ. मधुकर वाकोडे या आणि इतरही अनेक विद्वानांनी संशोधनात्मक लेखन करून लोकसाहित्यांतील गीतांचे तसेच भारतीय सणवार व चालीरीतींचे सुसंगत विवेचन केलेले आहे. अगदी अलीकडे म्हणजे इ. स. १९७९ मध्ये डॉ. सरोजिनीबाई बावर यांनी 'भोंडला–भुलाबाई' हे पुस्तक प्रकाशित केलेले आहे. विशेष म्हणजे ह्या पुस्तकांत भोंडला व भुलाबाईच्या परंपरागत गीतमालिकेशिवाय वि. का. राजवाडे, डॉ. मधुकर वाकोडे व अनंत बाबाजी देवधर या विद्वानांचे संशोधनपर लेख आहेत. त्यांत विशेष उल्लेखनीय लेख डॉ. मधुकर वाकोडे यांचा 'हनुमंताची निळी घोडी' हा आहे. हा लेख म्हणजे भुलाबाईच्या गाण्यांतील अर्थ शोधण्याचा एक स्तुत्य उपक्रमच म्हटला पाहिजे.

भुलजा आणि भुलाबाई म्हणजे शिव आणि पार्वती. हा उत्सव सोहळा म्हणजे शिवपार्वतीचा पूजाविधी. ही पूजा वऱ्हाड व खानदेशांत होते. पश्चिम महाराष्ट्रांत भोंडला म्हणजे हादगा ह्याचे महत्त्व जास्त आहे. हादगा म्हणजे हस्त नक्षत्र. हस्तनक्षत्राचा पाऊस हा कृषकांच्या दृष्टीने फार आनंददायी मानला जातो. हा पाऊस पिकांना पोषक ठरतो. इंद्र हा वर्षणशील आहे. तेव्हा ही एकप्रकारे इंद्रपूजा होय. इंद्रांला मेघरूपी ऐरावत प्रिय तेव्हा ही मेघपूजा. मेघ धरतीवर बरसतो. आकाशाशी धरणीचे नाते जुळते. धरती म्हणजे आई अर्थात लक्ष्मीमाता. ऐरावतरूपी मेघ म्हणजे बाप. अशी ही गजलक्ष्मीची संकल्पना. म्हणून हादग्याला दोन हत्तीचे समोरासमोर सोंडेत माळ घेतलेले चित्र काढून त्याची पूजा केली जाते. अशी ही पश्चिम महाराष्ट्रांतील हादग्याची पूजा. वऱ्हाड खानदेशात पूजा करतात भुलजा–भुलाबाईची. ह्या भुलाबाईच्या गाण्यांच्या अर्थात पूजेचा भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने विचार करून अर्थ लावणे अगत्याचे आहे.

भुलाबाईच्या उत्सव सोहळयाबाबत तीन महत्त्वाच्या गोष्टी अशा–

(१) भुलोजी व भुलाबाई ही शंकर पार्वतीची रूपे. ही पूजा शिव–शक्तीची पूजा होय.

(२) भुलजा–भुलाबाईचा सलग जोड असणे आवश्यक आहे व त्यासमोर बाळ. हा बाळ म्हणजे आमच्या गाण्यातला हनुमंतबाळ अर्थात यक्ष संप्रदायातील हनुमंत वीर देव.

(३) भुलजा–भुलाबाई समोर बाळ असणे म्हणजे सर्जनशीलतेचे एक प्रतीक ह्या गाण्यातून प्रतीत होते.

ह्या तीनच महत्त्वाच्या गोष्टींचा विचार भुलाबाई गीताबाबत अत्यंत आवश्यक आहे. पूर्ण विचार आणि अभ्यास केल्यानंतर निश्चितपणे सांगणे शक्य आहे की, केवळ स्त्री जीवनाच्या सासुरवासाची कहाणी ह्या दृष्टीकोनातुन भुलाबाई

ष्या गीताकडे पाहणे सर्वथैव चुकीचे आहे. त्याकरिता मुळांत भुलाईची गाणी कोणती? आणि पुढे त्यांत वाढ करून नंतर समाविष्ट झालेली गीते कोणती? ह्याचा विचार आवश्यक आहे. प्रथम फक्त मूळ स्वरूपांतील भुलाईस्तवनपर पूजागीते कोणती हे पाहूं या. अर्थात तदनंतरची सर्व गीते जी आज म्हटल्या जातात ती सर्व स्त्रीने आपल्या सांसारिक दु:खांना वाचा फोडण्याकरता रचलेली गीते होत. मुख्य भुलाई गीते येणेप्रमाणे—

पहिली ग पूजाबाई । देवा देवा साजे ।।गांठीला मंडोवा । केळी केळी खंडोबा ।। खंडोबाच्या नारी बारी । वर्सा वर्सा आवषणी।। आवषणीची पाणी तसं गंगेचं पाणी ।। गंगेच्या पाण्याने । वेळीला भात ।। जेविला कंथ । राणा भुलाबाईचा।। ठोकिला राळा । हनुमंत बाळा ।। हनुमत बाळाचे । लांब लांब झोके ।। तिकाईचे झोके। भाऊ भाऊ टेकती ।। मातापूर झळकती । झळकतीचं एकच पान । दुरून भुलावाई नमस्कार ।। १ ।।

एवढीशी गंगा । झुळुझुळु वाहे ।। तांव्या पितळी नायको। हिरवी टोपी बायको।। हिरवी टोपी हारपली । सर्पा आड लपली ।। सरपदादा एकला । जाई आंबा पिकला ।। जाई नव्हे जुई नव्हे । चिंचा खालची राणूबाई । चिंचा तोडत जाय ग।। पालखी तली भुलाबाई शंभर पान खाय ग ।। खाता खाता रंगली । तळयांत घागर बुडाली ।। तळचा तळचा ठाकोऱ्या । भुलाबाई जाते माहेरा जाते तशी जाऊ द्या ।। बोटभर मेणं लावूं द्या । बोटभर कुंकु लावूं द्या ।। जांभळचा घोड्यावर वसूं द्या । जांभळचा घोड्याचे उलटे पाय । आउल पाऊल अंजनगांव ।। अंजनगांवचे ठासे ठुसे । दुरून भुलाबाईचे माहेर दिसे ।। २ ।।

नदीच्या अल्याड । नदीच्या पल्याड ।। दामाजी सोनार । त्यानं घडविला ।। साखळयांचा जोड ।। घ्या घ्या भुलाबाई साखळयांचा जोड। घेता घेतां ऐंशी । पती गेले ब्याऐंशी। एवढा शृंगार कोणाचा । भुलोजीच्या राणीचा । भुलोजीची राणी ।। भरत होती पाणी । तिची सुटली वेणी ।। धावा धावा कोणी । धावतील तिचे धनी । बांधतील तिची वेणी ।। ३ ।।

एक लिंब झेलू बाई । दोन लिंब झेलू ।। दोन लिंब झेलू बाई । तीन लिंवू झेलू ।। तीन लिंब झेलू बाई । चार लिंब झेलू ।। चार लिंब झेलू बाई । पाच लिंब झेलू ।। पांचाचा पानोळा । माळ घाली हनुमंता ।। हनुमंताची निळी घोडी । येतां जाता कंवळ तोडी ।। कंवळाच्या पाठीमागे लागली राणी ।। अग अग राणी चिमनराणी । चिल्या (चिलया) बाळांला भूक लागली । सोन्याच्या शिंपल्यानं दूध पाजलं ।। निज रे निज रे तानन-बाळा । मी तर जाते सोनारवाळा ।। सोनारवाळाचा दिवा जळे । लेकराची हसली घडे ।। हसली वाटे रवे रवे । रव्याचे भाऊ रंजीस गेले ।। एक गेला खारिका । एक गेला खोवरा ।। खारिक खोवऱ्याचं आलं । जिऱ्या मिऱ्याचं काही नाही आलं ।। आणा आणा पारिस । उगाळा उगाळा काथ ।। आज आमच्यां भुलावाईचा पांचवा दिवस (१ ते ३० पर्यंत) ।। पांचव्या दिवशी बाळाला टोपी मोत्याने गुंफली झो झो रे ।। तांदुळाचं घुणं बाई अंगणी सांडलं । भुलाबाई बाळांतीळ पांचवा दिवस ।। ४ ।।

आडकीत जाऊ की खिडकीत जाऊं । खिडकीत होता बत्ता । भुलोजीला लेक झाला नांव ठेवा दत्ता ।।

याप्रमाणे नामविधी खिडकीत होती टिपरी...
नांव ठेवा झिपरी
खिडकींत होत्या खारका
नाव ठेवा द्वारका
टिपरी...झिपरी
सावू...बावू
बाणा बाई बाणा ।। वगैरे !
यानंतर गाणे संपले ।। खिरापत आणा ।। ५ ।।

अशाप्रकारची ही मुख्य शकुनाची पांचच गाणी प्रमुख भुलाई गीते होता. मुलींना खूप घाई असली आणि कमीत कमी गाणे म्हणावयाचे असल्यास ही पांचच गाणी म्हणून आटोपते घेतले जाते. ही पांच गीते गाईल्या शिवाय भुलाबाईच्या पूजेची सांगता होत नाही. अशी ही पांच महत्त्वाची गाणी. ह्याशिवाय जी इतर गाणी आहेत की ज्यातून भुलाबाईचा रुसवा, सासरच्या माणसांवरचा राग, त्यांनी केलेला सासुरवास वगैरे वर्णन आहे ती सर्व गाणी नंतर समाविष्ट

झालेली असावीत. त्या गाण्यांना गौण स्थान आहे. एक तर रोजरोज तीच तीच गीते गाण्याचा कंटाळा आणि स्त्रीजीवनातील दुःखचित्र ह्यातून इतर गीतांचा उगम असावा हे निश्चितच. डॉ. मधुकर वाकोडे ह्यांच्याशी चर्चा करतांना सहजच एकदा मी त्यांना प्रश्न केला, "भुलाई गीते ही यादव-कालीन आहेत कां? 'यादवराया राणी रुसून बसली' ह्या गीतावरून मला असे वाटते." त्यांनी खुलासा केला– "नाही तसं मुळीच नाही, कदाचित् तेवढे एक गाणं त्या काळात रचले गेले असेल पण भुलाई गीते त्यापेक्षा किती तरी अगोदरच्या काळात लिहिली गेली आहेत. ती बरीच पुरातन आहेत." ह्यावरून इतर गाणी गौण आहेत व मुख्य गीते उपरोक्त पांचच पूजेची भुलाई गीते आहेत हा माझा तर्क योग्य असावा. भुलाबाई सणाच्या बाबत महत्त्वाच्या तीन गोष्टी ज्या वर उल्लेखिल्या आहेत त्या तिन्ही गोष्टींचे ह्या प्रमुख पांच गीतांतून आकलन होऊ शकते.

पहिली गोष्ट शंकर पार्वती (भुलजा भुलाई) शिवशक्तीचे पूजन हे पहिल्या गीतांतील खंडोबा म्हणजे स्कंद आणि मातापूर म्हणजे माहूरची आंबा म्हणजे देवी पार्वती ह्यावरून दिसून येते. दुसरी गोष्ट भुलाई समोरचे बाळ. ही यक्ष संप्रदायातील क्षेत्रपाळ श्रेणीतील वीरदेवता. संरक्षक आणि संतती देणारी म्हणून प्रसिद्ध असलेली देवता डॉ. वाकोडे यांनी आपल्या लेखांत भुलाई गीतातून यक्षसंप्रदाय व शक्तीसंप्रदायाच्या पाऊलखुणा आढळून येत असल्याचे सिद्ध केले आहे. तिसरी गोष्ट भुलाई-समोरचे बाळ स्त्रीच्या सर्जनशीलतेचे प्रतीक सर्जन-शीलतेत स्त्रीत्वाची पूर्तता आहे. हे स्त्रीत्व ह्यांतच स्त्रीजीवनाची सार्थकता आहे. आमची स्त्रीजीवन विषयक भारतीय संस्कृती– (१) पती पत्नीचे अतूट नाते (भुलजा भुलाईचा सलग जोड) आणि (२) अपत्य (भुलाईचे बाळ) ज्यात स्त्री जीवनाची पूर्णता आहे. असा हा आमच्या भारतीय संस्कृतीचा अमोल ठेवा! ही संस्कृती लहान लहान बालिका भुलाईची गाणी गाऊन जोपासत असतात हेच ह्या गाण्यांचे खास वैशिष्ट्य!

भारतीय संस्कृतीची अशा प्रकारे जोपासना करणाऱ्या ह्या चिमण्या कळ्या म्हणजे साक्षात स्त्री देवताच म्हटल्या पाहिजेत! अशी ही भुलाबाईची गाणी आणि आमची भारतीय संस्कृती!

□ □

सौ. नलिनी विष्णूपंत पाध्ये
अंजनगांव–सुर्जी

अनुक्रमणिका

प्रवास

मनोहर सप्रे

१

पॅरिसला जाण्याची तारीख आता निश्चित झालेली. ती दहा सप्टेंबरच्या आसपास असेल. 'परदेशी प्रवास कसा करावा' ही एक मार्गदर्शिका हाती आलेली पडल्या-पडल्या चाळत होतो. डोळ्यासमोरची पाने हळहळू पारदर्शक झाली नी पलिकडचे 'पारी' दिसू लागले, एखाद्या मंद हलत्या प्रतिबिंबासारखे. त्यातल्या माणसांच्या रंगीबेरंगी थव्यात मीच तेव्हढा रंगहीनसा दिसलो.

२

मुंबईचा सहार एयर पोर्ट. टॅक्सीजच्या निर्जीव रांगा बाहेरच्या अंधारात विरघळून नाहीशा होणाऱ्या. आत मात्र सर्वत्र लख्ख दिवे. आपोआप उघडझाप करणाऱ्या विस्तीर्ण दारातनं माणसं अखंड जा ये करताहेत. दूरवर आतल्या बाजूला जाड कांचेची एक पारदर्शक भिंत, जाणाऱ्या न जाणाऱ्यांमध्ये उभी. कांचेआत प्रकाश अधिकच उजळ झालेला. काचेपलिकडे जाताच बाहेरचे आवाज बंद होतात—आणि नाते तुटल्याचे जाणवते. स्विस-एयर, एयर-फ्रान्स, लुफ्तांझा, सौदिया असली आभूपणांसारखी नाव असलेली काऊंटर्स ओळीनं सजलेली. प्रत्येक कौंटरमागे हास्यासाठी निवडलेले एकेक कमनीय शरीर उभं. पूर्वी ही सगळी नावे जाहिरातीतनं असूयेनं वाचलेली. आज मात्र त्यातलं एक आपल्या वाटचाला आलेलं. आंतले शोधक नजरेनं बाहेर बघताहेत, करुण कटाक्ष त्यांचे. कांचेला बाहेरून चिटकवल्यागत असंख्य डोळे आणि थरथरणारी वोटं. एक अनिश्चिती कांचेतूनही जाणवणारी. कुणी सांगावे. आंतल्या बाहेरच्यांची ही शेवटचीच भेट. स्पर्श केंव्हाच आटोपलेत. एक खंत सोबतीला घेऊन प्रत्येक जण आत येतोय्. आईदेखत बायकोचा नीट निरोप घेता आला नाही ही यातल्या कुणाची खंत तर आपण फारच आधी आलो ही दुसऱ्या कुणाची वेदना. यातले स्थितप्रज्ञ ते ज्यांना कुणीही निरोप द्यायला आलेले नाही, कंटाळ्याची स्पष्ट झांक डोळ्यात ज्यांच्या. प्रत्येकाच्या विमानाला थोडाफार उशीर असतो. लांबलेला निरोप असह्य म्हणून आंतले आंत व बाहेरचे बाहेर कंटाळलेले. दुसरे कांहीही करणे अशक्य म्हणून मी जवळच अचानक रिकाम्या झालेल्या एका खुर्चीत रूततो. माझ्या समोरचा व्हील-चेअरमधला एक अपंग ढकलणारा कुठेतरी गेलाय् म्हणून संदर्भहीन झालेला. ओंडका उचलल्यागत मूल काखोटीला घेतलेली एक श्वेत युवती समोरनं जाते. सोबतीला एक उमदा नर हातातली तिची बोटे चाळवणारा. लोंबकळणारे बालक अंगठा हरवल्याने अस्वस्थ झालेले. जाड भिंगांचा चष्मा, पिंजारलेले केस, भगव्या रंगाची एक तोकडी चड्डी हे अंगावरचे एकमेव वस्त्र, पायात झिजलेल्या मळक्या रबरी सपाता, खांद्याला मूळ रंग गमावलेली एक पडशीसारखी पिशवी, गळ्यातल्या पोवळ्यांच्या लांब माळेत कुठल्याशा बावांचा एक लोलकासारखा फोटो. सर्वत्र काहीतरी हरवल्यागत फिरतोय्. केवळ पांचा मिनटांच्या अवधीत माझ्या-समोरनं दोनदा गेलाय्. आता थकल्यागत हात मागे घेऊन टांगा फाकवून पाठमोरा उभा आहे. वाटलं कोणत्याही क्षणी हा गळा ताणून ओरडेल "या सगळ्यांचा अर्थ काय?" सगळेच मग

'एकमेकांना या प्रश्नाचे उत्तर विचारू लागतील सगळ्यांच्याच माना मग नकारात्मक हलू लागतील. एकेक जण मग काढता पाय घेऊ लागेल. हळुहळू विमानतळ रिता होऊ लागेल. शेवटी शिल्लक उरतील ती ओकी काऊंटर्स. प्रकाश–स्रोतांचे आडवे–उभे पट्टे आणि रनवेवरची विमानांची निर्जीव खेळणी. सर्वांगभर अचानकपणे आलेला सर्दपणा जाणवतो. पळसाच्या पानात जपून आणलेला शेवटचा विडा मी हळुवारपणे काढतो. जिभेच्या पहिल्या स्पर्शाने जाफरानी जर्दाचा सुगंध शरीरभर पसरतो.

३

माझे विमान आता खूप उंचावर आहे. चाळीस हजार फुटांच्या वर तरी असावे. उभे आयुष्य आता गहाण टेवल्यागत. मी चेयरमध्ये विनातिकिट असल्यागत अवघडून बसलेला. समोर रांगात अगणित डोकी खुर्च्यांच्या कडांवर तरंगल्यागत दिसताहेत–काळी, पांढरी, पिंजारलेली, नीटस, उजाड, उध्वस्त, व्यग्र, आनंदी, गोंधळली, गौतमासारखी आणि येशूसारखीपण. प्रत्येकजण ठरलेल्या दिशेला निघालेला. वाचलेल्या मार्गदर्शिकेतले सुरुवातीचे वाक्य मनात ठसठसते आहे– "आता तुम्ही संपूर्णपणे एकटे आहांत...आतां तुम्हीच तुम्हाला सांभाळायचे..." जवळीकीसाठी माझी नजर सर्वत्र भिरभिरते पण सर्वत्र एक अलिप्त मख्खपण भरून आहे. मी चेहऱ्यावर परिचयाचे स्मित पांघरून आहे, पण आजुबाजूचे खूळचाच्या स्मिताकडे बघावे तसे बघतात. मध्येच हवेच्या दबावामुळे विमानाला गदगदून हेलकावे बसतात. माझ्या सर्वांगातून कप भरून येतो. "प्लीज कीप योर बेल्टस् फासन्ड." स्पिकर्समधनं एअर–होस्टेसचा आवाज येतो. आवाजात एक व्यावसायिक जवळीक असते. तेवढ्यानेही बरे वाटून जाते. वळलेल्या नजरेला कोपराशी असलेल्या खिडकीच्या अंडाकृती चकतीतून निळघाभोर आकाशाची पोकळी जाणवते आहे. प्रवासात खिडकीशी असलो म्हणजे नेहमी मला एक अस्वस्थपण येते. लहानपणी प्रत्येक प्रवासात 'खिडकीबाहेर ओणवू नको' ही तात्यांची आज्ञार्थक सूचना असायची. एक कायम सूचना देऊन तात्या निघून गेले. त्यांच्या आत्म्याचं संरक्षण विमानाच्या आत कुठेतरी असावे.

४

विमानाच्या कंपनाचा आवाज आता कानात कायमचा रुतलाय. पेंगुळलेल्या रांगातनं खूप पुढच्या बाजूला कुणीतरी एक आता उठलेली असते. माझे भिरभिरणारे डोळे चट्‌दिशी तिच्यावर स्थिरावतात. मधल्या पॅसेजमधनं ती माझ्या मागच्या बाजूला जाते. सुगंधाची एक मादक लय अंगावरनं निघून जाते. खरं तर ती माझी कुणीच नसते, तरी पण मी आतून मोहोरतो. माझ्या एकूण नगण्यपणात 'मी एक पुरुष आहे' ही जमेची जाणीव स्वतःच्या अस्तित्वाला आधार देऊन जाते. पॅरिसमध्ये अशा अगणित बघायला मिळणार आहेत म्हणजे मी एकटा नसेन.

५

माझ्या उजव्या अंगाला हालचाल जाणवल्याने माझी नजर वळते. शेजारी जख्ख म्हातारी आहे. कारण नसताना ती झोपते व अकारणच उठते. विमानाखालचं निळंजर्द समुद्रपाणी तिच्या डोळ्यात गोठलेलं आहे. ही कुणाची कोण ? आता या क्षणी विमान कोसळलं तर ती माझ्या किंवा मी तिच्या मिठीत असेन.

□ □

मनोहर सप्रे
मूल रोड,
चंद्रपूर ४४२४०१ (महाराष्ट्र)

शाश्वत अशाश्वत

अरुण शहाणे

अस्ताव्यस्त पसरलेलं शहर. पण नीटपणानं. त्याच्या मधोमध एक उद्यान. रंगीबेरंगी फुलांच्या ताटव्यांनी मढलेलं. सूर्य मावळायच्या आधीच्या वेळात ते सजत असतं धजत असतं. एक कारागीर सारखा खपत असतो, त्याच्या ऐटबाज दिमतीला. म्हणत असतं–माझं अत्तरांचं कारंजं, हे पाचूचे दागिने, मोत्यांच्या दाण्यांची ही कोंदणं, हे फायांचे आकार सगळं सगळं ठिकठाक करून ठेव. उद्यान अगदी कण न् कण अत्युच्च कारागिरीचा राबवत असतं आणि नटत असतं.

सूर्य माथ्यावरून ढळल्यापासून तो क्षितिजाला टेकेपर्यंतच्या वेळांत उद्यानांत कुणा ना कुणाची जा–ये चालते. कारागिराची अप्रतिम हातोटी ते डोळे भरून न्याहाळतात. क्षणभर का होईना मनावरचा भयानक शीण, ताण विसरतात. सगळीच्या सगळीं फुलं मुलांना जवळ करतात भेदभाव न करता. झोका झोका खेळणाऱ्या उनाड, व्रात्य मुलांना गुलमोहोर खुणावत राहतो. पूर्ण मुभा असते त्याची कितीही फुलं तोडून न्यायला. आणि त्यांनी फुलं जरी खाली सांडून टाकली, तरी उंदडता उंदडता रप्कन् आपटी खाणाऱ्या मुलांना खरचटू देत नाही ती. त्यांच्या निरागस हसण्या–खिदळण्यात स्वतःचं हसणं मिसळून देतात.

सगळीच्या सगळी ही फुलं तारुण्यात पदार्पण केलेल्या वा करूं पहाणाऱ्या आपल्यासारख्याच फुलांना जवळ बोलावून घेतात व भुंगे आणि फुलांच्यातलं आकर्षण समजावतात, नाती समजावतात. त्या फुलांचे आपसातील गैरसमज दूर करण्यासाठी उद्यानातली झाडं, सावली त्यांच्यासमोर ठेवतात. पानगळीनं त्यांना दिलासा देतात स्वतः !

सूर्याला आता घराआड दडायचे वेध लागतात. तसतसा स्वच्छंदी वाराही अस्वस्थ होतो. हे झाडांचे शेंडे त्याला उद्यानाबाहेर जाऊंच देत नाहीत. दमल्या भागल्या या जीवांना घरी परत जायच्या आधी पाहुणचाराला यायचा आग्रह धरतात. एखाद दुसऱ्या हमालांना, हातगाडीवाल्यांना रस्त्यानं चालता चालता आत शिरायचा मोह अनावर होतो. पण त्या बिचाऱ्यांना तेवढासुद्धा वेळ नसतो. कामं अजूनही करायचीच आहेत ढीगभर, खंडीभर ! माणसांनी फुललेल्या उद्यानाचा हेवा फक्त वाटत असतो. क्वचित् कुणी हमाल, हातगाडीवाला गाडी हातातनं सोडून देऊन बाहेरच्या झाडाखाली टेकेल, कधीपासून लागलेली तहान दोन प्याले पाणी पिऊन भागवेल, तोंडावर ते पाणी शिंपडून घेईल. आणि चालायला लागेल आपला रस्ता. उद्यानाचं नटणं–थटणं–मुरडणं त्याच्या खोल गेलेल्या डोळ्यात कसं बरं शिरणार ? आयुष्याच्या वाटांवर ज्यांना फक्त उन्हानं चटकेच दिले, पोळलं त्या थकल्या भागलेल्यांना देवळापेक्षाही इथं गार विसावा सहज मिळतो, ही पाणपोई वाटते त्यांना !

माणसातली पिकली पानंही आपलं हक्काचं विसावा घेण्याचं ठिकाण म्हणून–आपली जडशी पावलं, गांजलेलं मन घेऊन इथंच वळतात नेहमीच्या सरावानं. त्यांचे चेहरे इथंच खुलतात त्यांच्यावरच्या सुरकुत्यांसकट ! पोटच्या तरण्याताठ्या मुलांमुलींची तोंडची मुक्ताफळं ऐकून

कून अंत:करणात खोल पिळवटून आलेलं असतं–को ते या घरात राहणं, नको ते परावलंबी जणं ! अशा वेळी थोडासा का होईना विरंगुळा टावा म्हणून इथं आश्रय घेतात.

"अहो तात्या, ते जाऊ द्या हो ! चला आपण या आईस्क्रीमवाल्याला गाठू या. आमचे चिरंजीव माहित आहेत ? त्याच्यासाठी हाडांची काडं करून, पै–पैसा कडोसरीला जमवून त्याला वकील नदला. चांगली कमाई करतो बेटा. नुक्तेच त्याचे नाचे चार हात करून दिले. तर आता त्याचे हात आभाळाला टेकलेत. माझी अडचण व्हायला लागलीय. उठता बसता माझं खाणं काढत असतो. आमच्या सौ. काय त्याचीच बाजू घेऊन मला नाही नाही ते बोलतात. जीव मला नकोसा झालाय अगदी ! म्हणून म्हटलं ते आईस्क्रीम तरी चाखू. तापला आत्मा तेवढाच थंड होईल !"

"अहो नाना ! आमच्या छोटचा सूनबाई तर –ऐकताय नाना मी काय बोलतोय ते ! अहो, असे तुरूतुरू धावताय काय–तो आईस्क्रीमवाला जात नाहीय कुठे तियून ! हा–तर मी काय म्हणत होतो बरं–हल्ली हे असंच होतं बघा नाना–बोलता बोलता विसरायला होतं हो !"

"तात्या ! तुमच्या त्या छोटचा सूनबाईकडे नंतर बघू–आधी आईस्क्रीम पदरात पाडून घेऊ या ! पण तात्या ! तुम्हाला बाधणार तर नाही ना ? नाही तर, रात्री खडे फोडत बसाल माझ्याच नावानं !"

"नाना ! तर मी काय म्हणत होतो...हां... आमच्या छोटचा सूनबाई–अहो खरं सांगतो... महामायेचा अवतार तरी बरा हो ! इतकी कजाग, इतकी कजाग की, तिला सासुसासरे, दीर हे अगदी कस्पटासमान ! आपला नवराच काय तो सर्वस्व तिचा. कधी समज येणार या हल्लीच्या पिढीला–विठ्ठला, पांडुरंगा ! यमराजा, सोडव रे बाबा तुझ्या या यातनातून सत्वर ! जीव मेटाकुटीला येतोय बघ."

दोघंही पुढ्यातलं आईस्क्रीम फस्त करून हात झाडून मोकळे झाले. हळू पावलं टाकत गेटबाहेर आले. कपाळावरचं आठयांचं जाळं तरी तसंच कायम ! आता तर कारण साक्षात् अंधारच दत्त म्हणून पुढं राहिलाय त्या दोघांच्या. जबरदस्त ओढ तरी पण त्यांची पावलं खेचतच आहे, आपलेपणा नसणाऱ्या घराकडे !

काही क्षण थबकून राहिलेला आनंद उद्यानातून बाहेर पडू लागलाय. अंधारानं त्यालाही सोडलेलं नाही. आता या शाश्वत अंधारात जगायला तर हवंच म्हणून घरोघरी, रस्त्यांवर क्षीण दिवे लावलेत. पृथ्वीवर या दिव्यांना झगमगाट म्हटलं जातं. शिवाय तथाकथित भरधाव धावणाऱ्या वाहनांना मागंपढं, बाजूला दिव्यांची क्षीण ठिगळं आहेतच लावलेली. मालकीचं वाहन बाळगणाऱ्याला इथं पृथ्वीवर बडचा आसामीत गणलं जातं. पण, या क्षीण दिव्यांना अंधार हासत असतो–तो हासण्याचा आवाज ऐकलाय कुणी ?

उद्यान आता रितं झालंय. उद्यानाचा तो थाटमाट अंधारानं गिळून टाकला आहे. त्याच्या बाहेरची रुंद डांबरी सडक मात्र दिव्यात ओथंबून वहात चालली आहे !

अरे पण ! उद्यानाच्या कंपाऊंडच्या पलिकडं नदीकाठी ते काय जळतंय ? कुणा निष्प्राण देहाची राख बनते आहे आस्ते आस्ते ! उद्यानातला तो क्षणभंगूर आनंद लुटताना या अजून एका शाश्वताला कुणी डोळे वळवून पाहिलंय, चुकून कधी ?

□ □

अरुण शहाणे
नगर पुणे रोड, नॅशनल बॅटरीजसमोर,
कडेगाव, अहमदनगर

अनुक्रमणिका

निरक्षरांचे अक्षरलेणे

अनुराधा अ. वऱ्हाडे

निरक्षराचे जे साहित्य त्या लोकसाहित्याची अनेक अंगे आहेत. त्यापैकी लोकगीत हे एक महत्वाचे भरदार असे अंग आहे. ते तेजस्वी अंग म्हणजे खेडुताच्या जीवन–संस्कृती, रीतीरिवाज आदींचे जिवंत चित्र उमटविणारा एक स्वच्छ आरसा आहे. ह्या आरशात डोकावून पाहिले तर खेडुतांनाच नव्हे तर आपल्यासारख्या शहरवासियांना सुद्धा आपले प्रतिबिंब न्याहाळता येते. आजपर्यंत ज्या थोर कवींनी काव्ये रचली, गीते रचली त्यापेक्षा लोकगीते काही कमी दर्जाची नाहीत. ती गीते अतिशय भावस्पर्शी, वास्तवदर्शी, भावसौंदर्याने, कल्पनावैभवाने नटलेली आहेत आणि म्हणूनच ते निरक्षरांचे अक्षर लेणे !

"सांगा हो मायांनो, सांगा हो बायांनो
माही माय गेली कोण्या गावा
माझ्या जीवाचा इसावा
आहे वसली कोण्या देवा
आता नाई मी फुगीन, नाई खेळाया जाईन"

ह्या गीतातील शब्दरचना, अंतरीचा ठाव घेणारी आहे. हृदय हेलावून टाकणारी आहे.

"घे झोका, घे झोका, घे झोका
तुझ्या बापाचा आंधीचा झोका
तुझ्या मायचा मधला झोका
तुझ्या राजाचा आखरी झोका"

ह्या गीतातील गोडी किती अवीट आहे. ह्या लोकगीतातून स्त्रीसुलभ अंतःकरणातील ओलावा, हृदयाला भेदणारे अनुभवाचे बोल दिसतात.

"पित्या तुहे जरी वोल–जाई मोगऱ्याचे फुल
काय सोयऱ्याले त्याचे कळणार खरे मोल"

मराठी स्त्रीच्या भावविवात माहेरच्या मायेची अधीरता ही फार मोठी वाब आहे. माहेरच्या मायेची ऊब आपल्याला संसारात सदैव लाभावी अशी एकच आशा तिच्या मनी असते व ती आशा सफल करणारा एकमेव आधार म्हणजे भाऊ.

"कुपाच्या आसरानं वाढते हिरवे तन
भावाच्या शेजाऱ्यानं नांदे खुशाल बहीण"

माहेरच्या कुलदीपकाला बहीण विसरू शकत नाही.

ह्या अनामिक अहेतूक रचनेमध्ये मानवी मनाचा सहज आविष्कार दिसून येतो.

"भाऊ म्हणतो वहिणीला वाढ दही
भावजयी म्हणते दही इरजलं नाही"

पती–पत्नी विषयक लोकगीतेही मोठी हृदयंगम आहेत.

"तसला भरतार कधी भोळा म्हणु नाही
नाग उशाचा काळा जहरी मोठा वाई"

तान्ह्या बाळासंबंधीच्या अनेक ओव्या आहेत. काही ओव्यातील काव्यशक्ती तर उच्च दर्जाची आहे. त्यातून वात्सल्य भरभरून वाहते.

"रूपगुण आहे, पुरते देवा दे आयुष्य
माझ्या रे तान्हेबाळा, तुझ्या मागते पायास"

"देवाचा देवपाट फुलानं शोभिवंत
मायवाप लेकरान भाग्यवंत"

बापाला नेहमी मुलगी आवडत असते व आईला मुलगा. आपली लाडकी मुलगी उद्या सासरी जाणार ह्याची त्याला जाणीव असते व तो तीव्रतेनं म्हणतो,

"वाप म्हणे लेकी लाडकी होवू नको
जाशील परघरी वेडी माया लावू नको"

आपली सोन्यासारखी चिमणी सासरी पाठ-

अनुक्रमणिका

बायची व तिच्यासाठी योग्य असा वर शोधायचा, म्हणजे किती कठीण काम.

" बाप म्हणे लेकी–लेकी गुळाचे घागरी
लावण्य तुझे घालू–कुणाचे पदरी"

सासरी जायचे म्हणजे किती करुण प्रसंग. साऱ्यांच्याच डोळयाला धारा लागलेल्या असणार. सासरी सुखाने नांद म्हणून तिला सारी वडील मंडळी उपदेश करतात. आईबापाला तर आता मुलीपेक्षा तिच्या सौभाग्याची जास्त काळजी वाटायला लागते.

"माझे हे आयुष्य उणे करी गणया
घाल सखीच्या चुडे राखया"

"संसारी सुखात आहे दुःख मिसळले
लगीन थाटात करिती परी डोळया पाणी आले"

संसारातील सारे बरेवाईट अनुभव ह्या ओव्यात ओतलेले आहेत. सासुरवास हा शब्द किती भयंकर आहे. परंतु कितीही सासुरवास असला तरी सासरीच राहायचे. कारण लेक ही माहेरची पाहुणी आहे.

"सासरी सासुरवास, माहेरी माहेरवास
सत्तेचा परी घास, सासरीच हा"

सासरच्या वर्णनाला स्त्रियांनी अतिशय सुंदर अशा उपमा दिलेल्या आहेत. सासरचे बोल म्हणजे कडू कारल्याचे वेल, रेशमाच्या गाठी, सत्तेचा घास, वळचणीचा येता जाता लागणारा वासा, सडसड येणारे पाण्याचे शितोडे, पण मुलगी हे सारे आई-वापाच्या नावाला, कमीपणा येणार नाही म्हणून सोसते.

"सासरचे बोल कडू विषाचे ग प्याले,
तुझ्यासाठी गोड केले माय बाई"

" स्त्रियांचा जन्म नको घालू सख्या हरी
रात्र ना दिवस परक्याची ताबेदारी"

जिथे तिला सासुरवास होतो. तिथेच तिचे कौतुकही होते. पहिली सून ही लक्ष्मी समजली जाते. पहिल्या गर्वारपणाचे कौतुकही केले जाते. व चिंताही वाटते. एखाद्या वेळी त्यात तिचा बाळ गेला, तर तिच्या दुःखाला पारावार राहत नाही. सारे तिला समजवतात.

"पुरे हो रडणे धीर ना सखी सांडी
शोभेल पुन्हा मांडी तान्हे बाळाने"

देवादिकांवर त्यांच्या अतिशय भरवसा. तो त्यांच्या ओव्यातून दिसतो.

" मोरया रे देवा–तुला लिपीन शेंदूर
पुत्र दे सुंदर माझ्या लेकीला"

राम–सीता वनवासाच्या, सत्यवान–सावित्रीच्या किती तरी सुंदर ओव्या मनाला वेध लावणाऱ्या आहेत. तुळशीचे महत्त्व त्यांच्या ओव्यातून दिसून येते. तुळशीची पवित्र भावना सर्वच स्त्रियांमधे आहे.

" काशी काशी म्हणून लोक जाती
काशी माझ्या, अंगणात तुळसादेवी"

जेथे साधुसंताचा प्रेमाचा पाऊस पडला, अशा विठूच्या पंढरपुरीच्या आयुष्यात एकदा तरी पाहावं असा वेडा भाव त्यांच्या मनात असतो.

"जाऊ ग पंढरी–उभी राहु ग भोवरी
तेणे मुक्ती चारी–येती हाती"

विठ्ठल रखुमाईला ते आईबाप मानतात.

" विठोबा माझा बाप–रखुमाई माझी आई
बहीण चंद्रभागा पुंडलीक माझा भाई"

पंढरीचीच नव्हे तर मुंबईची मुंबाबाई सुद्धा त्यांना तेवढीच श्रद्धेची आहे.

" मुंबईची मुंबाबाई–तिची सोन्याची कंबर
निरी पडते शंभर पैठणीची"

त्या काळच्या स्त्रिया घरातच गुरफटून असल्या तरी त्यांच्या कानावर अनेक गोष्टी येतात. त्यामुळेच अनेक ऐतिहासिक ओव्याही आहेत.

" रायगडच्या किल्ल्यापरी सोन्याचा पाळणा
शिवाजीचा बाळ तान्हा राजाराम"

आग्र्याहुन सुटका ही तर महाराष्ट्रात सर्वांनाच परिचयाची आहे.

"खाऊच्या निमित्ये–बादशहा फसविले
शिवाजी बसून आले पेटाऱ्यात"

नारायणाच्या वधाची ओवी तर अतिशय सुंदर आहे.

"नारायणा मारीले–गंगाबाई रडे
आनंदीबाई पेढे–वाटीतसे"

त्याचप्रमाणे सुधारकांची नांवे सुद्धा त्यांच्या कानावर आहेत.

" पुण्याचे वैभव पुन्हा दिसेल ठळक
तेथे आहे देशभक्त टिळक"

अनुक्रमणिका

"एक देणारे स्वातंत्र्य प्रिय देशा हिंदुस्थाना
देई उदंड आयुष्य, देवा महात्मा गांधींना"

नुसती सुधारकांचीच नव्हे तर उद्योगपती सुद्धा त्यांच्या ऐकिवात आहेत.

"पैसेवाला मोठा मुंबईचा टाटा
मुळशीवर वरवंटा फिरविला"

व्रत, सण, सृष्टीसौंदर्य, ऋतुवर्णन ह्याचे सुद्धा त्यांच्या गीतात अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे.

"नागपंचमीला नको चिरू भाजीपाला
दया शिकवी हाताला"

"गुडी पाडव्याला घरोघर गुडी
पडू दे माझी कुडी देवासाठी"

"आई अंबाबाई पडते पाया लेक
चुडे अभंग राख जन्मभरी"

अशा ह्या लोकगीतातून, स्त्रीगीतातून, जाणवणारे नाद-माधुर्य लय उल्लेखनीय आहे. ह्यात अंत:करणाची व भावनांची जशी खोली आहे, तशीच कल्पनेची उंच भरारी सुद्धा आहे. स्त्री जीवनातील समृद्ध दोन दालने म्हणजे सासर व माहेर ही दोन दालनै पती, पुत्र, माता, भगिनी, बाप, भाऊ, सासू-सासरा, दीर, नणंद, लेक, जावई ह्या नाजूक नात्यांच्या धाग्यांनी बांधलेली आहे. ह्या नात्यातून अखंड वाहणारा प्रेमाचा झरा आपणास ह्या गीतांतून पाहावयास मिळतो. ह्यातील रमणीयतेला व माधुर्याला जोड नाही.

परंतु ह्या निरक्षरांच्या अक्षरलेण्यांचा आस्वाद रसिक दृष्टी ठेवूनच घ्यायला हवा. ह्यात उत्तुंग कल्पनाविलास आढळणार नाही, शब्दरचना ओबड धोबड असेल. परंतु भावना व मौलिकता आजही पटण्यासारखी आहे. आणि म्हणूनच काळाच्या ओघातही हे निरक्षरांचे अक्षर लेणे टिकून आहे.

□ □

सौ. अनुराधा अ. वऱ्हाडे
द्वारा डॉ. अ. गो. वऱ्हाडे
राधानगर-मोर्शी रोड,
अमरावती

हस्तलिखिते : आवाहन

महाराष्ट्रातील विविध ठिकाणी जुनी मौल्यवान हस्तलिखिते प्रकाशित न होता तशीच पडून आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा असा विचार आहे की, मौल्यवान हस्तलिखिते एकत्र करून आवश्यकतेनुसार त्यांची छपाई करून ती प्रकाशित करावी किंवा मायक्रोफिल्म करून त्यांचे जतन करावे. अशाप्रकारची हस्तलिखिते साधारणत: कुठे आहेत व ती कुठल्या स्वरूपात आहेत याची माहिती जर साहित्य संस्कृती मंडळाला देण्यात आली तर मंडळास कार्यवाहीच्या दृष्टीने ते सोईचे होईल. हस्तलिखिताची माहिती देताना मूळ लिखाण मोडी लिपित किंवा देवनागरीत आहे याचाही खुलासा करावा. प्राथमिक माहिती आल्यानंतरच मंडळ त्यावर पुढील विचार करील. याबद्दल संबंधितांना मंडळाकडून मानधन देण्याची सोय सध्या तरी नाही.

आपला
सु. द्वा. देशमुख
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई-४

गोवारींची सांस्कृतिक वाटचाल

शैलजा देवगावकर

गावाला लागून असणाऱ्या जंगलात टोळी करून राहणारी गोवारी जमात पूर्वापार गाई–म्हशी. पाळण्याचा मुख्य धंदा करणारी आहे. हिरालाल आणि रसेल ह्यांनी आपल्या Tribes & Caste of Central Provinces ह्या ग्रंथात त्यांच्या नावाची उपपत्ती–(gai–gao–the Cow–Gaol-is–Gowaris)–अशाप्रमाणे दिली आहे. अहिर आणि गोंड ह्यांची मिश्र जमात अशा त्यांच्यात लोककथाही प्रचलित आहेत.

त्यांचे विविध विभाग सध्या प्रचलित आहेत. गोवारी, गोंडगोवारी, इंजवार गोवारी, लांजेवार गोवारी इ. साडेबारा जाती आहेत, असे त्यांच्यातील वृद्ध मंडळी सांगतात. मात्र हिरालाल आणि रसेल ह्यांनी (१) गाय–गोवारी, (२) गोंड गोवारी आणि (३) इंगा किंवा मारिया गोवारी, असे तीनच विभाग दिले आहेत. मूळचे गुजराथचे राहणारे हे लोक भंडारा, यवतमाळ जिल्ह्यात जास्त प्रमाणात स्थायिक झालेत. चन्द्रपूर जिल्ह्यातही त्यांची वस्ती आहे.

दुधेरा देव, दुलादेव, वाघदेव, साखऱ्यादेव, मोठा देव आणि पूर्वजांच्या स्मृती कायम ठेवण्यासाठी म्हणून मृतपूर्वज हेच देव समजून, त्यांची पूजा करतात. ह्या सर्व पूजा प्रकारात 'ढाल' तयार करतात आणि त्या ढालीला महत्त्व असते. पूजेसाठी तांदुळाच्या सात मुठी मांडतात. त्यावर गुलाल, बुक्का, कुंकू आणि अक्षता टाकून मुठी मांडलेल्या देवाची पूजा करतात. प्रथम नैवेद्य कोंबड्याला असतो. कोंबड्याच्या समोर दाणे टाकतात. दाणे जर कोंबड्याने खाल्ले तर 'भाव घेतला' असे समजून देवाला भाव म्हणून कोंबडे कापतात. त्याचे रक्त आणि शिजविलेल्या मांसाचा नैवेद्य मग देवाला चढवितात व नंतर सर्वजण ग्रहण करतात. दुधेरा देवाची पूजा गायींचे संरक्षण त्याच्याकडून व्हावे म्हणून करीत असतात.

दिवाळी, जिवती, आखाडी, देवमायी ह्या सर्व सणात दिवाळी व देवमायीला जास्त महत्त्व आहे. दिवाळीच्या पाडव्याला 'ढाल' उभारण्यात येते. ढालीची पूजा रात्री होते. दुसऱ्या दिवशी ढालीला वाजत–गाजत, गायी खेळवत गायी बांधतात त्या ठिकाणी नेण्यात येते. त्याला 'आखर' असे म्हणतात. ढाल धरलेल्या माणसाच्या समोर आठ-नऊ माणसे नाचत नाचत 'विखे' गाणी म्हणत म्हणत पुढे जात असतात. आखरावर गायीने 'गोंदण खुदले' म्हणजे पाय लावला की 'बीरले' म्हणत नाचत नाचत ढाल तळयाकडे किंवा नदीवर नेतात. आणि मग ढाल शांत होते. ढाल गावात नेतात. त्याही वेळेस काड्या व 'माळू' (हरणाच्या शिंगापासून ढालीसारखेच बनवतात) ह्यांचा खेळ करीत प्रत्येकाच्या घरी जाऊन 'करोटया' (आगदा) मागतात. मग ते जमलेले धान्य एकत्र करून समाजाला पंगत देतात.

पौष महिन्यात रथसप्तमीला देवमाईचा सण येतो. माईच्या सणाला सर्व कुटुंबीय एकत्र होतात, आणि मुख्य माणूस, देवाला वडील समजून देवाची पूजा करतो. ह्या वेळेस देवाला भाजीवोनचा नैवेद्य दाखवितात. भाजीवोन म्हणजे शिजवलेले सर्व पदार्थ एकत्र करून झालेले मिश्रण. घरातील फक्त मुलगी सोडून जावयासकट सर्वजण हा नैवेद्य ग्रहण करतात.

गोवारींची जातपंचायत असते. गावातील वृद्ध व शहाण्या व्यक्तीला मुख्य म्हणून नेमतात. त्याला मदत करायला दोन व्यक्तींची निवड करतात. समाजातील व्यक्तींना अयोग्य वर्तनाबद्दल दंड करणे, त्यांचे शुद्धीकरण करून घेणे, भांडणाचा न्यायनिवाडा करणे इ. कामे त्या प्रमुखाला करावी लागतात. जातपंचायतीचा प्रमुख नेमण्याचे काम जसे होते, तसेच त्याला काढूनही टाकण्याचे अधिकार जमातीच्या लोकांना असतात.

गोवारींच्या प्रसुती, बारसे, विवाह व मृत्यू ह्या बाबतच्या चालीरीती देखील वैशिष्टचपूर्ण असून त्यांचे आदिम जीवन प्रतिबिंबित करणाऱ्या आहेत. एखाद्या स्त्रीचे बाळंतपण तिच्याच घरी (म्हणजे आईच्या घरी नाही) पण वेगळ्या झोपडीत करतात. पाच दिवस झाले की, पाचवीची पूजा असते. त्यानंतर सर्व घराचे व झोपडीचे सारवण करून शुद्धीकरण करतात. पाचवीला समाजातील लोकांना जेवण देण्याची पद्धत प्रचलित आहे. नंतर चार-पाच दिवसांनी केव्हाही लहान बाळाला नवीन कपडे शिवून गाई घरी येण्याचे वेळी ज्वारीच्या घुगऱ्या करून बाळाचे नाव ठेवण्याचा कार्यक्रम होतो. वयस्क बाई बाळाला पाळण्यात घालून त्याचे नाव ठेवते आणि इतर स्त्रिया गाणी म्हणतात. नाव ठेवण्याचा अग्रहक्क आजोबा किंवा आजीचा असतो. देवाचे नाव ठेवण्याची प्रथा जास्त आहे, पण आता आधुनिकीकरण झालेले दिसते. आईकडचेही आजोबा-आजी या कार्यक्रमास उपस्थित राहून लहान मुलाला व आईला भेटवस्तू देतात. विवाहसंस्थेच्या बाबतीत एकाच कुळात विवाह होत नाहीत. जोडीदार निवडण्यात वडील मंडळींना अग्रक्रम देण्यात येतो. आते-भाऊ मामेबहीणीचा विवाह चालतो. 'सासरा' म्हणजे 'मामा' आणि 'आत्या' म्हणजे 'सासू' म्हणून याच भाषेत एकाच नावाने संबोधण्याची प्रथा आहे. विधवा विवाहात लहान किंवा मोठ्या दिराशी विवाहाची सम्मती आहे. मेहुणीशीही विवाह सम्मत आहे. 'वधु-मूल्या'ची प्रथा आहे. साधारण दोन मण गहू किंवा ज्वारी व सोबत काही रुपये अशाप्रकारचे वधुमूल्य असते त्याला 'करोटा' असे म्हणतात. एखाद्याची पत्नी जर वापस गेली; तर पित्यास वधू-मूल्य वापस करावे लागते, स्त्री पळून जाईल या भीतीमुळे की काय, सहसा स्त्रीला वाईट वागणूक मिळत नाही. वधु-मूल्य टाळण्यासाठी कधी कधी 'कोटा पालटा' म्हणजे दोघा बहिण भावाचे लग्न दुसऱ्या घरातील भाऊ बहिणीशीच करावयाचे अशी प्रथा आहे.

दुसरा विवाह करण्याची प्रथा आहे. मात्र त्यासाठी पहिल्या बायकोची सम्मती लागते आणि स्त्रिया ती देतातही.

विवाह ठरविताना प्रथम मुलाचा पिता मुलीच्या पित्याकडे जातो. त्याच्यासोबत सोयरे मंडळी असतात. तसेच एक वयस्क स्त्री पण असते मुलाच्या पसंती-नापसंतीचा प्रश्न नसतो. सर्व मुलाच्या वडिलांवर अवलंबून असते. नंतर वधु-पित्याला घर व इतर बघण्यासाठी बोलावितात. 'घरपाहणी'च्या ह्या कार्यक्रमानंतर 'करोटा' म्हणजे वधु-मूल्य ठरते व विवाह पक्का करतात. वधूचे घरी साखरपुड्याचे पातळ, दागिने इ. नंतर घेऊन जातात. विवाहाचा मुहूर्त काढतात. ते सांगणारा 'मोहतुरिया' असतो. विवाहामध्ये भाच्याला फार महत्त्व असते. शिमग्यानंतर पुढे विवाह करतात. लग्नाचा कार्यक्रम एकूण पाच दिवस चालतो. प्रथम वर-वधूकडील मंडळी आपआपल्या घरी पाच मातीच्या चुली घालून कुंभाराकडून 'ऐंग' आणतात. यासाठी सर्व नातेवाईक मंडळी एकत्र होऊन गाणी म्हणत कुंभाराकडे जातात. कुंभार-कुंभारणीची पूजा करून जोडीने वाजत-गाजत मिरवत ऐंग वराच्या व वधूच्या मांडवापर्यंत आल्यावर त्या सामानाची पूजा करून ते सामान घरात घेतात. ऐंगाच्या सामानात गंगाळ, सगुण-माथन, लहान-मोठी मडकी, लहान दीपावली, माचणीवरील झाकणे इ. वस्तू असतात. सगुण माथन आणल्यानंतर बोहल्याच्या मागे काटसावरीची फांदी व तुळ्या रोवून, त्याला वडा-पुरी बांधतात व अक्षता टाकून पिवळ्या फडक्याने माथनीला बांधतात.

उमरी किंवा जांभळीच्या फांद्याचा मांडव घालतात. नवरदेवाची बहीण प्रथम डेरीची पूजा करते त्यानंतर जावई पाचदा डेरीला सूत गुंडाळतो, ह्याला 'मांडव सुतवणी' म्हणतात. गाणी इतर स्त्रिया म्हणतच असतात. मांडवाच्या जांभळीची

पाने तोडून बहीण व जावई ('त्यांना वैरा व वैरी' म्हणतात) घरच्या मंडळींना कांकणे करून बांधतात. त्यानंतर हळद लावण्याचा कार्यक्रम होतो. नंतर बोरीच्या झाडाची पूजा पाच सुवासिनींसह करतात. बोरीच्या झाडाला स्त्री समजतात व तिच्यासारखीच असंख्य मुले व्हावीत ह्या हेतूने त्या झाडाची पूजा करतात त्यानंतर वरात वधुकडे यायला निघते व गावाबाहेर मारोतीच्या देवळात थांबते. बैलगाडीसमोर नारळ फोडून तिची पूजा करतात. ह्या वरातीबरोबर स्त्रिया गाणी म्हणतच असतात.

नवरदेवाच्या डोक्यावर घोंगडी देतात. दोन वाशिंगे डोक्याला बांधली असतात. वधूसाठी पोशाख वराकडून जातो, तसेच वराचेही कपडे इ. येतात. नंतर मंडळी 'वीखे' म्हणत लाकडी घोडा तयार करून नवरदेवास नेण्यास येतात. बोहोल्यावर अंतरपाट धरतात. मामा तांदूळ वाटतो. नंतर नवरीचा मामा पाचदा 'लग्न लागला सावधान' असे म्हणतो. व लग्न लागते. व नाचगाण्यास सुरुवात होते. वऱ्हाडी मंडळींना जेवण देतात. नवरा–नवरीला अहेर करण्याची पद्धत आहे. सावरच्या झाडाचा पाट करून त्यावर नवरा–नवरीला बसवितात व स्नान घालतात, त्याला 'नानोऱ्याचा कार्यक्रम' म्हणतात.

मुलगी सासरी जाण्यास निघते त्याला 'दिव्याची वरात' म्हणतात. त्याआधी मुलीला मांडीवर घेऊन मुलीची आई तिला दूध पाजते. बैलाची, चाकाची व रेंगीची पूजा करतात व वरात निघते. वराच्या मांडवात बोहोल्याच्या मध्य बाजूने दिवा लावून त्यात नातेवाईक मंडळी तेल पुरवितात आणि स्त्रिया गाणी म्हणत नवरदेव–नवरीला आणतात. नंतर वधूकडील मंडळींना जेवण देण्यात येते व विवाहविधी संपतात.

मृत्यू झाल्यानंतर दफन करण्याची किंवा जाळण्याची प्रथा आहे. डोके दक्षिणेकडे व पाय उत्तरेकडे ठेवतात. मृत्यू–विधी आटोपल्यानंतर घरी आल्यावर दारू पिण्याची प्रथा आहे. ज्या ठिकाणी मृत्यू झाला असेल त्याठिकाणी कोंबड्याचा बळी देतात आणि मृत व्यक्तीसाठी आणि तिच्या आत्म्यासाठी म्हणून ते अर्पण करतात. घराच्या बाहेर त्या कोंबड्याचे मांस ठेवतात व कावळ्याची वाट बघतात. कावळ्याने जर ते मांस नेले तर इतर सर्व खातात. नाही तर रात्रीपर्यंत कावळ्याची वाट बघून मग गाईला खाऊ घालतात. विवाह आणि सण ह्यापूर्वी मृत पूर्वजांची पूजा करण्याची प्रथा आहे. निपुत्रिक पुरुष मेल्यास त्याला 'धाल' म्हणतात. त्याच्यासाठी बांबूची एक काठी रोवतात व आडवी वर एक काठी लावतात व दिवाळीपूर्वी त्याची पूजा करतात.

गोवारी पुरुषांचा पोशाख म्हणजे अंगात बाराबंडी, डोक्याला फेटा आणि खांद्यावर लांब धोतराचा सोगा. धोतर गुडघ्यापर्यंत आखूड असते स्त्रिया पातळ डब्बल करून लुगड्यासारखे उलटचा पदराचे नेसत असत. केसांचा अंबाडा घालीत आणि अंगात चोळी असे. अंबाड्याला केसोळ्या बांधीत असत. लग्न झालेल्या बाया लांब आडवे कुंकू लावीत असत, आणि कुमारी मुलींचं कुंकू गोल राहत असे, मात्र पोशाख आणि इतर राहणीचे आता आधुनिकीकरण झालेले आढळून येते. गोंदण्याची मात्र प्रथा आहे. स्त्रिया हातावर व पायावर सुद्धा गोंदवून घेतात. विंचू, झाड इ. चित्रे, सरळ–उभ्या रेषाही गोंदवितात गोंदविण्याचे काम बहुधा कोरकू गोंडांकडून करून घेतात. स्त्रिया हातात बांगड्या घालतात. लग्न झाल्यावर पितळी गाठ्या घालतात.

देवपूजेच्या पोथ्या वगैरे नाहीत पण बोलभाषेला 'भंडारी' म्हणतात. भाषेवर मराठीचा विशेषतः ज्या भागात राहतात त्या भागातील बोलीचा प्रभाव बोलतांना आढळतो. उदा.– काही खाल्लास काय? कोठी गेला होतास रे? येन रे येस नाईस; अशा प्रकारची मिश्रित वाक्ये आढळतात.

मानववंशशास्त्रज्ञ आदिवासींच्या अभ्यासात सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेला बरेच महत्त्व देतात. काही आदिवासी असे आहेत की, ते सुधारित जीवनात मिळून गेलेले आहेत, तर काही अजूनही निसर्गाच्या अवस्थेतीलच जीवन जगतात. अतिप्राचीन अशा त्यांच्या नैसर्गिक परंपरागत जीवनपद्धतीपासून ते किती दूर किंवा पुढे चालत आलेले

आहेत म्हणजे आपल्या आजच्या तथाकथित आधुनिक जीवनाच्या ते किती जवळ आलेले आहेत, त्यावरून त्यांचे सांस्कृतीकरण किती झालेले आहे याचे निदान करतात. हा निकष जर गोवारींच्या सामाजिक चालीरीती, विविध उत्सव व सण आणि विवाह संस्था व मार्मिक प्रथांना लावल्यास त्यांची सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेतील वाटचाल बरीच झालेली आहे, हे आपल्या लक्षात येते–

□ □

डॉ. शैलजा देवगांवकर
टेलिफोन एक्स्चेंजजवळ
वरोरा ४४२९०७
(जि. चंद्रपूर)

‘युगवाणी’ मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही बरेच अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा द्वैमासिक अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. तुमच्याकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या दोन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, **प्रथम** तुमच्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा–लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- **अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.**
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया खबरदारी घ्यावी. शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा. संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- तुमची वर्गणी संपलेली नाही ना ? तुमचे नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या नोंदीत आहे याची खात्री करून घ्यावी.

□ पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ.

॥ क वि ता ॥

होते एकटी मी....! / लिली अख्तर

चांदण्यांचा हैदोस
माझ्या उदासलेल्या उरात,
आभाळाच्या कबंधाची
हरवली वारात !

उर माझा स्मशानलेला,
चांदण्यांच्या अंधारात
आसमंती आसवांची
ठावूक नाही जात !

होते एकटी मी
माझ्या झिरझिर राहूटीत
'पॅंडॉर' ने केली रिकामी
पेटी माझ्या दिठीत !

आता कर्ज याचे त्याचे
बसले आहे फेडित,
उरता नाही उरले शून्य
जीवन सारे मोडित !

□ □

युगान्त / सुदेश शरद लोटलीकर

युगानंतरची घडण
घडण्यापूर्वीचं युग
त्याच्या मध्यपोकळीत असावं कुठंतरी
अपूर्ण सत्ययुग.

घडणारा नि घडवून घेणारा
यांच्या दरम्यान नुसता वारा
त्या वाऱ्यांचं देऊळ असावं
नि त्याचाच असावा देव....

आणि वारा आता
जातीवर गेलेला आहे
आणि दगडाची आकृती
पूर्ण झालेली आहे....

कोण घालतो घडऊ
नि घडतो आपण कसे
ह्याचा निर्णय कधी लागणारच नाही !
क्षितिजाचा कपचा हाती येणारच नाही !
आणि पौरुषत्व तर आत्म्याच्या शोधात
आपुलंच शीस्न पोखरण्यात दंग !
परमेश्वरा—
आम्हाला क्षमा नाही
कारण आम्ही काय करतोय
ते आम्हाला नीट उमगतय्....

आणि आता आपण
उमगल्यानंतरच्या सावरण्याच्या
कृतीच्या शक्यतेच्या पलीकडे आहोत.
एव्हांना, युगान्त झालेला आहे.
आणि पंजावर गोंदलेला शाप
मुठीत दडवून युग संपूर्ण भ्रमात गळागच्च...
" त्रयस्था, तांबडं फुटलं की उठव रे बाबा ! "

□ □

काळापाऊस / नंदकुमार शेंडगे

शतकानुशतके मातीवर कोसळणारा
काळा पाऊस थांबत नसतो.
काळ्या पावसाचा वासही बदलत नसतो.
आपण इतिहासाच्या पायऱ्या उतरून;
वर्तमानाच्या वाटेवर उभे राहिलो तरी,
आपल्या स्वागतासाठी वास्तवतेची संगीन रोखून
'दिवस उभाच असतो;
त्या दिवसाला सलाम ठोकून,
आपण भविष्याचे काळे आकाश पाहात असतो–

काळा पाऊस
थांबत नसतो.
काळ्या पावसाचा काळा रंगही बदलत नसतो —
आपण काळ्या पावसाचा काळा रंग बदलण्याचा
जेव्हा आटोकाट प्रयत्न करीत असतो;
तेव्हा आपल्या देहातून तांबडे गुलमोहर मातीवर
सांडत असतात
रक्ताचे–
आणि
आपण;
इतिहासाच्या वाटेवर
फक्त एक मैलाचा दगड बनून उभे राहातो अटळ.
तदनंतर आपली तेवढीच ओळख शिल्लक राहतेय
कायमची मातीवर–

काळा पाऊस
कोसळतच असतो;
न थांबण्यासाठी अविरत,

□ □

विहीर / डब्ल्यू. कपूर

स्वच्छ दिसते आहे ते पाणी माजलेले.
कित्येक वर्षांत उपसणी झालीच नाही
दलदलीसारखा खोलवर गाळच गाळ साचलेला
काठावरचे रेखीव शिल्प फसवे आहे मित्रा
अरे हिच्यात उतरलेले वर आलेच नाहीत.

□ □

घोडे / मदन हजेरी

कालपासून घोडे भिंतीवरून
खाली उतरलेत.
आणि
धावत सुटलेत. हिरवळीकडे कुरणातल्या.
तिथे आता निळ्या आभाळाखाली
झुळझुळणारे झरेही असल्याचं समजलंय त्यांना.
खरारा, पेंड, चणे
आता काहीच नकोय त्यांना
ते कंटाळलेत चित्रातच राहायला....

टापांचा आवाज येतो अजुन तुमच्या
म्हणून म्हणे
काही घोड्यांना अडवलं कुंपणाजवळ.
घोडे मागे फिरलेत काही.

काल नव्या कळपात बरेच घोडे दिसले.
आनंदाश्रू पुसत म्हणाले–
" उमदेपणा हरवला नाही हे खूप बरे झाले ! "

□ □

दोन कविता / प्रकाश खरात

१

कृश उजेड पाठंगुळी घेवून
पोहोचलोय स्मशानापर्यंत.

राहू म्हणता बांधिल खदखदल्या मृत्यूशी ?
अवघ्या मेसूरतेतून
ठेवू म्हणता हास्य तेवत ?
; रचतोय स्वहस्ते चिता
सुविहित मृत्यूनंतरची...

: आयुष्य अधोमुख करणार म्हणता ?
अजस्र मृत्यूसाक्षीनं ?

२

वेसवा दुपार सजून बसल्यानंतरची
पहा डोळे भरून मैथुनरत् उन्हे.
अंकुरांच्या मृत्यूने.
भूमीला वैधव्य आलंय...
नि तू तहानव्याकुळ का होतेयस सूर्यपक्षीणीगत !
सूर्य कोरडाठण्ण पडलाय !

□ □

कविता / शरणकुमार लिंबाळे

या देशाचं नागरिकत्व मी
सडवितो रोज संडासच्या पाळीत, नळावर रांगेत
मुतारीच्या ओळीत
मला सुरक्षित वाटते मवाल्यांच्या टोळीत
या पोलिस चौकीपेक्षा
आज मराठवाडा पेटला
काल विहार पेटले होते
आता तर मी आगीतच आहे
माझी बहीण सांगते मला
गावगुंडांनी केलेला अत्याचार
मला कळतच नाही अत्याचाराचा अर्थ
आणि माझ्या गाववाल्यांना कळत नाही
त्यांच्याच वागण्याचा अर्थ
माझ्यात आणि गाववाल्यात इतकी दुश्मनी का ?
आम्ही कधी पेटवल्या का यांच्या झोपड्या !
की नागवल्या यांच्या लेकीबाळी ?
म्हणून आमचा हे सूड उगवताहेत ?
आम्ही असे कुठे निघालो आहोत देश हरवत
पदोपदी कुणीकडे ?
किती दिवस असुरक्षित राहायचे आपल्याच
देशात ?
किती सहन करायचा अन्याय आपलाच धर्म
म्हणून ?
भौ भौ वेगळे होतात
आपलेच कसे हितसंबंध गुंतलेत एकात्मतेत ?
मला समजून द्या
शासनाच्या प्रत्येक कचराकुंडीत
माझी निवेदने सडत आहेत
आणि मी
हकलला जातोय माणसातून दूरदूर
जिथे सर्वच हद्दी संपलेल्या असतात
तुमच्या माझ्या किमान माणसाच्या

□ □

मी... / वसुधा पटील

कधी नुसते स्मित,

कधी हात फलकावून ओळखीची नुसती पोच.
तर कधी हात हाती घेऊन जिव्हाळ्याची पावती,
कधी डोळ्यांतल्या पाण्याने विरहाची जाणीव,
कधी थंड , क्रुद्ध, तुच्छतेने करपलेल्या मुद्रेचा
दुरावा,
कधी घट्ट मिटलेल्या ओठांचा,
बोचक नजरेचा ताठर ताठा,

हे सारे विस्मरणापलिकडले,
हे सारे " कुणाचे कुणासाठी "च्या पेचात
नित्य अडकलेले,
ओळखीचे परंतु वरवर धिरट्या घालणारे-
आत...अंतरात कणभरही न पाझरलेले....
झिरपलेले-
डोळ्यांनी पाहून, स्पर्शाने जाणवून संज्ञेला न
पोहोचलेले-

अलिकडे विस्मरणच फार....
प्रेमप्रकरणांची, नात्यागोत्याची, नव्या रक्तबंधाची,
राजकारणातील उलथापालथीची-
जागतिक घडामोडींची,
मृत्यूच्या अटळ बांधिलकीचीसुद्धा...
साऱ्यासाऱ्यांची विस्मरणेच....

नित्य आठव फक्त " मी "चाच
दृष्टी जाणार,
कान जाणार,
कुडी जराजर्जर होणार
अखेरीस हे लोचट प्राणही जाणार
तरी आता आणि नंतर " माझे " कसे होणार ?
माझे कसे होणार ?

□ □

अनुक्रमणिका

सावल्या / अनुराधा पाटील

दिवस जातांना ठेवून जातात हातावर
काही हुंदके काही गुदमरते श्वास
आणि राखेसारखं फटफटीत आभाळ
आणखीच जवळ येतं.
कुणाच्या जन्माचं हे ऋण मला
की आज फेडता फेडता
डोळयात जपलेलं पाणीही
तहान भागवायचं नाकारतं.

पुरत नाही नुसत्या कल्पनेचा आधार
जेव्हा मुठीत बंद केलेली स्वप्नं
मातीच्या ध्यासानं,
अंकूर फुटून हळूहळू पालवतात
किती जन्मांचा राहिलेला......
आज तुझ्यासाठी धरावा हट्ट ?
दुःखाच्या पायात वांधलेल्या घुंगरांचे
किणकिणते नाद देहभर उधळतात.

थोडीशी कोवळिक घेऊन आपल्यासाठिही
कुणी उभं असेल म्हणता म्हणता
आपलीच सावलीही दिसत नाही
दूरच्या रानावरून वाहत येणारा
मातीचा वास मी अजून जपून
अस्तित्वाचं तेवढंस भान,
निदान जगणं साकारते,

□ □

चंद्र / अमर रामटेके

कोणी चंद्र नेला, ऐन रात्री
इथे अंधार पसरला
मग काळोख वस्तीने दिवाळी पेटविली,
आणि पाहून घेतले धुरात,
आपले भंगलेले भविष्य,
कोणी यांच्या लाल डोळयांना समजून घ्या.
अन्यथा उद्या हे चंद्र पेटवतील,
पेटलेले चंद्र मग चंद्र नसतात,
असता चंद्राच्या रूपात,
रक्ताळलेल्या डोळयांचे अवशेष ॥

□ □

रामकथेचा अभ्यास : एक दिशा

श्रीराम कोश खं. १ (भा. १–२) खं. २(भा. १) हनुमान कोश (खं. २ भा. २) 'रामायणाचा मराठी अनुवाद (पुस्तक १–२) (खं. २) भा. ३ (१) स्थल दर्शन (२) पात्र दर्शन (३) श्रीराम दर्शन संपादक : श्री. अमरेंद्र गाडगीळ / प्रकाशक : श्रीराम कोश मंडळ, पुणे.

काळाची गरज

वाल्मीकिरामायण हा भारतवर्षाचा इतिहास प्रदीप आहे. मृतप्राय राष्ट्राला संजीवन देण्याचे सामर्थ्य असलेला आणि आपत्तीच्या काळात दीपस्तंभाचे काम करणारा हा ग्रंथ भारतीय जनतेला नेहमीच एक महान आश्वासन ठरला. या कथेतील चरित्रनायक आपल्या लोकोत्तर ध्येयवादित्वाने दूरदूरच्या प्रदेशांनाही आकर्षण केंद्र वाटला तर सहस्रावधि भक्तभाविकांच्या हृदयात एक पुण्यपावन दैवत म्हणून अधिष्ठित झाला.

पण ज्या प्रमाणात रामकथा लोकप्रिय ठरली त्या प्रमाणात तिचे मूळातले रूप लोपले आणि तिला अद्‌भुत अतिमानुष अशा अवतार चरित्राची कळा आली. अकराव्या शतकापासून रचल्या गेलेल्या रामायणातून तर हा कथानायक परब्रह्म स्वरूपात आविर्भूत झाला आणि वाल्मीकिरामायणाने जोपासलेली कथेची ऐतिहासिकता पार लोपली.

ही दुर्मिळ होत चाललेली वास्तवता पुन: जागवणे हे विसाव्या शतकातील रामकथेच्या अभ्यासाचे एक वैशिष्ट्य आहे. श्रेष्ठ मानवतेचा आदर्श या दृष्टीने रामायणाचे नव्याने पुनर्मूल्यन करण्याचा प्रयत्न या शतकात बऱ्याच अभ्यासकांनी केला— आणि हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. पुण्यश्लोक श्रीरामचंद्र आज घटकेस देवत्व पावला असला तरी तो स्वत: 'आत्मानं मानुषं मन्ये' असेच म्हणत राहिला हे धीटपणाने सांगणारी समीक्षा आज हवी आहे. त्या दृष्टीने जे जे प्रयत्न होतील हे स्वागतार्हच ठरतील.

पुणे येथील श्रीरामकोश मंडळाने १९६९ पासून १९८३ पर्यंत जे कोशकार्य चालविले त्याचे फलस्वरूप एकूण दोन खंडात छोट्या मोठ्या आठ पुस्तकांच्या रूपाने मराठी वाचकांपुढे सादर केले आहे ते या दृष्टीने अभिनंदनीय ठरेल. जवळ जवळ २४०० पृष्ठांची ही कोश सामग्री बरीच महत्त्वपूर्ण आहे. श्रीरामकोशमंडळाने गेला दहा बारा वर्षात जे दोन खंड प्रकाशित केले त्यांचे अभ्यासकांच्या दृष्टीने वैशिष्ट्य समजावून घेण्यासाठी त्यांचा क्रमश: विचार करणेच इष्ट ठरेल.

२. इतिहास : वर्तमानाचे अधिष्ठान

पहिल्या खंडाचा पहिला भाग १९७३ साली प्रसिद्ध झाला असून तो परिशिष्ट, प्रस्तावना धरून सुमारे ३२५ पृष्ठांचा आहे. तो वाचत असता रामायणातील समाजजीवनाचा एक भव्य विशाल पट आपल्या नजरेपुढे उभा राहतो. रामायण म्हणजे 'रामाचे अयन.' अयोध्यानगरीत राहणाऱ्या श्रीरामचंद्राचे चित्रकूट, दंडकारण्य, किष्किंधा आणि लंका या देशप्रदेशातून झालेले हे अयन (भ्रमण) त्या त्या प्रदेशाच्या सामाजिक जीवनाची ओळख करून देण्यास उपयुक्त ठरावे हे साहजिकच आहे. पण त्याबरोबरच निरनिराळ्या प्रकृतीच्या सुजाण व सावध व्यक्तिमत्त्वाचा परिचय होऊन आपल्या ज्ञानात भर पडते. या दृष्टीने अनेक देशांचे भौगोलिक ज्ञान असलेला सुग्रीव (पृ. १३३) किष्किंधेत राहून पतीच्या मुखाने शत्रूच्या शिबिरातील सैन्याची निश्चित संख्या सांगणारी तारा (पृ. ३३) दंडकारण्याच्या प्रदेशात प्रत्येक पाऊल सावधगिरीने टाकायला सांगणारे अत्रिऋषी (पृ. ८) या व्यक्तींची माहिती मुळात पाहण्यासारखी आहे. पौलोमी इंद्रपत्नीला पळवून नेणारा अनुल्हास व

त्याला मारून आपली पत्नी परत आणणारा इंद्र याची कथा सांगून श्रीरामचंद्र आपल्या प्रस्तुत कर्तव्याची जाणीव प्रगट करीत आहे. हे पाहिले म्हणजे प्राचीन काळी पूर्व कथेच्या रूपाने इतिहासाचे अध्ययन कसे होत होते आणि त्या इतिहासाची वर्तमानाशी सांगड घालण्यात निपुण असलेल्या व्यक्ती त्याही काळात कशा होत्या हे सहजच लक्षात येते. इतिहास हा वर्तमान काळाचे अधिष्ठान असते हा सिद्धांत रामायणकाळी कसा रूढ होता याचेही आकलन व्हायला वेळ लागत नाही.

३. चरित्र नायिकेचे व्यक्तिमत्त्व

पण यापेक्षाही या ज्ञानाच्या प्रकाशात आपली जीवनमूल्ये उजळून आपल्या आसमंतालाही प्रकाशित करणाऱ्या व्यक्ती रामायणात दिसतात. रामायणाची चरित्र नायिका सीता रावणाच्या बंदीत असता राक्षसींच्या पहाऱ्यात तिचा प्रतिदिन कसा छळ होत असे हे रामायणात आपण पाहतोच पण रावणवध झाल्यानंतर सीता बंधमुक्त होते तेव्हा या पहारेकरिणी राक्षसींना शिक्षा देण्याच्या इच्छेने हनुमान तिची अनुज्ञा मागतो तेव्हांचे तिचे उत्तर तिच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे जे दर्शन करून देते ते अतिशय उदात्त वाटते. 'माणूस वाईट नसतो, वाईट असते ती सत्ता' असा नवा सिद्धांतच जणू या जनकनंदिनीच्या आचरणातून आपल्या प्रत्ययाला येतो.

ही सारी माहिती या प्रथम खंडाच्या पहिल्या विभागात तपशीलाने आणि अकारविल्ह्याने मिळते. या काळातील निरनिराळ्या जाती जमातीतल्या विविध स्त्रीपुरुषांची जी व्यक्तिनामे येथे दिली आहेत ती जवळपास ६०० ज्या घरात आहे तर देशविदेश, नगरे–ग्राम, अरण्य–आश्रम, नद्या–सरोवरे, डोंगरदऱ्या यांची तपशीलवार केलेली नोंद सुद्धा १६० च्या आसपास जाते. रामायण काळातील निसर्ग, गृहजीवन, समाजस्थिती व नीती, पापपुण्याचे विचार, शिष्टमान्य संकेत, शुभ–अशुभ शकुनांची चिन्हे, कौटुंबिक क्षेत्रातील निरनिराळे नातेसंबंध व ते रक्षण करण्याची घेतली जाणारी दक्षता यासारख्या छोट्या मोठ्या उल्लेखातून तत्कालीन समाजजीवन आपणास कळत जाते. श्रीरामचंद्राचा काळ निश्चित सांगता येण्यासारखा नसला तरी वाल्मीकिरामयणाचा काळ ५००० वर्षापूर्वीचा आहे हे जवळपास सर्वच विद्वानांनी मान्य केले आहे. हा इतका प्राचीन इतिहास संशोधकांइतकाच अभ्यासकांना लाभदायक ठरेल आणि भारतीय संस्कृतीचा मागोवा घेऊन त्यातून वर्तमानाच्या घडामोडीत डोळसपणे उपयोग व्हावा हा संपादकांनी मनात वागविलेला उद्देशही या विभाग रचनेतून निश्चितपणे फळास जाईल या बद्दल आम्हाला शंका वाटत नाही.

४. तौलनिक अभ्यासाची सामग्री

श्रीराम कोशाच्या पहिल्या खंडाचा दुसरा भाग तौलनिक दृष्टीने अभ्यास करणाऱ्यांना नजरेसमोर ठेवून लिहिलेला दिसतो.

वाल्मीकिरामायण जसजसे लोकप्रिय होत गेले तसतसा त्याचा प्रसार होऊ लागला. या रामायणातील काही भाग स्वतंत्र आख्यानरूपाने व नाटक रूपाने वर्णिले जाऊ लागले. निरनिराळ्या देशातील लोककथा, पुराणातील अद्‌भुतता, अवतारवाद व धार्मिक संप्रदायातील भक्तिभावना यांची भर पडत गेली. साहजिकच मूळाहून ही वर्णने पुष्कळदा वेगळ्या स्वरूपात मांडली जाऊ लागली. विशेषत: अकराव्या शतकापासून देशी भाषेत जी रामायणे रचली गेली तिच्यात तर भक्तिभावना व अवतारमहात्म्य यांची सरमिसळ जास्त प्रमाणात दिसू लागली. वाल्मीकिरामायणापासून नंतरची रामकथा कशी व कोणत्या प्रमाणात भिन्न आहे हे समजावून घेतल्याशिवाय मूळ वाल्मीकिरामायणाचे वैशिष्टय लक्षात येणार नाही. बहुधा हे ध्यानात घेऊनच प्रस्तुत कोशकर्त्यांनी एक अभिनव योजना या दुसऱ्या भागासाठी आखली व ती म्हणजे वाल्मीकीला अनुसरणाऱ्या सोळा रामायणांची मूळातील घटनांशी तुलना!

५. अध्यात्म रामायणाचा प्रभाव

तामिळ, तेलगू, कन्नड, बंगाली, गुजराती, उडिया, आसामी, काश्मिरी, हिंदी व मराठी अशा १० भाषातील १२ रामायणे आपापल्या प्रदेशात लोकप्रिय व प्रसिद्ध असल्यामुळे साहजिकच त्या भाषा व प्रदेश या दोन्ही दृष्टींनी प्रातिनिधिक ठरतात. यापैकी पहिली दोन रामायणे–कम्ब आणि

रंगनाथ ही ११–१२ व्या शतकातील असून ती दाक्षिणात्य आहेत. यावरून रामायणाच्या प्रसारास प्रारंभ दक्षिणेपासून झाला असा एक निष्कर्ष अभ्यासक काढू शकतात. स्वतः कोश-कर्त्यांनी मात्र या रामायणापैकी बऱ्याच रामा-यणावर वाल्मीकी रामायणाप्रमाणे अध्यात्मरामा-यणाचा प्रभाव असल्याचे मत नमूद केले आहे. काश्मिरी रामायणाबद्दल त्यांनी काही मत दिले नसले तरी तेथील नारद–रामभेटीची घटना संपा-दकांना वाटते तितकी ती 'वैशिष्टयपूर्ण' म्हणता येणार नाही कारण ती घटना पृ. ३१६ वर अध्यात्मरामायणात आलेली आहे. याच्या उलट १४ व्या शतकातील माधव कंदली या रामायणावर अध्यात्मरामायणाचा प्रभाव आहे असे ते म्हणतात तेव्हा त्यांनी स्वतःच अध्यात्मरामायणाचा काळ १५ वे शतक मानला असल्यामुळे त्यांच हे मत विसंगत वाटण्याचा संभव उत्पन्न होतो. आमच्या मते मात्र कोशकर्त्यांचे प्रस्तुतचे मत चुकीचे नसून त्यांनी मानलेला रचनाकाळ सदोष असल्यामुळे हा घोटाळा झाला आहे. कारण ज्या पुराणातून हे अध्यात्मरामायण घेतलेले आहे त्याचा रचनाकालच मुळात ४ थे ५ वे शतक आहे. त्या दृष्टीने अध्यात्म रामायणाचा प्रभाव या असमिया भाषेतील पुराणावर पडला असल्याचा त्यांचा अभिप्राय आम्हाला यथार्थ वाटतो.

६. मायासीता : मूळ कल्पना कोणाची ?

श्रीरामचंद्राच्या परब्रह्मस्वरूपाची जाणीव करून देण्याचा प्रारंभ अध्यात्मरामायणापासून झाला. बहुधा म्हणूनच मराठीतील प्राचीन कवींचे ते फार आवडते ठरले. वाल्मीकींबद्दल योग्य तो आदर ठेवूनही एकनाथापासून समर्थ, गिरिधर, वेणाबाई, श्रीधर या सर्व कवींनी आपला रामकथेला अध्यात्म रामायणाचा आधार घेतला. "सिता मुख्य ते पावकामाजि होती। वृथा रावणे चोरिली हे वदंती" हे समर्थरामदासांचे माया सीतेवरील भाष्य प्रसिद्धच आहे. श्रीरामचंद्रांच्या आज्ञेनुसार खरी सीता रावण येण्यापूर्वीच अग्निकुंडात गुप्त झाली ही कल्पना अध्यात्मरामायणाची. ती आनंदरामायणाने त्याच-पासूनच उचलली. परंतु प्रस्तुत कोशकर्त्यांनी आनंदरामायणातील कथा त्यासंबंधीची घटना क्र. १११ दिली परंतु अध्यात्मरामायणातली दिलेली नाही. त्यामुळे या कल्पनेचा उगम आनंदरामायणात प्रथम झाला असा वाचकांचा भ्रम होण्याचा संभव आहे. अध्यात्म रामायणात ही कथा अरण्यकांड सर्ग ७.१४ मध्ये वाचकांना पाहायला मिळते. प्रस्तुत कोशकर्त्याला बहुधा तिचा पत्ता नसावा; किंवा इतर काही कारणामुळे ती देण्याचे राहून गेले असावे.

पण ही एक तुरळक गोष्ट सोडली तर या सोळा रामायणांतील काहींचे उगम विष्णुपुराण, भागवत यासारख्या पुराणात आढळतात. याचा शोध प्रथम या कोशामुळेच मराठी बहुसंख्य वाचकांना लागणार आहे आणि त्यामुळे बऱ्याचशा अभ्यासकांच्या चिंतनाला वाव मिळणार आहे यात शंका नाही.

७. उपकथा व काळपट

रामायणातील उपकथा व कालपट ही परि-शिष्टे सुद्धा या भागाचे वैशिष्टय म्हणावे लागेल. रामायणाच्या उपकथांशी पुराणांचे नाते स्पष्ट करण्यास हा भाग बराचसा उपयुक्त ठरावा. रामा-यणाच्या प्रमुख कथेमध्ये अडथळा आणणारा गौण स्वरूपाचा असा हा भाग वाटतो, पण याचे नीट वर्गीकरण झाले असते तर अभ्यासक आणि वाचक या दोघांचीही सोय झाली असती. समजण्यापूर्वीच्या कथा व रामकालीन कथा असे याचे भेद पाडता येण्याजोगे होते. यातील अर्ध्या अधिक रावणाच्या कथा या देवांशी घेतलेल्या युद्धाच्या तर काही इक्ष्वाकुवंशीय वा इतर राजांशी केलेल्या झग-डयाच्या आहेत. त्यावरून 'दशानन' रावणा-प्रमाणेच इतरही बरेच रावण होऊन गेले अशी शंका जिज्ञासूंना येण्यासारखी आहे. तिचे निरा-करण करणाऱ्या टीपा एखाद्या ठिकाणी तरी द्यायला हव्या होत्या.

परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या ५० व्या घटने-तली व ५२ व्यातील कुंभीनसी दोन वाटतात त्या वस्तुतः एकच आहेत पण ५० व्यात ती मौल्यवान राक्षसाची कन्या असल्याचं दर्शविलं आहे त्याऐवजी त्याची ती नात आहे असे हवे होते.

कालपटाची माहिती बहुश्रुत वाचकांना आव-डण्यासारखी आहे. परंतु या संदर्भात मराठीत गिरिधरांनी लिहिलेल्या अब्द रामायणाचा उल्लेख

यायला हवा होता. प्रस्तुत कालपटात दिलेल्या माहितीव्यतिरिक्त गिरिधरांनी रामचंद्राचा व्रतबंध, विद्याभ्यास व तीर्थयात्रा यांचा काळ दिला आहे. मायासीतेची वर दिलेली कथा मान्य करून गिरिधरांनी त्या घटनेचा काळ शूर्पणखा विटंबनेनंतर बरोबर २२ दिवसाचा दाखविला आहे. तिथिवार रामायणातील घटनांचा काळ देण्याचा पहिला मराठीतील प्रयत्न या कोशाच्याद्वारे अभ्यासकांच्या नजरेसमोर यायला हवा होता असे वाटते.

खंड दुसरा

श्रीरामकोशाचा दुसरा खंड जवळजवळ सहा भागात असून त्याची एकूण पृष्ठ २३०० आहेत. हे सारेच भाग आपापल्या परीने रामायणाच्या अभ्यासात भर टाकणारे असल्यामुळे त्याची व्याप्ती वाढूनही ती महत्त्वपूर्ण ठरणारी आहे. त्यामुळे मागल्या खंडाप्रमाणे त्याचीही भागशः ओळख करून घेणे इष्ट ठरेल.

८. श्री हनुमान कोश

श्रीरामकोशान्तर्गत श्री हनुमान कोश हा श्रीराम कोशाचा एक अपरिहार्य अंग वाटला तरी तो बराच स्वतंत्र आहे. रामाच्या चरित्रातील ते एक दुय्यम पात्र असले तरी खुद्द रामकथेत त्याच्या नावाने एक संपूर्ण कांड वाल्मीकींना द्यावे लागले. याशिवाय लोकजीवनातही एक प्रभावी दैवत म्हणून ते तितक्याच स्वतंत्रपणे मिरवताना दिसते. मराठीत यापूर्वी पनवेलचे श्री. स. कृ. फडके यांचे 'थकरा हनुमंताशी हितगुज' हे पुस्तक सोडले तर हनुमंताविषयीची माहिती साकल्याने पुरविणारा हा पहिलाच ग्रंथ ठरेल.

हनुमंताची माहिती किती विविध तऱ्हेने जमा केली आहे हे पाहण्याच्या दृष्टीने सहज पहिल्या संदर्भसूचीकडे नजर टाकली तरी पुरे आहे. पुराणे संहिता, उपनिषदे, लोकसाहित्य, वृत्तपरिचय, पूजा पद्धती, कवचे व स्तोत्रे यातून या दैवताचे दर्शन करून दिलेले आहे ते त्याचे लोकमानसातील स्थान आणि महत्त्व दाखवते. याशिवाय हनुमानचरित्राचे सर्वांगीण दर्शन, चरित्र विवरण, ह्या दैवतइतिहास चर्चा, विविध संप्रदायातील हनुमतदर्शन वाल्मीकि-रामायणातील प्रमुख घटना आणि त्या घटनांची १६ रामायणाशी केलेली प्रसंगवार तुलना हा साराच भाग वाचकांच्या बहुश्रुततेत भर टाकणारा, अभ्यासकांना स्तिमित करणारा आणि भक्त भाविकांचे कोड पुरविणारा आहे.

श्रीरामकथा वाचताना वा ऐकताना आपल्या डोळ्यापुढे त्या कथेच्या अनुषंगाने अनेक घटना वा अनेक पात्रे येतात. त्यापैकी हनुमान हे पात्र बऱ्याच उशीरा म्हणजे किष्किंधाकांडात दिसू लागते. पण त्याचा प्रभाव पाहावा तर तो क्षितिजापाशी दिसणाऱ्या बाळसूर्यानं हळूहळू गगन मंडळाचा ताबा घ्यावा तसा दृग्गोचर होत जातो. सीताशोध व पावकशुधी या दोन महत्त्वपूर्ण कृत्याने हनुमंतांनी श्रीरामाला जे देणे दिले त्याला तोड नाही म्हणूनच प्रत्यक्ष श्रीरामाच्या तोंडून "एवढे माझे रामायण याचेनि योगे" असे उद्गार बाहेर पडले आहेत.

९. दैवत कल्पनेचा विकास

हनुमंताच्या चरित्राचे पहिले दर्शन आपणास वाल्मीकीच्या रामायणात होते ते किष्किंधा, सुंदर व युद्ध या तीन कांडात. पण ते अपुरे वाटून की काय पुराण साहित्याने व लोकवाङ्मयाने त्यात बरीच भर टाकली. इसवीसनाच्या दुसऱ्या शतकात रामकथेमध्ये उत्तरकांड व प्रक्षिप्तसर्ग यांची जी वाढ झाली त्यातील एक हेतु हनुमंताच्या पूर्वचरित्राबद्दल कुतूहल शमविण्यापुरताच होता. 'उमजता बाळपणी गिळू पाहे वासरमणी' हे त्या कुतूहलशमनानेच एक रूप ! हजारो भक्त भाविकांना हनुमज्जन्माची कथा याच रूपात परिचित आहे.

पण रामसखा हनुमंत हा आदर्श रामसेवक आणि हजारो रामभक्तांचा कैवारी कसा ठरला हे वाल्मीकीच्या रामायणापेक्षा अध्यात्म, आनंद, तुलसीरामायण वा भावार्थरामायण यासारख्या इतर रामायणातूनच दिसते. रामायणाचा चरित्रनायक सहस्रावधि भक्तभाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनला तेव्हा त्याच्या परिवारालाही त्या वलयात जागा मिळाली. पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की या साऱ्या परिवारात स्वतंत्र दैवत म्हणून मिरविण्याचा मान फक्त हनुमंतालाच लाभला. रामदास्य करण्यात गोडी मानणारा, रामदास्याचा

आदर्श ठरलेला, राम आणि भक्त यांची भेट घडवून आणणारा आणि रामभक्तांचा कैवार घेणारा हनुमान आज रामभक्ताप्रमाणेच स्वतंत्रपणे सर्वसामान्यांचे एक जागृत दैवत होऊन बसला आहे. हनुमंताची स्तोत्रे, कवने, सिद्ध मंत्र, नाममाला, सहस्रनामे, मूर्ती, शिल्पे व चित्रे या विविध साहित्यातून घडत गेलेला हनुमान दैवताचा विकास या प्रस्तुतच्या हनुमत्कोशाच्या पानापानातून वाचकांना पाहायला मिळतो. बहुश्रुत, चिकित्सक, अभ्यासक आणि भक्त भाविक या सर्वांनाच आवडेल असे या कोशाचे स्वरूप आहे.

१०. रामायणाचा मराठी अनुवाद

रामकोशाच्या दुसऱ्या खंडाचा हा दुसरा भाग. याचेही पुस्तक १–२ अशा दोन विभागात (१०३४ पृष्ठे) विभाजन झालेले दिसते. यापूर्वी वाईचे श्री. लेले व नागपूरचे श्री. पांडे यासारख्यांनी जे अनुवाद केले त्याहून आपले वैशिष्ट्य हेच सांगताना कोशकर्त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोशकार लिहितात–

"वाल्मीकीचा राम हा माणूस आहे पण तो विष्णूचा अवतार, परब्रम्हाचा अंश आणि सीता ही शक्ती ही पौराणिकांची जी श्रद्धा तीस अनुसरून बहुतेक संस्कृत टीकाकारांनी आपले अर्थ लावले आहेत. त्या टीकांमुळे वाल्मीकींचा राम निस्तेज बनला आहे...संस्कृत टीकाकार राम हा सच्चिदानंद परब्रह्म. अशा नितांत श्रद्धेने वाल्मीकिरामायणाचा अर्थ लावतात व कित्येक ठिकाणी याच श्रद्धेपायी मूळ अर्थ अवश्य असूनही टाळतात. ...वरील दोन भाषांतरे संस्कृतातील तिलक टीकेचा आधार घेत असल्यामुळे त्यांची भाषांतरे काही ठिकाणी वाट चुकत असल्याबद्दल खेदाने स्पष्टपणे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही (पृ. १२).

११. अध्यात्माचीही अवहेलना नको

कोशकर्त्यांनी या चुकीच्या भाषांतरांची काही उदाहरणे दिली आहेत ती मूळात पाहण्यासारखी आहेत. पण कोशकर्त्यांची भूमिका समजावून घेण्याच्या दृष्टीने त्यातील काही नमुने वाचकांपुढे सादर करणे इष्ट ठरेल.

अरण्यकांडाच्या ४४ व्या सर्गात 'तत्सारमखिलं नृणां धननिचयवर्धनम्। मनसा चिन्तितं कार्यं यथा शुक्रस्य लक्ष्मण असा श्लोक (क्र. ३३) आला आहे. त्यातील 'शुक्र' शब्दाबद्दल तिलक टीकाकार 'शुक्र ब्रह्म' असा अर्थ घेतात. वस्तुतः येथे 'शुक्र' म्हणजे शुक्रनीती असा अभिप्राय मूळात असणे साहजिक आहे. वाल्मीकींच्या मते श्रीरामचंद्र हे शुक्रनीती जाणून होते हे जसे त्या शब्दातून ध्वनित होते तसेच त्या काळातील राजपुत्रांच्या शिक्षण क्रमात शुक्रनीतीसारखे ग्रंथ अंतर्भूत होते हेही कळते.

याच कांडातील 'कर्तारमपि लोकानाम्' (सर्ग ६४ श्लो. ५४) यातील मूळातला अर्थ लोककर्ता हाच विवक्षित आहे पण तिलक टीकेत 'उत्पत्तिस्थिति संहारकर्ता महेश्वर (शंकर) असा अर्थ लावला आणि भाषांतरकारांनाही 'लोकांचा उत्पादक शूर शंकरही दयार्द्र दृष्टीने स्वस्थ बसला तर लोक त्यांचाही अवमान करतील, मग माझी कथा कशाला' असे उद्‌गार रामाच्या तोंडी घातले आहेत. रामकोशाच्या संपादकांनी मात्र 'लोकांचा पालनकर्ता शूर असला, दुःख जाणणारा असला तरी अज्ञानामुळे लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करतात' असा घेतला आहे.

पण या दोन्ही उदारणात मूळ शब्दांचे तिलक टीकेने लावलेले अर्थ अध्यात्मपर आहेत एवढयावरून त्यांना दोष लावणे आमच्यामते फारसे इष्ट नाही. अध्यात्माची अवहेलना करणे हे सुद्धा सांस्कृतिक दृष्टया योग्य होणार नाही. प्राचीन काळापासून चालत आलेला हा एक प्रबळ प्रवाह ऐहिक जीवनाला उपयुक्त नसेल तर तेवढा भाग डावलणेच काय ते योग्य ठरेल. खुद्द कोशकर्त्यांनी ज्यांच्या प्रेरणेने हे कार्य चालविले त्या श्रीधरस्वामींनी पहिल्या खंडाला दिलेल्या प्रस्तावनेतही या आध्यात्मिक भूमिकेचा आढळ होतोच ना! आध्यात्मिक परंपरा जेथे अभ्यासाला अडथळा आणीत नसेल तेथे तिची मर्यादा लक्षात घेऊन आवश्यक तेवढा स्वीकार करायला हरकत नसावी.

१२. दुसऱ्या खंडाचा तिसरा भाग

या दुसऱ्या खंडाच्या तिसऱ्या भागात (१) स्थळ दर्शन (पृष्ठ १) (२) पात्रदर्शन आणि (३) श्रीराम दर्शन अशी तीन पुस्तके समाविष्ट आहेत. कालानुक्रम मात्र याच्या उलट म्हणजे

पहिले पुस्तक १९८३ त तर तिसरे १९८१ त प्रसिद्ध झालेले आढळते. क्र. २ च्या पात्रदर्शना'चा उपक्रम मूळ संकल्पाला धरून नाही. श्रीरामदर्शन आणि स्थळदर्शन या दोन्ही पुस्तकांच्या शेवटच्या मलपृष्ठावर दिलेल्या जाहिरातीत 'रामायण–सम्यग्दर्शन' याचा क्रमांक २ म्हणून उल्लेख आढळतो. त्यातच मूळ वाल्मीकीरामायणाच्या संदर्भात इतर रामायणकारांनी घडविलेले पात्रदर्शन' येणार होते पण नव्या योजनेनुसार ते पुस्तक सध्या श्रीरामकोशाहून स्वतंत्रपणे काढलं आहे तेव्हा त्याचा विचार प्रस्तुत कोशपरीक्षणात न करता वेगळाच करणे इष्ट ठरेल.

१३. संशोधकांना आव्हान

स्थळदर्शनाचा हा पहिला भाग १२८ पृष्ठांचा आहे. त्यात रामायणकाळातील आश्रम–अरण्ये–देश आदिंचे उल्लेख एकत्र केले असून आधुनिक भूगोलवर्णनाची जोड दिली असल्यामुळे बराच अद्यावत्पणा आला आहे. मूळ रामायणात स्थळाचे उल्लेख प्रथम अयोध्याकांडात भरताकडे पाठविलेल्या दूतांच्या व खुद्द भरताच्या परतीच्या प्रवासात आलेले दिसतात. त्याहून विपुल उल्लेख सुग्रीवाने वानरांना सीताशोधार्थ पाठविताना त्याच्या तोंडी आले आहेत. किष्किंधा कांडातील हा सर्ग प्रक्षिप्त नसल्यास त्या वर्णनावरून सुग्रीवाचं देशपरिस्थितीचे ज्ञान त्या काळाच्या मानाने विपुल व सूक्ष्म होते असे म्हणावे लागेल.

श्रीरामाच्या संचारात जे काही प्रदेश निर्देशिले जातात त्यातील वरीच स्थळे आज तीर्थस्थान म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यात नागपूरजवळील रामटेक येथे सुतीक्ष्ण ऋषीचा आश्रम असल्याने रामानं वनगमनप्रसंगी येताजाता दोनदा भेट दिल्याचे वर्णन मुळात आढळते व आजच्या संशोधनालाही ते मान्य दिसते. हा उल्लेख विदर्भवासीयांना जास्त जवळिकीचा व हृद्य वाटावा.

या देशनिदशातील लंका हे महत्त्वाचे स्थळ मात्र अजूनही विवाद्य आहे. 'कालप्रवाहात गुप्त अनेक संदर्भामुळे रामायणवर्णित भूगोल व सध्याची भौगोलिक स्थिती यांचा मेळ घालता येत नाही' (पृ. ८६) असे संपादकांचे या बाबतीतलं निदान आहे. रामायणकालीन बरीच स्थळे अद्याप संशोधकांच्या बुद्धीला आव्हान देत राहणार असे दिसते.

१४ पात्र दर्शन

पात्रदर्शन (पृ. ३२) भाग एकंदर संबंध कोशरचनेच्या दृष्टीने तोकडा वाटतो. या भागात रामायणातील गौण पात्रांचे इतर ५८ रामायणातील पात्रांशी तुलनात्मक दर्शन घडविले आहे. पण पहिल्या खंडातील दुसरा विभाग तौलनिक अभ्यासासाठी खर्च केला. तेथेच या विषयाची वर्णी लावता आली असती. येथे त्याचा स्वतंत्र विमर्श घेऊन वेगळे पुस्तक काढण्याचे तादृश प्रयोजन दिसत नाही. अर्थात गौण पात्रांचा विचार सर्वांगीण अभ्यासाचे उद्दिष्ट लक्षात घेता कुठे तरी व्हायला हवा होता एवढे खरे !

पण या ठिकाणी जी माहिती टिपली आहे त्यातही असावधपणाच्या खुणा दिसतात त्या सूक्ष्मदर्शी अभ्यासकाला खटकतील व क्वचित निष्कर्षाच्या दृष्टीने अडचण उत्पन्न करतील असे वाटते. उदाहरणार्थ शत्रुघ्न हा वाल्मिकिरामायणात सुमित्रेचा तर पुढच्या काही रामायणात कैकयीचा पुत्र दाखविला जातो. या कल्पनेचा उगम शोधू जाता प्रस्तुत कोशकर्त्यांच्या माहिती प्रमाणे तो नाथांच्या भावार्थरामायणात दिसतो. याचा अर्थ कैकयीपुत्र शत्रुघ्न' या कल्पनेचे श्रेय नाथांकडे जाते. पण हीच कल्पना त्यापूर्वीच्या संस्कृतातल्या आनंदरामायणातही आढळते. प्रस्तुत कोशात मात्र त्याचा उल्लेख नाही. असा एखादा प्रमाद कोशग्रंथात असल्याने त्याची कामगिरी डागळते अशातला प्रकार नाही पण आनंदरामायणाच्या वाचकांचा आनंद हिरावून घेतला जातो एवढेच !

१५. मार्मिक भाष्यकाराची सोबत

'श्रीरामदर्शन' हा १२९ पृष्ठांचा भाग या तिसऱ्या विभागातील दोन्ही पुस्तकांपेक्षा वेगळा वाटतो. त्याचे स्वरूप संग्राहक नसून विवेचनात्मक आहे. एका परीने या संपूर्ण श्रीरामकोशाच्या येथवरच्या नानाविध प्रयत्नांचा अर्थपूर्ण मेळ लावण्यासाठीच तो लिहिलेला दिसतो. रामायणाचे एक प्रेमी व चिकित्सक अभ्यासक श्री. ग. स. आळतेकर यांच्या लेखणीतून तो बाहेर पडला आहे. लेखकाच्या साक्षेपा इतकेच रामायणाविषयीचे त्यांचे

प्रेम आणि मार्मिक स्थळ टिपण्यांची त्याची कुशलता यामुळे या छोटया पुस्तकाला सुसंगत व कलात्मक परिमाण लाभले आहे.

रामायणाची कथा वाचत असताना या चरित्र-नायकाचे एकेक गुण आम्हाला कथेकडे वेधून घेत असतात. त्यातच मार्मिक भाष्यकार सोबतीला असला तर त्या त्या स्थळांचे वा गुणांचे मर्म अधिक चांगल्यातऱ्हेने मनावर ठसते. आळतेकरांनी श्रीरामाच्या स्वभावातील बरेच पैलू विवेचनाच्या शोधामध्ये प्रकाशात आज आणले आहेत. उदाहरणार्थ, 'राज्य व वनवास यात दुसराच भाग रामाने कल्याणकारक मानला तो राजकुळातील यादवी टाळण्यासाठी व जनहिताच्या दृष्टीने' (पृ. १०८). 'आपल्यासाठी प्रजेला कसलाही त्रास होऊ नये हे रामाच्या आचारसंहितेचे एक महत्त्वाचे सूत्र होते' (पृ. १०९). 'कैकयीवर राग न काढण्याबद्दल त्याने भरताला आपली व सीतेची शपथ घातली त्यावेळी आपल्या अपकाऱ्यावर उपकार करण्याची रामाची सहजप्रवृत्ती पाहून त्याच्या उदार हृदयाचे कौतुक वाटते.' (पृ. ११०) हे त्यांनी काढलेले उद्‌गार यादृष्टीने लक्षणीय आहेत.

१६. 'विकासशीलता' ही ध्यानात घ्यावी

रामाच्या जीवनात अरण्यकांडापाशी त्याचे एकाकी भ्रमण संपते आणि त्याच्या सामाजिक संबंधातील सुजाण प्रयत्न दिवसेंदिवस नव्याने प्रत्ययाला येऊ लागतात. आपल्या एकटयाच्या बळावर विसंबून न राहता राम आता निरनिराळया मार्गांनी आपले पक्षबळ वाढवीत आहे. आमच्या मते रामचंद्राच्या मनाची पूर्वीची धारणा बदलत जाऊन तो आता जीवनातील सार्वजनिक संपर्क व राजकारण याकडे विशेष लक्ष देत आहे. यामुळेच या काळातील त्याचे जीवन गतिशील व कर्तव्यदक्ष वाटते व नव्या नव्या घटनांचा कुशलतेने उपयोग करीत असतानाच रामाचे मन 'नदीकडून समुद्राकडे जावे तसे दिवसेंदिवस विशाल कार्यभार पेलण्याच्या उद्योगात अधिकाधिक समंजस व समृद्ध बनत आहे.' असे ही वाटू लागते. हा विकासशीलतेचा मुद्दा श्री. आळतेकरांच्या विवेचनात हवा तितका स्पष्ट झालेला नाही. कदाचित तो त्यांना मान्य नसावा.

शबरी भेटीच्या प्रकरणावरून रामाचा हीन जातीच्या सदाचरणाविषयीचा आदर लक्षात घेता शंबूकवधाची कथा काल्पनिक ठरते. हा श्री. आळतेकरांनी जो तर्क केला आहे तो सुप्रतिष्ठित वाटतो. पण ही शबरी भेटीची घटना मुद्दा रामाच्या बदलत्या समाजसन्मुख वृत्तीची द्योतक आहे असे का म्हणू नये ? तसेच रामाने रावणवध केला या घटनेपेक्षाही सुग्रीव-बिभीषणाला जवळ करून त्याने आंतरराष्ट्रीय मैत्रीचे जे नवे पर्व राजकारणात सुरू केले त्याचे कौतुक जास्त व्हायला पाहिजे असे आम्हाला वाटते.

१७. शांतरसाचे माहेरघर

पण हा भाग सोडला तर श्री. आळतेकरांच्या विवेचनातील शेवटची काही प्रकरणे रामकथेतील नायक नायिकांच्या मनोमीलनाची कथा सांगण्यात रंगून गेली आहेत. रामाच्या चरित्रावरोबर सीतेचेही 'महान् चरित्र' समजावून देण्याचा जो हेतू वाल्मीकींनी मनाशी बाळगिला तो आळतेकरांनीही जाणून घेतला आहे. सीता आणि राम यांची कथा संयोगापेक्षा वियोगाची आहे पण या वियोगातून त्या उभयतांची कर्तव्यदक्षता आणि परस्परावरील प्रेम यांची जणू चढाओढच लागलेली दिसते. आर्तत्राणाच्या कर्तव्यात सीतेचाही प्रसंगी त्याग करण्याचा रामाचा निर्धार आणि आपला त्याग करणाऱ्या पतीला 'जनहिताविषयीच्या कर्तव्यात दक्ष राहा' असा निरोप देणाऱ्या सीतेचे धैर्य या दोन्ही गुणांचे दर्शन मुळात वाल्मीकींनी अतिशय तेजस्वी भाषेत केले आहे आणि श्री. आळतेकरांनी तो भाग तितक्याच उत्कृष्ट रीतीने मराठीत आणला आहे. अशा प्रसंगी या दांपत्यात त्यागाच्या दृष्टीने कुणाला श्रेष्ठ मानावे या प्रश्नाने मन अस्वस्थ बनते. या अस्वस्थतेचा प्रत्यय देण्याच्या गुणामुळेच हा ग्रंथ करुणरसात्मक आहे असा हवाला आनंदवर्धनासारख्या संस्कृत टीकाकाराला द्यावासा वाटला.

पण आमच्या मते रामायण हे करुणरसात्मक नसून ते शांतरसाचे माहेर आहे इतकेच नव्हे तर ज्ञानदेवांनी प्रतिपादिलेला 'परतत्त्वस्पर्श' हाच त्याचा स्थायीभाव आहे. श्री आळतेकरांचे याविषयीचे विवेचन निःसंदिग्ध असून ते आमच्या

मताला बळकटी आणणारे आहे. 'योगीजनांना जो मनोनिग्रह कठीण वाटतो तो रामाच्या चित्ताचा स्थायीभाव होता' (पृ. १०८) अयोध्येला रामराज्य देणारा प्रभू रामचंद्र योगी होता. 'त्याची ही योगारूढ वृत्ती वनवासापासून वैकुंठवासापर्यंत दिसून येते' (पृ. ११९) हा त्यांचा समारोप श्रीराम चरित्रातील एक अश्रुतपूर्व पैलू दाखवणारा आहे व त्यावद्दल सुज्ञ व रसिक वाचकांच्या अभिनंदनास ते पात्र ठरतील.

१८. औचित्यपूर्ण समारोप

रामराज्याचे मूल्य न करतानाही त्यांनी जी अखेर केली तीही मोठी मार्मिक आहे "राखो जाणे नीति न्याये। न करी न करवी अन्याय। कठिण प्रसंगी उपाय। करू जाणे। ऐसा पुरुष धारणेचा। तोचि आधार बहुतांचा। दास म्हणे रघुनाथाचा। गुण घ्यावा" अशा समर्थ वचनांनी त्यांनी या विवेचनाची सांगता केली आहे. श्रीराम कोशाच्या संपादकांच्या धोरणाला ती साजेशीच आहे. श्री. आळतेकरांचे वडील समर्थचरित्रकार म्हणून प्रसिद्ध होते. अशा कुळात वाढलेल्या सुसंस्कृत लेखकाच्या विवेचनात रामराज्याचे मूल्यांकन करताना समर्थवचनाचा आधार घेतला जावा हा केवळ योगायोग खचित नव्हे. १९६९ साली समर्थ-वचनाचे स्फुरण मनाशी बाळगून ज्यांनी हा श्रीरामकोशाचा वाग्यज्ञ आरंभिला त्यांच्याच वचनाचा पुनः एकदा हवाला देऊन विषयाचा समारोप केला जावा हे उचितच ठरते. शिवाय महाराष्ट्राच्या नव्या छत्रपतीला आदर्श राज्याचे नीतिनियम सांगताना समर्थ रामदासांनी राम-राज्याचे जे मूल्यांकन केले ते आजच्या युगालाही किती लागू पडते हे आळतेकरांनी समर्पकपणे दाखविले आहे. रामभक्तीबरोबरच रामभक्ताचे स्मरण जागविणारी ही गोष्ट श्रीरामकोशाच्या कल्पनेला साजेशी आणि म्हणूनच अभिनंदनार्ह आहे.

मा. श्री. परांजपे
हिन्दुस्थान कॉलनी,
वर्धा रोड, नागपूर

'बाहुल्या'

(लेखिका–सुनीती आफळे प्रकाशक–अरुण वि. पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ पुणे ४११०३० मुखपृष्ठ–सुभाष अवचट. मूल्य–चाळीस रुपये. पृष्ठे–१५०.)

सुनीती आफळे यांचा 'बाहुल्या' हा कथासंग्रह हातात घेतल्यावर सुभाष अवचटांच्या मुखपृष्ठा-वरची तरंगती बाहुलीच आतील कथांचा, एवढंच नाही तर पूर्ण जीवनाचाच अतर्क्य आशय सांगून जाते. पायाला जमिनीचा आधार नसताना हवेच्या पोकळीत नाचणाऱ्या बाहुलीच्या कमरेला बांधलेली दोरी कुठल्यातरी अदृश्य अज्ञात हातांनी हलवली जाणारी, अनंतात विलीन झालेली ती दोरी ते हात खूपसं बोलतात. मग ते हात नियतीचे असोत नाहीतर तानुबाई, शकुन् तळघरातल्या आजीला नाचणारी माणसं असोत.

सुनीतीबाईंच्या कथाविश्वाचा केंद्रबिंदू जी स्त्री; ती काही नैसर्गिक, पारंपारिक कारणांनी संस्कृती नामक रेशमी फासात अडकलीय् आणि तो फास तिला आवळतोय्. पण पुरता नाहीसंही करत नाहीय् नुसतच गुदमरवतोय्. या गुदमरल्या गेलेल्या स्त्री जवळ जे अंतरंग आहे, मन आहे त्याचं फार सूक्ष्म, सहृदय अशा अलिप्ततेनं, नेमकेपणानं केलेलं विश्लेषण इथे आढळतं, स्त्रीच्या मनाची स्पंदनं तिचे खोल जीवघेणे उसासे तितकेच तिचे उथळ काहीसे वालिश असे हर्षखेद यांचं मार्मिक चित्रणही या कथांमधून आढळतं.

'बाहुल्या' ही यातली आशयघन, जीवनाला, माणसाच्या अंतर्मनाला स्पर्शणारी कथा. माण-साच्या नशिवाची दोरी हातात ठेवणाऱ्या नियतीनं निवड करण्याचं जखमी स्वातंत्र्यही माणसाला बहाल करून जास्तच त्याच्या आयुष्याचा खेळ-खंडोबा केलाय्, शोकांतिका केलीय्. त्यामुळे निर्जीव बाहुल्यांचा तोल साधणारी शकुन् स्वतःच्या आयुष्याचा तोल साधू शकली नाहीय्. दैव देतं आणि कर्म नेतं या न्यायानं रूप, गुण, सुबत्ता सगळं असूनही कांतीसारख्या सामान्य उनाड मुलाच्या हातातलं खेळणं बनली. पांगळा झालेला कांती, जातीवरून लग्नाला विरोध करणारी त्याची आई

त्याची बायको, मुलगा सगळ्यांना तिनं स्वतःला वापरू दिलं. त्यांच्या कृतघ्नपणाची चीड येऊनही वापरू दिलं. याचं कारण एकच, ते म्हणजे जीवनातलं एकच एक सत्य, माणसाचा अंतीम एकाकीपणा, त्या कटु सत्याला सामोरं जाण्याची तिच्यात ताकद नव्हती. या माणसांना आपली जरूर लागेनाशी झाली तर काय होईल? या अंगावर काटा आणणाऱ्या एकाकीपणाच्या जाणिवेनं ती पुन: त्यांच्यामागे धावू लागते, पैसा, कष्ट, आतडं सगळं सगळं घेऊन. बाहुल्यांना घडवत घडवत स्वतःचं जीवन अस्तित्व सगळंच सावरू पहाते.

चिरंतन नसणारी माणसाची सोबत शोधण्यासाठी धडपडणं, त्या फसव्या गोड असत्याला कवटाळण्यासाठी जीव टाकणं आणि एकाकीपणा या एकमेव सनातन सत्यापासून दूर पळणं या माणसाच्या आर्त स्वभावावर लेखिकेनं ठेवलेलं बोट कलात्मक सहजतेनं केलेली त्याची उकल लेखिकेची सखोल चिंतनशीलता दृग्गोचर करते तिच्या साहित्याची प्रत निश्चित करते.

'लेन्सिस' ही यातली मला आवडलेली एक कथा. तारुण्यसुलभ भावडेपणानं लेन्सिस बसवणाऱ्या तरुण डॉक्टरच्या व्यावहारिक वागण्याचा स्वतःच्या तरल भावनांना अनुकूल असा हळवा अर्थ घेणारी मीना, जेव्हा ते वर्तन सर्वांसाठी समान असतं हे उमजते तेव्हा लेन्सिस काढलेल्या तिच्या अधू डोळ्यांनाही रुक्ष व्यवहारावर चालणारं जग आणि तिची विरलेली स्वप्नं स्पष्ट दिसतात. तिचे पायही जमिनीवर येतात. 'फसव्याची सवय झाली की खरं स्वीकारणं एकदम जड जातं. जमीन आहे तिथेच आहे. पण नेमकी ती कुठे आहे ते तुम्हाला आत्ता कळतय्' हे दृष्टीबाबतचे डॉक्टरांचे सहजोद्गार. नवी दृष्टी आल्यावर स्वतःच्या सौंदर्याची तिला होणारी जाणीव. डॉक्टरांबद्दलची तिची तारुण्यसुलभ ओढ. आणि विशेषतः कोन साधून ठेवलेल्या आरशात खरंखुरं प्रतिबिंब दिसणं पण ते सत्य स्वीकारताना मनानं दिलेला नकार. यातला खोल अर्थ वाचकाला कुठेतरी बेचैन करून जातो. अशी हळुवार तरलतेनं फुलवत ठेवलेली ही कथा. त्यातलं मनुष्यस्वभावाबद्दलचं, जीवनाबद्दलचं लेखिकेचं सूक्ष्म निरीक्षण लाजवाब आहे.

आकाराला येत असलेलं कुठलंही अस्तित्व घडताना बेडौल, बेढब दिसतं. पूर्ण झालं की लोभस दिसतं म्हणून श्वासागणिक पोटात वाढणारं बाळ वाढताना बघण्याची किती तळमळ लागली तरी ते जन्मल्यावर बघण्यातच औचित्य आहे हे निमाच्या पोटात वाढणारं बाळ आणि गच्चीवर बांधला जाणारा जिना आणि कठडा यांच्या बरोबर होणाऱ्या घडणीतून औचित्यपूर्ण रीतीनं दाखवताना वाचकाच्या विचारालाही चालना दिलीय.

पण याहीपेक्षा कलावंत नवऱ्याचे मूडस् सांभाळत मुलाला सर्व सुखसोयी मिळवून देण्यासाठी; त्याला घडवण्यासाठी जिवाचं रान करणारी, त्यासाठी नोकरी करणारी रेखा आणि पुरुषी अहंकारानं तिच्या मिळवतेपणाला विरोध करणारा तिचा तथाकथित कलावंत नवरा. त्याचा स्वाभिमान रसिकता हे समईतल्या तेलासारखे मेंचट गुण दुरून तेज ओकणारे, जवळून प्यायची पचवायची वेळ आली की येते शिसारी. या सर्वांमुळे रेखाची होणारी कुत्तरओढ, नवऱ्यानं 'तुझा मार्ग तुला मोकळा आहे' हा दिलेला अंतिम निर्णय आणि त्यानंतर पुढे काय? हे अनुत्तरित प्रश्नचिन्ह समोर उभं ठाकलेलं आणि त्याकडे अगतिकपणे पहात राहिलेली रेखा फार खरी वाटते.

तितकीच किंवा त्याहून खरी आणि जिवाला चटका लावणारी तानूबाई रिकामटेकड्या, बिड्या फुंकणाऱ्या नवऱ्याचा मार खात खात लोकांच्या पोळ्या लाटत, पापड पापड्या घालून विकत त्याला पोसणारी त्याची थेर जोपासणारी. 'नवऱ्याला सोडा' म्हणणाऱ्या सुषमाला 'आधीच नातेवाईकात वांझ म्हणून बदनाम आहे मी त्यात पुन: म्हातारपणी नवऱ्यानं टाकली म्हणून आणखी बदनाम होऊ का?' हा निरुत्तर करणारा सवाल टाकणारी. हे तिच्या तोंडचं सनातन सत्य वाचलं की वाटतं समाजपुरुषाच्या देहावरची चिघळणारी ही जखम कधीच भरून येणार नाही का? आणि बंगल्यात रहाणारी गाद्यागिरद्यावर लोळणारी सुषमाही तितकीच अगतिक होती. रिक्षा ड्रायव्हरवर प्रेम करणारी तिची नणंद बेबीही तानू

बाईच्या पाठीवरचे वळ मनावर वागवत होती. एकूण काय ? स्त्री जन्माची शोकांतिका ही लेखिकेची वहाती जखम यातील बऱ्याच कथांमधून वहात राहिलीय् वाचकांच्या मनावर ओरखडा उठवत.

तळघरात जाऊन सगळी दुःखं डोळ्यावाटे पाझरवणारी आजी, स्वतःसाठी, मुलींनाच प्रसवणाऱ्या नातीसाठी आणि एकंदर बाईच्या जन्मासाठीच. 'बायकांचा जन्म कपाळावरच्या मेणासारखा. नशिबी आलेलं मेंचटपण लपवून टाकायचं आणि वर ढळढळीत सौभाग्याचं कुंकू लावून मिरवायचं. तेही नशिबी नसलं तर सुया मारमारून रंगवलेलं गोंदवण तेवढं भोगायचं पांढऱ्या कपाळानं, मन कुठलं बाईला ? असलं तर शरीर. " बाईच्या जन्माचं जितकं बोलकं चित्र लेखिकेनं उभं केलय् तितकीच त्याच आजीची पणती छळू टाकूची भाषा ऐकायला तयार नाही. ही नव्या युगाची चाहूल दाखवून वाचकाच्या मनात आशेचा अंकुरही पेरलाय.

रहाटपाळण्यातून खाली येताना पोटात येणारा गोळा आणि वर चढताना वाटणारी हलकी फुलकी गंमत. कारण भोवतीची माणसं छोटी दिसतात आपण उंच असतो. स्त्रीस्वभावाचीच नाही तर मनुष्य स्वभावाचीच ही गंमत. दुसऱ्याची असूया पाहून वाटणारं समाधान. पावला पावलावर दिसणारा हा माणसाचा स्वभाव त्यावर ठेवलेलं अचूक बोट. तसंच प्रत्येकाच्या मनात कुठं ना कुठं तरी श्वानाची इमानी जात दडून असते. ही लेखिकेची परखड पण शहाणी जाणही कौतुकास्पद आहे.

घरोवरी दिसणाऱ्या भेटणाऱ्या या शकुन, सुनंदा चित्रा, सुषमा, तानूबाई कलेचा साज घेऊन इथे भेटतात, मनाला स्पर्शून जातात.

सुनंदा, चित्रा, सतीश ही तीच तीच नावं बहुतेक कथात येतात. विचारांचा मोठा आवाका असलेल्या लेखिकेला नावांचा तुटवडा का पडावा ? 'खेळणं' मधील समाधान हुडकणाऱ्या मीनाचं एकटेपण यातला सुनंदाचा आनंद, नव्हे तिच्या मनाचं झालेलं ते एक खेळणं आणि 'इमान'मधील सुनंदाचा चित्राच्या असमाधानातला आनंद असा एकसुरीपणा ही काही कथात पहायला मिळतो.

लेखिकेची भाषा ओघवती पण स्वतःचाच एक डौल असलेली स्वतःचंच एक वजन असलेली पण तेही सहजतेनं पेलणारी आहे. 'मान्यय्' 'नं' 'कं' असले काही शब्द खटकतात ही गोष्ट अलाहिदा.

अर्पण पत्रिकेतल्या भवभूतीप्रमाणे लेखिकेला निश्चितच समकालिनांची उपेक्षा झेलावी लागणार नाही.

□ □

शकुंतला जोग
३६३/३ शिवाजीनगर
पुणे–५

चर्चा

जगातली पहिली विज्ञान कविता आणि तिचा कवी.

डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे यांनी युगवाणीच्या नोव्हेंबर–डिसेंबर १९८४ च्या अंकात 'कविता आणि विज्ञानकविता' या शीर्षकाचा एक लेख लिहिला आहे. हा लेख मी विज्ञान साहित्याचा प्रेमी म्हणून वाचला. या लेखातल्या शेवटच्या ओळी वाचून माझं मन अत्यानंदानं भरून आलं. या ओळी अशा–

"शेवटी मी विज्ञानकवी असलो, आणि माझ्या हातून मराठीतच नव्हे तर जगात हा प्रकार प्रथम निर्माण झाला असला तरी मी वर नमूद केलेल्या निकपावर पुरेपूर कुठे उतरतो! अजून मलाही खूप चालावे लागणार आहे!"[१]

या ओळी वाचून जगात प्रथम ज्याच्या हातून विज्ञानकविता निर्माण झाली अशा माणसाला आपण ओळखतो, यामुळेच मला अत्यानंद झाला होता. 'इंटरनॅशनल सायन्स फिक्शन इअरबुक' दरवर्षी इंग्लंड / अमेरिकेतून निघतं. दोन्ही एकाच प्रकाशनातर्फे या दोन देशात एकाचवेळी प्रकाशित केली जातात. अशा या 'इअरबुक' किंवा वार्षिकात या गोष्टीची नोंद व्हायलाच हवी, असंही माझ्या मनात आलं. एवढ्या मोठ्या मानाचा मानकरी एक मराठी माणूस असावा, तो आपल्या ओळखीचा असावा नि त्याचं नाव जगात (युगवाणीचे वाचक सोडून) इतर कुणालाच ठाऊक नसावं, याचं मला मनोमन दुःख झालं.

तरीही 'सायन्स फिक्शन इअरबुक १९८६' ला ही नोंद पाठवण्यापूर्वी १९६८–६९ पूर्वी[१] असा काही साहित्यप्रकार इतरत्र कुठे निर्माण झालाय कां? याचा शोध घ्यायचं मी ठरवलं. परंतु 'विज्ञान कविता म्हणजे नक्की काय? हे स्पष्ट झालेलं नाही', त्यातल्या त्यात 'वर नमूद केलेल्या निकपावर (मी) पुरेपूर कुठे उतरतो!'[१] या वाक्यांनी माझी पंचाईत केली. म्हणजे उद्या कुणी म्हटलं की या विज्ञानकविता नव्हेत, तर डॉ. शि. गो. दे. हे हात झटकायला मोकळे नि मी तोंडघशी पडणार; आणि डॉ. शि. गो. दे. खूप चालत राहणार. वरं, डॉ. शिरीष गोपाळांनी जशी विज्ञान कविता म्हणजे काय? हे मलाही पुरते कळले नाही, असं म्हटलंय, त्या प्रमाणे जगाबद्दल काहीही विधान केलेलं नाही, ही आणखी एक पंचाईत. कारण जग हे व्यक्तिसापेक्ष बदलतं. स्वतः- भोवतालचं जग हे एखाद्या खोलीपुरतंही मर्यादित असू शकतं. खगोलशास्त्रज्ञाचं जग हे आपल्या आकाशगंगेच्याही पलिकडे पसरलेलं असतं. तेव्हां डॉ. शि. गो. देशपांडे 'जगात प्रथम' असल्याचा मान मिळवतात ते जग कुठलं? कारण आता आपल्याच आकाशगंगेत अनेक ठिकाणी बुद्धिमान सजीव असावेत असे शास्त्रज्ञ मान्य करतात.[२] या ठिकाणी इ. स. १९६८–६९ या पृथ्वीवरील कालाच्या समांतर काला आधी विज्ञानकविता निर्माणच झाली नाही याची खात्री डॉ. देशपांडे देऊ शकतील कां?

पृथ्वीवरच्या कवितांसंबंधी बोलायचं असेल तर अमेरिकेची संयुक्त संस्थाने या नावाचं आणि 'अमेरिका' या नावानं ओळखलं जाणारं एक राष्ट्र पृथ्वीवर अजूनही अस्तित्वात आहे. तिथे 'एडगर ॲलन पो' या नावाचे एक गृहस्थ १८०९ साली जन्मले आणि १८४९ साली वारले. रे ब्रॅडबरी, ओलाफ स्टेपलडन आणि आयझॅक ॲसिमोव यांनी एडगर ॲलन पोंना गुरुस्थानी मानले. सी. एस. ल्युईस (किंवा लेवीस) ब्रायन आल्डिस यांनीही ई. ए. पो यांचे श्रेष्ठत्व मान्य केले आहे.

या एडगर ॲलन पोंना अमेरिकन विज्ञानकथेचे जनक मानण्यात येते.[४] एडगर ॲलन पो यांच्या अल् आराफ, द कॉन्व्हर्सेशन ऑफ आयरॉस ॲंड चार्मियॉन* आणि 'द सिटी इन द सी' या तीन कविता 'डेफिनिटली सायन्स फिक्शन' आहेत असं म्हटलं जातं. [द एनसायक्लोपेडिया ऑफ सायन्स फिक्शन, एडिटर पीटर निकोल्स, ग्रॅनडा].[३]

या कवितांबद्दल पुन्हा कधीतरी लिहिता येईल; पण महत्त्वाचे म्हणजे या कविता अनुक्रमे १८२९, १८३९ व १८३१ या साली प्रसिद्ध झाल्या आहेत. याशिवाय ई. ए. पोंनी 'सायन्स फिक्शन' म्हणता येतील अशा सुमारे बारा कविता[५] लिहिल्या. तेव्हा पृथ्वीवरचे पहिले विज्ञानकवी असल्याचा मान एडगर ॲलन पो यांच्याकडे जातो, असं मला वाटतं. दुसरे विज्ञानकवी कोण, हा लेख विषय "मी या जगातला पो यांच्यानंतरचा विज्ञानकवी आहे," असा दावा कुणी केल्यास लिहिता येईल. सध्यातरी आपण एडगर ॲलन पो यांनी १९६८-६९ पूर्वी आपली विज्ञानकविता केली एवढे मान्य करू या.

या संदर्भात इथं इसापनीतीतील एक गोष्ट आवडते. एक बेडूक एका डबक्यात रहात होता. आपल्या एवढे या जगात कुणीच मोठे नाही असा त्याला गर्व झाला होता. यापुढची बेडूक फुटेपर्यंतची गोष्ट व तिचे तात्पर्य सर्वांनाच ठाऊक असल्याने ती पूर्ण लिहायचे प्रयोजन दिसत नाही; पण जेव्हा आपण सर्वश्रेष्ठत्वाचे किंवा सर्वात आधी एखादी गोष्ट निर्माण केल्याचे दावे करतो तेव्हा जरा टाचा उंचावून आजूबाजूच्या जगाची माहिती करून घेतली तर असे दावे हास्यास्पद ठरणार नाहीत, किंबहुना केलेच जाणार नाहीत असे वाटते.

संदर्भ :

१. कविता आणि विज्ञान कविता : डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे. युगवाणी, नोव्हें-डिसें. १९८४.

२. द कॉसमॉस : कार्ल सागन, ग्रॅनडा. १९७८.

३. द एनसायक्लोपिडिया ऑफ सायन्स फिक्शन : एडिटर पीटर निकोल्स, ग्रॅनडा १९८०.

४. एडगर ॲलन पो-सायन्स फिक्शन पायोनियर : क्लार्क ओस्नी, जॉर्जिया रिव्ह्यु १९५८.

५. अमेरिकन सायन्स फिक्शन ऑफ द नाईंटिंथ सेंचुरी : एडिटर एच्. ब्रूस फ्रॅंकलिन. १९६६. फोअरस्केयर.

*यावरूनच वास्तवशास्त्रातील 'चार्म' ही संज्ञा अस्तित्वात आली.

निरंजन सिहेंद्र घाटे
७३४, सदाशिवपेठ
पुणे ४११०३०

सिद्धान्त पडताळावे

युगवाणी (मे-जून '८५) चा अंक मुखपृष्ठापासून आवडला. आपल्या वि. सा. संघाने आयोजलेल्या पहिल्या विज्ञान साहित्य संमेलनासाठी तयार केलेले मान्यवरांचे निबंध युगवाणीत छापण्याचा उपक्रम स्तुत्य जरूर आहे. सदर निबंधांचा सारांश तर कौतुकास्पद आहे, विचारार्ह आहे. मलाही अवकाश विज्ञान-काही दिवस झाले-मनापासून आवडतं. या बाबतींत एका रशियन ललित लेख संग्रहातील (इंग्रजी भाषांतर) एक वाक्य सार्थ वाटतं-Poets and Astronomers are the blood brothers.

विज्ञानाबाबत माझं एक ठाम मत आहे की या विषयाची आवड असणाऱ्या अभ्यासूंनी काही संशोधन प्रत्यक्ष व सखोल करावं किंवा निदान त्याबाबतीतले जगन्मान्य झालेले जे मूलभूत सिद्धांत आहेत, आयुष्यच्या आयुष्य खर्च करून मांडलेले-प्रत्यक्ष पडताळून पहावेतं. अवकाश विज्ञानातले जगन्मान्य सिद्धान्त पडताळून पहाण्यासाठी स्वतःची दुर्बीण (telescope) कां असू नये? दुर्दम्य इच्छा-शक्ती असायला लागते, काही हुडकायचं व पडताळायचं तर. स्वस्तातली प्रसिद्धीची हाव टाकूनच द्यायला हवी.

आपल्याकडे शनी माहात्म्याची पोथी आहे. ती पोथी व शनिग्रहाबाबत अगदी अलिकडची उपलब्ध किंवा स्वतः मिळवलेली माहिती (दुर्बिणीच्या मदतीनं) यांची सांगड घालून काही लिखाण नक्की

करता येईल. तसंच इतरांच्या बाबतींतही उदा०– सप्तर्षी, देवयानी इ. इ.

अरुण शहाणे
नगर–पुणे रोड
नॅशनल बॅटरीजसमोर
केडगाव, अहमदनगर.

एक स्पष्टीकरण

'युगवाणी'च्या मे–जून, १९८५ अंकात डॉक्टर विश्वेश्वर सावदेकर यांचा "मराठी-विज्ञान कथा अस्सल किती? नक्कल किती?" हा लेख वाचला त्या मधे मला एक चूक जाणवली. लेखकाने श्री. ना. के. बेहेरे यांची "ध्येयाकडे" ही कादंबरी एच. जी. वेल्स यांच्या "टाईम मशीन"चा मराठी अनुवाद असे म्हटले आहे. माझ्या वाचनाप्रमाणे "ध्येयाकडे"मधील मध्यवर्ती कल्पना फक्त 'Time Machine' वरून घेतलेली आहे. गोष्ट व तपशील सुद्धा स्वतंत्र, अनुवादित नाही. 'ध्येयाकडे'च्या प्रस्तावनेतसुद्धा 'Time–Machine'चा आधार व मध्यवर्ती कल्पना तीच आहे असेही म्हटले आहे. परंतु कथानक–पात्रे सर्वस्वी स्वतंत्र आहेत. अनुवाद किंवा भाषांतर तर नक्कीच नाही. आपल्यात जे लेखक हयात नाहीत, त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून हे पत्र.

प्रताप नारायण बेहेरे
नाशिक–२

मोठ्यांचे मोठे आजार

'युगवाणी' मे/जून ८५ अर्थात 'विज्ञान संमेलन विशेषांक" वाचला. आवर्जून पत्रप्रपंचास कारण की डॉ. विश्वेश्वर सावदेकरांचा "मराठी विज्ञानकथा किती अस्सल? किती नक्कल?" हा लेख फारच आवडला. ह्यातही ह्या समाजव्यवस्थेविरुद्धची एकच गोष्ट फक्त खटकली. "डार्विनच्या उत्क्रांती-वादाची चाचणी"चे लेखक श्री. किशोर कुळकर्णी यांचे श्री. शिरीष दातार यांनी "पितळ" उघडे पाडल्याचा त्यांनी उल्लेख केला आहे. परंतु अशा लहानशा अर्थात पूर्णतः नावारूपास न आलेल्या लेखकांचा उपमर्द करणारे अनेक आढळतील व ते त्यातच स्वतःला कृतकृत्य समजून घेतील. परंतु सावदेकरांनी दिलेल्या संदर्भानुसार श्री. जयंत नारळीकर, निरंजन घाटे, ग. रा. टिकेकर इत्यादी सारख ख्यातनाम जेष्ठ श्रेष्ठ कथाकारही कुळ-कर्णीसारखाच उद्योग करतांना दिसतात. परंतु शिरीष दातारांसारख्याची हिंमत नाही होत की त्यांनी हे असं केलं हे छातीठोकपणे सांगायची. जसं किशोर कुळकर्णींच्या बाबतीत घडलं आहे.

वरं, दुसरी गोष्ट अशी की हेच समजत नाही, की ग. रा. टिकेकर ह्यांचा "अक्षरांचा पाऊस" हा कथासंग्रह माझ्या वाचनात आला. त्यात डॉ. नी म्हटल्याप्रमाणे खरोखरच टिकेकरांनी कुठेच ऋणनिर्देश केलेला नाही. ह्यात कुठला मोठेपणा ह्या थोर लेखकांना वाटतो, तेच कळत नाही. हे म्हणजे वाघाचं कातडं पांघरून दरारा निर्माण करण्यातलाच प्रकार नाही का होत? कुठलं भूषण वाटतं ह्यांना असं मटेरियल स्वतःच्या नांवावर खपवण्यात? कारण मी जेव्हा टिकेकरांचा 'अक्षरांचा पाऊस' वाचला तेव्हा मला खरोखरच टिकेकरांचं कौतुक वाटलं होतं, की इतक्या प्रचंड कल्पना कशा ह्यांच्या डोक्यातून प्रसवतात ते! पण ह्या सगळ्याच "नक्कल कथा" आहेत असे जेव्हा कळलं तेव्हा मला टिकेकरांची खरोखरच कीव आली, की दुसऱ्याची प्रचंड कल्पनाशक्ती ह्यांनी स्वत.च्या नांवावर सामान्य वाचकांच्या गळी उतरवली, आणि सामान्य वाचकांचा विश्वासघात केला.

वरं आणखी महत्त्वाची आणि अवश्य विचार व्हावा अशी गोष्ट म्हणजे 'किर्लोस्कर, दीपावली मौज प्रकाशन, मॅजेस्टिक, विश्वमोहिनी, नवल, रविराज प्रकाशन, मेहता इत्यादी मासिकं व प्रका-शन संस्थांच्या संपादक संचालकांची काहीच जबाब-दारी पोहोचत नाही काय? प्रकाशनापूर्वी अस्सल–नक्कल भेद उघड करून घेण्याची किंवा ऋणनिर्देश वाचकांपर्यंत पोहोचविण्याची! लेखक मोठा दिसतो तो म्हणतो की "संपूर्ण स्वतंत्र," म्हणून तसंच समजायचं आणि बेधडक प्रसिद्ध करायचं? ह्या

वरही संपादक-प्रकाशकानी शहानिशा करून घेणे आवश्यक नाही काय ?

असो, मोठ्याचा आजारही मोठा अन् उपचारही मोठा म्हणतात ना !

पण एवढं मात्र खरं की मोठ्यांच्या नांवानी ओरडणारा की "हा चोर आहे" म्हणून विरळाच सापडायचा व किशोर कुळकर्णीसारखे नवे लेखक मात्र नाऊमेद जरुर होतील. याचा अर्थ कृपया, मी कुळकर्णींचं समर्थन करतो, असा कुणीही करू नये.

श्रीकांत गोंधळेकर
ज्यु. इंजिनीअर,
सा. बां. विभाग—आलापल्ली
मु. पो : आलापल्ली, ता. : अहेरी,
जि. : गडचिरोली, पिन : ४४२७०३.

वैज्ञानिक परिभाषा

टाइम्स ऑफ इंडिया मध्ये बातमी वाचली की आपल्या वतीने नागपूर येथे "अखिल भारतीय विज्ञान साहित्य संमेलनाचे 'पहिले अधिवेशन' भरले होते व त्यात मराठी विज्ञान साहित्याच्या उत्कर्षासाठी काही ठराव मंजूर झाले. याबाबत माझे काही विचार पुढे देत आहे.

(१) मराठी विज्ञान लेखक (अगदी M. Sc Ph. D. सुद्धा) त्यांच्या विज्ञान लेखनात / भाषणात, पुष्कळदा अगदी चुकीची माहिती देतात ! याची अनेक उदाहरणे मी दाखवू शकेन. विज्ञान विषयाची पुस्तके, विज्ञान मासिकातील / वर्तमान पत्रातील लेख, आकाशवाणीवरील भाषणे व श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे शालेय पाठ्य पुस्तके (विज्ञान विषयाची) शालेय शैक्षणिक-पाठ दूरदर्शनवरील शैक्षणिक पाठ, या सर्वात चुका असतात व अजूनही नव्या नव्या चुका केल्या जात आहेत. (आपण मागितल्यास त्या लेखकांची नावे व पुस्तकांची माहिती कळवीन). शालेय पाठ्य पुस्तके (८ वी, ९ वी व १० वी) यांतील चुकांबद्दलचे माझे लेख मुंबईच्या नवशक्तीच्या जून १५, १६ व १७ या तारखांच्या अंकात प्रसिद्ध झाले आहेत. (एकच उदाहरण देतो. "सुलभ विज्ञानकोश" या नावाचे एक पुस्तक, नाशिकच्या काही वैज्ञानिकानी लिहिले, त्याच्या प्रस्तावनेत प्रकाशकांनी उल्लेख केला आहे की या पुस्तकाची हस्तलिखिते प्रा. भालवा केळकर यांनी तपासून ती निर्दोष असल्याची ग्वाही दिली आहे. परन्तु त्या पुस्तकात मला १०० च्या वर चुका सापडल्या व त्यांबद्दल माझा लेख पुण्याच्या सृष्टिज्ञान मध्ये प्रसिद्ध झाला होता). वैज्ञानिकांनी अचूक माहितीच दिली पाहिजे यासाठी काहीतरी केले पाहिजे.

(२) बहुतेक वैज्ञानिक, इंग्रजीतून मराठीत भाषांतर करताना जेथे मोठ्या संख्यांचा उल्लेख असतो तेथे मिलियन या शब्दाबद्दल दशलक्ष शब्द घालून 'अगदी शब्दश:' भाषांतर करतात. वास्तविक त्यांनी भारतीय पद्धतीप्रमाणे अब्ज, कोटी, व लक्ष हे शब्द वापरूनच भाषांतर केले पाहिजे, उदा. "२६३ दशलक्ष" नव्हे तर २ कोटी ६३ लक्ष "२४३९५७ दश लक्ष नव्हे तर २४ अब्ज ३९ कोटी ५७ लक्ष.

(३) सर्व मराठी विज्ञान लेखकानी Uniformity साठी, फक्त महाराष्ट्र शासनाने (भाषा संचालनालयाने) प्रसिद्ध केलेल्या पारिभाषिक शब्द कोशातील शब्दच मराठी लेखनात वापरले पाहिजेत.

द. ज. जोगळेकर
५५, हिंदू कॉलनी, दादर,
मुंबई ४०००१४

कादंबऱ्या आधारित नाहीत ?

आपल्या मे जूनच्या विज्ञान साहित्य विशेषांकात श्री. विश्वनाथ सावदेकर व श्री. निरंजन घाटे यांनी लिहिलेल्या लेखांसंबंधी हे पत्र.

दोघांनीही असे लिहिले आहे की माझ्या 'स्फोट' आणि 'विप्लवा' या कादंबऱ्या परकीय कादंबऱ्यावर आधारित आहेत. श्री. घाटे यांनी तर असेही लिहिले आहे की लेखकांना विचारूनच त्यांच्या कादंबऱ्या स्वतंत्र की आधारित असा निर्देश त्यांनी केलेला आहे.

माझ्यातर्फे सांगायचे तर या दोन्ही कादंबऱ्या

मी स्वत: अक्कलहुशारीने स्वतंत्रपणे लिहिल्या आहेत. श्री. घाटे यांना या कादंबऱ्या आधारित आहेत असे मी कधीही सांगितलेले नाही. आणि त्या आधारित असत्या तर तसा स्पष्ट ऋणनिर्देश करण्यास मला कुठलाही संकोच वाटला नसता.

श्री. सावदेकर यांनी 'विप्लवा'चे क्लार्कच्या एका कादंबरीशी साम्य आहे असे दर्शविले आहे. ती कादंबरी मी खरोखरच वाचलेली नाही, असे माझे अज्ञान प्रामाणिकपणे कबूल करण्यात मला मुळीच संकोच वाटत नाही.

आणि शिवाय एखाद्या परकीय कादंबरीचे मराठी कादंबरीशी साम्य आढळताक्षणीच तावडतोब मराठी लेखकाने ती कल्पना उचलली आहे, असा निष्कर्ष काढणे म्हणजे आपणा भारतीयांच्या बौद्धिक न्यूनगंडाचे लक्षण तर नव्हे? 'विप्लवा'मधे आणि त्या कादंबरीत साम्य आहे की नाही हे अजून मला माहित नाही.

स्वत:च्या साहित्याबद्दल सहसा लिहिण्याचे टाळतो. मी स्वत: या दोन कादंबऱ्या विज्ञान कादंबऱ्या म्हणून लिहिलेल्या नाहीत. त्यांचे हेतू वेगळे आहेत. आणि कल्पना स्वतंत्र आहेत व माझ्याच आहेत असे ठामपणे सांगावेसे वाटते. वाचकांच्या मनात किंतु राहू नये म्हणून आपण हे पत्र छापाल अशी आशा आहे.

— अरुण साधू
मुंबई

प्रवर्तकांची जवाबदारी

'युगवाणी'ने विज्ञान साहित्यविषयक दोन अंक काढले, हे योग्यच झाले; अर्थात एकच भरीव अंक काढून त्यात (१) ललित विज्ञान साहित्य (२) ल. वि. साहित्य समीक्षा (३) ल. वि. साहित्यसूची (४) ल. वि. साहित्यिकांचा परिचय इत्यादि विषयांचा समावेश झाला असता तर ते अधिक योग्य झाले असते. असो.

ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, जनसाहित्य इत्यादी वाङ्मयीन वळणांप्रमाणेच विज्ञान प्रेरित ललित साहित्याचे वळणही आजच्या मराठी वाङ्मयाला सहायक ठरू शकेल. मात्र त्याच्या प्रवर्तकांनी आत्मकेंद्रितता आणि प्रदर्शनीपणा टाळला पाहिजे; प्रवर्तकांवर विशेष जवाबदारी असते.

डॉ. द. भि. कुळकर्णी
ए–वन्, जंतरमंतर
अमरावती मार्ग नागपूर ४४००१०

कागद व मुद्रणाचे दर वाढल्यामुळे 'युगवाणी'ची वार्षिक वर्गणी रु. २५ करण्यात आली आहे.

आता 'युगवाणी'च्या प्रत्येक अंकाचे मूल्य रु. ६ राहील, याची वर्गणीदारांनी आणि वाचकांनी नोंद घ्यावी

संपादक
युगवाणी

वि. सा. संघाचे अ. भा. पहिले विज्ञान साहित्य संमेलन

प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखालील वि. सा. संघाच्या नव्या कार्यकारिणीने आपल्या कार्यकालाच्या प्रारंभाला जाहीर केलेल्या संकल्पानुसार पहिले मराठी विज्ञान साहित्य संमेलन साहित्य संघाच्या वतीने गेल्या २८ व २९ जून रोजी नागपूर येथे धनवटे रंग-मंदिरात अतिशय उत्साहाने आणि दिमाखाने पार पडले. सुविख्यात नाट्य-दिग्दर्शक व विज्ञान-लेखक प्रा. भालबा केळकर हे अध्यक्षस्थानी होते.

महाराष्ट्रातीलच नव्हे, तर अखिल भारतातील थोर विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन झाले. केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री ना. श्री. शिवराज पाटील हे या संमेलनात मुख्य पाहुणे म्हणून, तर महाराष्ट्रातील एक सजग संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर हे विशेष पाहुणे म्हणून या संमेलनाला आवर्जून उपस्थित होते.

या संमेलनाच्या निमित्ताने साहित्य संघाच्या श्री शिवाजी ग्रंथालयाच्या वतीने मराठीतील विज्ञानविषयक साहित्याचे एक विशेष प्रदर्शन गडकरी सभागृहात मांडले होते. ना. शिवराज पाटील यांनी या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

संमेलनानिमित्त वि. सा. संघाचे मुखपत्र असलेल्या 'युगवाणी'चा एक विशेष विज्ञान-साहित्यविषयक अंक काढण्यात आला होता. श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांनी या अंकाचे प्रकाशन केले. संमेलनानिमित्त बोलावण्यात आलेल्या शोध-निबंधांचा या अंकात प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

मराठी साहित्यामध्ये विशेषत: ललित साहित्यामध्ये विज्ञान-साहित्याला आज एक लक्षणीय स्थान प्राप्त झाले असले तरी मराठीतील विचारवंतांचे ह्या साहित्यप्रवाहाकडे म्हणावे तितके लक्ष गेलेले दिसत नाही. विज्ञान साहित्य म्हणजे काय, विज्ञान-काल्पनिकांना काय म्हणायचे, या साहित्य प्रवाहाची वैशिष्ट्ये काय, आजचा समाज आणि विज्ञान साहित्य यांचा संबंध काय असू शकतो-काय असावा आदी प्रश्न विज्ञान-साहित्याच्या संदर्भात उभे होतात. या प्रश्नांविषयी आज तरी अनेकांच्या कल्पना धूसर आणि अपरिपक्वच आहेत. ही जाणीव ठेवूनच उपरोक्त प्रश्नांचा उहापोह करण्यासाठी वि. सा. संघाने या संमेलनाचे आयोजन केले होते व ती एक या साहित्य-क्षेत्रातील ऐतिहासिक महत्त्वाची बाब होती. संमेलनाचे उद्घाटक, परिसंवादात भाग घेणारे महनीय वक्ते आणि अन्य मंडळींनीही आपापल्या भाषणातून वरील बाबींची ग्वाही दिली.

डॉ. बाळ फोंडके, ज. रा. फणसळकर, ना. बा. ठेंगडी, डॉ. यशवंत पाठक, रा. वि. सोवनी, आनंद सहस्रबुद्धे, किशोर कुळकर्णी, शुभदा गोगटे, सुबोध जावडेकर, डॉ. वसंत वऱ्हाडपांडे, डॉ. दिलीप डबीर, डॉ. दमयंती पांढरीपांडे, प्रा. ह. चं. घोंगे व डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे यांनी यात भाग घेतला.

दोन दिवस चाललेल्या या संमेलनात 'विज्ञान साहित्याला प्रतिष्ठा कशी प्राप्त होईल' या विषयावरील परिसंवाद, विज्ञान कथा-कथन, शोध-पत्रिकांचे वाचन, आणि खुले अधिवेशन असे भरगच्च कार्यक्रम झाले. डॉ. उषा देशमुख, डॉ. विश्वेश्वर सावदेकर, निरंजन घाटे, गजानन क्षीरसागर,

शोध-प्रबंध वाचनासाठी डॉ. जयंत नारळीकर यांचा निबंध आलेला होता व तो वाचून दाखविण्यात आला.

प्रारंभी सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर उपाध्यक्ष डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे यांनी संमेलनामागील साहित्य संघाची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे संचालन संमेलन सचिव डॉ. विश्वेश्वर सावदेकर यांनी केले व आभार-प्रदर्शन सचिव श्री. योगेश बऱ्हाणपुरे यांनी केले.

खुल्या अधिवेशनांत अ. य. खरे, डॉ. प्रबोधचंद्र देशमुख, प्रकाश देशपांडे, अ. ल. लिमये, श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रसेनजित ताकसांडे, उल्हास मनोहर, यशवंत पाठक यांनी भाग घेऊन संमेलनात चांगल्या चर्चा घडवून आणल्या. अभ्यासक्रमात विज्ञान साहित्याला स्थान देणे, प्रसार माध्यमांनी विज्ञान साहित्याकडे लक्ष देणे, विज्ञान साहित्याच्या प्रसारासाठी संमेलने भरविणे आदी विषयांवर खुल्या अधिवेशनात ठराव करण्यात आले.

वि. सा. संघाचे सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर, उपाध्यक्ष डॉ. शि. गो. देशपांडे, धनवटे रंग मंदिराचे आमंत्रक अ. ल. लिमये, चिटणीस योगेश बऱ्हाणपुरे, संमेलन सचिव डॉ. विश्वेश्वर सावदेकर, विज्ञान परिषदेचे श्री. अनंत खरे व अन्य पदाधिकारी आदींच्या विशेष परिश्रमामुळे संमेलनाची यशस्वी सांगता झाली.

□ □

केन्द्रीय कार्यवृत्त
पहिले विज्ञान मराठी साहित्य संमेलन
दि. २८–६–१९८५ ते ३१–८–१९८५

दि. २८ व २९ जून : वि. सा. संघातर्फे पहिले अ. भा. मराठी विज्ञान साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष प्रा. भालबा केळकर, उद्घाटक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रमुख अतिथी श्री. मुकुंदराव किर्लोस्कर व केन्द्रीय विज्ञान व अणुशक्ती मंत्री नामदार शिवराज पाटील हे होते. ह्या संमेलनात संशोधन पत्रिकावाचन, विज्ञान साहित्यावरील परिसंवाद, विज्ञान कथाकथन, विज्ञानविषयक एकांकिकेचा प्रयोग आदी भरगच्च कार्यक्रम झाले. संमेलनाच्या सर्वच कार्यक्रमांना रसिकांचा अतिशय चांगला व उत्स्फूर्त प्रतिसाद होता. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी या. संमेलनाचे संयोजक डॉ. शि. गो. देशपांडे, सचिव डॉ. विश्वेश्वर सावदेकर व श्री. अ. य. खरे ह्यांनी विशेष परिश्रम घेतले.

विज्ञान साहित्य संमेलन ही मराठी साहित्य–जगतातील एक ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल. वि. सा. संघाच्या पुढाकारामुळे हे संमेलन घडून आले, ह्याचीही येथे साभिमान नोंद करावयास हवी.

दि. १४ जुलै : वि. सा. संघाच्या ९–६–८५ च्या विशेष साधारण सभेत बहुमताने संमत झालेल्या घटनेतील बदलावर शिक्कामोर्तब करण्यासाठी विशेष साधारण सभा होऊन सभेने त्यावर शिक्कामोर्तब केले. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष प्रा. राम शेवाळकर होते.

दि. १८ ते २१ जुलै : वि. सा. संघ आयोजित कै. सौ. विजया देवपुजारी स्मृति महिला एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यंदाच्या वर्षापासून निर्मिती पारितोषिकाच्या रकमेत भक्कम वाढ करण्यात आली हे विशेष. ह्या स्पर्धेत एकूण १२ संस्थांनी भाग घेतला. परीक्षक डॉ. सौ. विजया रानडे, सौ. प्रतिभा पांडे व श्री. वसंत सदाशिव नानल होते. स्पर्धेचे संयोजन सौ. कुमुदताई पाठक ह्यांनी केलें. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी स्पर्धेतील विजेत्या संस्था व कलावंतांना मराठी रंगभूमीवरचे विख्यात अभिनेते श्री. चित्तरंजन कोल्हटकर यांचे हस्ते पारितोषिक वितरण समारंभ झाला. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर होते. ह्या कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर ह्यांनी केले.

स्पर्धेचा निकाल

" रंजन कला मंदिर "ने सादर केलेल्या उदयन ब्रम्ह लिखित आणि सौ. अलका कुळकर्णी दिग्दर्शित " सासू संमेलन " या एकांकिकेने निर्मिती / दिग्दर्शन आणि अभिनय या तिन्ही विभागातील प्रथम क्रमांकाची पारितोषिके पटकावून वि. सा. संघाच्या कै. सौ. विजया देवपुजारी स्मृती महिला एकांकिका स्पर्धेत तिहेरी मुकुटाचा मान मिळविला.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट लेखनाचे रु. ३१ /– चे पारितोषिक कल्चरल एज्युकेशनने सादर केलेल्या " दोन ध्रुव " या एकांकिकेची लेखिका कु. संगीता गिजरे हिला मिळाले. तर त्याच एकांकिकेतील कु. गौरी पांढरेला सर्वोत्कृष्ट बाल कलाकारांसाठी असलेले रु. ५१ /– चे श्री. चंद्रकांत कुळकर्णी पुरस्कृत कै. सुशीलाबाई कुळकर्णी स्मृती पारितोषिक मिळाले आहे.

अनुक्रमणिका

निर्मिती : १. व्यंकटेश ब्रम्हदेव जागीरदार फिरती ढाल व कै. यशोदाबाई मोरे पारितोषिक रु. ३०१/- रोख-"सासू संमेलन" (रंजन कला मंदिर) २. उत्कर्ष कलामंदिर फिरती ढाल व रु. २०१/- रोख विभागून-"दोन ध्रुव" (कल्चरल एज्युकेशन सोसायटी) व "मी तर नाही ना" (रंग स्वानंद) ३. वि. सा. संघ व कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक रु. १०१/- रोख-"उपसंहार" (हर्णे महिला समाज) व उत्तेजनार्थ पारितोषिक "पेटता वसंत हा" (अंकूर रंगभूमी).

दिग्दर्शन : १. वि. सा. संघ व कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक रु. ५०/- रोख व प्रशस्तिपत्र, सौ. अलका कुळकर्णी (सासू संमेलन), २. वि. सा. संघाचे परितोषिक रोख रु. २५ व प्रशस्तिपत्र कु. कल्पना गडेकर (मी तर नाही ना).

अभिनय : १. वि. सा. संघाचे रु. ३१/- रोख व कै. मनोरमाबाई पोतदार पारितोषिक रु. ५१/- रोख व प्रशस्तिपत्र सौ. श्यामला पटवर्धन ("सासू संमेलन" मधील "अंबुताई") २. वि. सा. संघाचे रु. २५/- रोख पारितोषिक व प्रशस्तिपत्र कु. संगीता गिजरे ("दोन ध्रुव" मधील मोठी मीनू) आणि ३. वि. सा. संघाचे रु. २०/- रोख पारितोषिक व प्रशस्तिपत्र कु. मंजुषा पाचपोर ("मी तर नाही ना" मधील विधवा सून) आणि बालकलाकारासाठी असलेले श्री. चंद्रकांत कुळकर्णी पुरस्कृत कै. सुशीलाबाई कुळकर्णी स्मृती पारितोषिक रु. ५१/- रोख कु. गौरी पांढरे (दोन ध्रुव मधील "छोटी मीनू").

लेखन : वि. सा. संघाचे रु. ३१/- रोख व प्रशस्तिपत्र कु. संगीता गिजरे (दोन ध्रुव) आणि उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्र सौ. वंदना चिटणवीस (उपसंहार).

दि. २२ जुलै : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने साहित्य संस्थांच्या अनुदानवाढी-विषयी बोलाविलेल्या मुंबई येथील सभेत संस्थेचे चिटणीस श्री. योगेश बऱ्हाणपुरे ह्यांनी प्रतिनिधित्व केले.

दि. २८ जुलै : वि. सा. संघाची सकाळी कार्यकारी मंडळाची व दुपारी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. ह्यात काही महत्त्वाचे ठराव संमत झाले.

दि. १ ऑगस्ट : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

दि. ३ ऑगस्ट : कै. वसंतराव देशपांडे ह्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी स्मृतिसमिती व वि. सा. संघ संगीत समिती यांच्या संयुक्त सहकार्याने त्यांचे शिष्य पुण्याचे श्री. पद्माकर कुळकर्णी आणि श्री. प्रभाकर देशकर यांच्या गायनाची मैफल झाली. अध्यक्षस्थानी श्री. पी. व्ही. कामत होते. ह्या कार्यक्रमाचे शेवटी श्री. दिनकरराव कुकडे यांनी कै. वसंतराव देशपांडे यांच्या मैफलीची व्हिडीओ फिल्म दाखविली.

दि. ४ ऑगस्ट : केन्द्रीय नभोवाणी मंत्री बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांनी वि. सा. संघाला भेट दिली व संस्थेच्या कार्याची माहिती करून घेतली व समाधान व्यक्त केले.

दि. ७ ऑगस्ट : वि. सा. संघाने स्थानिक बंगाली भाषा संस्थांच्या सहकार्याने रंगमंदिरात रवीन्द्र जयंती साजरी केली. ह्यात गुरुवर्य टागोरांच्या साहित्यावर व्याख्यान व रवीन्द्र संगीत, नाट्य प्रवेश आदी कार्यक्रम सादर करण्यात आले.

दि. ११ ऑगस्ट : वि. सा. संघाने रसिक ह्या संस्थेच्या सहकार्याने साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास स्मृती कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक श्री. यशवंत देव यांचे प्रात्यक्षिकासह 'भक्ति-संगीत प्रवाह, परंपरा, चाली, गायन' यावर भाषण झाले. ह्या कार्यक्रमास श्रीमती वीणाताई हरदास यांचे विशेष साहाय्य झाले.

अनुक्रमणिका

दि. १२ ऑगस्ट : महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. जवाहरलाल दर्डा यांनी वि. सा. संघाला भेट दिली व कार्याविषयी समाधान व्यक्त केले.

दि. १३ ऑगस्ट : कै. पु. भा. भावे यांच्या स्मृती निमित्त स्मृती समिती व वि. सा. संघाने एक कार्यक्रम आयोजित केला. ह्या कार्यक्रमात मुंबई आकाशवाणीचे सुप्रसिद्ध कलावंत श्री. बाळ कुडतरकर व सौ. करुणा देव (नीलम प्रभु) ह्यांनी श्री. पु. भा. भावे यांच्या विषकन्या व पडछाया नाटकातील प्रवेशांचे वाचन केले. कार्यक्रम अतिशय रंगला. अध्यक्षस्थानी प्राचार्य राम शेवाळकर होते. सकाळी आचार्य प्र. के. अत्रे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला.

दि. १४ ऑगस्ट : वि. सा. संघाची कलासमिती व कलाश्रित यांच्या संयुक्त सहकार्याने सुप्रसिद्ध चित्रकार श्री. अरूण मोरघडे यांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

दि. १५ ऑगस्ट : स्वातंत्र्य दिनानिमित्त संस्थेच्या वास्तुवर ध्वजारोहणाचा कार्यक्रम होऊन मिठाई वाटण्यात आली. रात्री श्री. प्रभात सोनवलकर यांच्या गझल गायनाचा कार्यक्रम झाला.

दि. १७ ऑगस्ट : 'पाच कवयित्री व पाच समीक्षक' हा सांस्कृतिक समितीने कार्यक्रम सादर केला. नयना खेर्डेकर, भाग्यश्री कावळे, विजया जोशी व निरूपमा परांजपे या कवियित्रींनी आपल्या रचना म्हटल्यानंतर डॉ. आशा सावदेकर, सौ. सुलभा हेर्लेकर, प्रा. प्रज्ञा आपटे, प्रा. ज्योती लांजेवार व डॉ. दमयंती पांढरीपांडे ह्यांनी ह्या काव्यावर समीक्षात्मक विवेचन केले. अध्यक्षीय समारोप प्रा. सौ. नीला जोशीराव ह्यांनी केला. बरेच दिवसात काव्यारसिकांना काव्यस्वादाचा आनंद मिळाला.

दि. २० ऑगस्ट : सुप्रसिद्ध साहित्यिक व उत्कृष्ट लघुकथाकार श्री. दा. पानवलकर यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकसभा घेण्यात आली.

दि. २५ ऑगस्ट : वि. सा. संघाच्या नाट्यविभागातर्फे "नाटककार गडकरी" हा संगीत नाट्यप्रयोग रंगमंदिरात सादर करण्यात आला.

दि. २७ ऑगस्ट : वि. सा. संघाच्या संगीत समितीने, वागीश्वरी कला स्वानंद या संस्थेच्या सहकार्याने इंदोरचे गायनाचार्य श्री. वामनरावजी राजूरकर ह्यांचा, त्यांनी केलेल्या संगीत सेवेबद्दल सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री. प्रभाकर खर्डेनविस होते. सत्कार समारंभानंतर त्यांच्या गायनाची बैठक झाली.

दि. ३० ऑगस्ट : कवी 'बी' यांची पुण्यतिथी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून साजरी करण्यात आली.

शाखा वृत्त

मूल : दिनांक २२-८-८५ रोजी संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य व युगवाणीचे संपादक श्री. प्रकाश देशपांडे पत्रकारितेच्या अभ्यासासाठी झेकोस्लाव्हिया येथे जात असल्यामुळे त्यांना शाखेच्या वतीने निरोप देण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे नागपूर आकाशवाणीचे संगीत विभाग प्रमुख श्री. वसंतराव अंधारे व नाट्य कलावंत व बालविहाराच्या संयोजिका सौ. अनुराधा जोशी, तर अध्यक्षस्थानी शाखाध्यक्ष प्राचार्य वि. ना. घोटे होते. याप्रसंगी शाखेचे सदस्य सौ. शोभाताई फडणीस सर्वश्री कापगते, नागोसे, येरोजवार, सोनुलवार यांची समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे संयोजन चिटणीस श्री. शशिकांत धर्माधिकारी यांनी तर, यशस्वितेसाठी श्री. गो. पो. कोंडेकर, प्रा. आपटे व श्री. नरेंद्र उपलप यांनी विशेष परिश्रम केले.

डोणगांव : दिनांक १८-७-८५ रोजी "विद्यार्थ्यांच्या आजच्या खालावलेल्या दर्जाला जबाबदार कोण ?" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी येथील

श्रीशिवाजी हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. नवघरे हे होते. प्रास्ताविक भाषण शाखेचे अध्यक्ष श्री. अरविंद सराफ यांनी केले.

परिसंवादांत डॉ. बिडवई, श्री. उमाळकर, श्री. जे. एल. दिनोरे, श्री. के. राम आखाडे, सौ. कमल सावजी, श्री. सरदार, श्री. बोंडगे, श्री. जोशी, श्री. कुळकर्णी, इत्यादी वक्त्यांनी भाग घेतला. तसेच अंजली पिंपरकर, कु. राखी, सावजी व सारंग उमाळकर ह्या विद्यार्थ्यांनीसुद्धा हजेरी लावली. आजच्या खालावलेल्या दर्जाला शासन, समाज, शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालकवर्ग व स्वत: विद्यार्थी जबाबदार असल्याचे प्रतिपादन प्रत्येक वक्त्याने केले. कार्यक्रम बराच वेळ चालला. कार्यक्रमाचे संचालन सचिव श्री. शिंगणे यांनी, तर आभारप्रदर्शन श्री. व्यवहारे यांनी केले. वरील प्रश्नावर विचारमंथन घडवून आणल्याबद्दल शाखेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जवाहरनगर : जवाहरनगर, आयुध निर्माणी, भंडारा, येथे नव्यानेच वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्यात आली. अस्थाई कार्यकारिणीत अध्यक्ष-प्रा. मधुकर गोविंदराव कणेर, उपाध्यक्ष-१. डॉ. चंद्रमोहन गुप्ता, २. श्री. माधव नत्थुजी ब्राम्हणकर, कार्यवाह-श्री. हिरामण तुळशीराम लांजे, सहकार्यवाह १. श्री. श्रीपाद जयकृष्ण नवरे, २. श्री. रूपरेशान उरकुडाजी रोटके, कोषाध्यक्ष श्री. संजीव अनंत सावरगांवकर, सदस्य सर्वश्री महाजन, नाकाडे, दक्षिणकर व हजारे.

उमरखेड : शाखेतर्फे शैक्षणिक क्षेत्रातील एक मान्यवर व्यक्तिमत्व, महाराष्ट्रातील व्यासंगी विचारवंत व सुप्रसिद्ध वक्ते प्रा. के. मा. मुन्शी ह्यांचे निधनाबद्दल शोकसभा घेऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

बुलढाणा : वार्षिक आम सभा दिनांक ६-७-८५ रोजी पार पडली. पुढील वर्षासाठी नवीन कार्यकारिणी एकमताने निवडून आली. अध्यक्ष श्री. गो. या. सावजी, उपाध्यक्ष अॅड्. सुधीर दामले, सचिव-पद्माकर काळकर, सहसचिव-श्रीपाद जोशी, कोषाध्यक्ष-श्री. रंगनाथ गायकवाड, कार्यक्रम प्रबंधक श्री. शंकर कन्हाडे, सदस्य सर्वश्री मधु इंगळे, वसंत गायकवाड, जे. एस. घांडे, गणेश हिंगे, करदळे, मुंधडा, म. पु. घोपे.

दिनांक १-८-८५ रोजी शाखा व अ. भा. मातंग समाज ह्यांच्या वतीने टिळक पुण्यतिथी व शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती अॅड्. ढगे ह्यांचे अध्यक्षतेखाली झाली. ह्याप्रसंगी प्रमुख वक्ते प्राचार्य चव्हाण व प्रा. कुल्ली ह्यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन श्री. पद्माकर काळकर ह्यांनी केले.

३. दिनांक ४-८-८५ रोजी मासिक सभा होऊन त्यात कै. के. एम्. मुन्शी ह्यांना श्रद्धांजली वाहिली.

धामणगांव : दिनांक २४-७-८५ रोजी दुपारी ४ वाजता आदर्श महाविद्यालय, धामणगांव-रेल्वे येथे सभासदांच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते वि. सा. संघाची शाखा स्थापन करून खालील कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष प्रा. वा. द. महात्मे, उपाध्यक्ष १. श्री. ललित सोनोने २. श्री. संदीप देशमुख, सरचिटणीस-प्रा. सुखदेव ढाणके, चिटणीस १. श्री. अरूण लोहे २. श्री. भाऊ शेंदरे, ३. श्री. चेतनकुमार कोठारी, कोषाध्यक्ष-श्री. सुहास काटेकर, कार्यकारी सदस्य-सर्वश्री अण्णासाहेब घोडे, प्रा. शिरीष पाटील, सौ. गीता वाघमारे, श्री. गजानन देशमुख, काळे, तिवारी, व. चे. पसारी, सल्लागार मंडळ-सर्वश्री प्रा. सुभेदार, श्रीखंडे, वाघमारे, देशपांडे, डॉ. उजवणे, वानखेडे, जगताप व करकरे.

वणी : शाखेची सर्वसाधारण सभा दि. २४-७-८५ ला श्रीकृष्ण भुवनमध्ये पार पडली आरंभी प्रा. के. मा. मुन्शी ह्यांना मूक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नूतन सत्राकरिता खालील कार्यकारिणी अविरोध निवडल्या गेली. कार्याध्यक्ष श्री. दादासाहेब हूड, उपाध्यक्ष श्री. अनंतराव ढुमणे,

कोषाध्यक्ष श्री. रतीलाल जयस्वाल, चिटणीस–माधव सरपटवार, सरचिटणीस–श्री. कृष्णा लाडसे, कार्यक्रम प्रमुख प्रा. गुलाब भेदोडकर, सदस्य सर्वश्री अॅड्. ढुमे, अॅड. कोंडावार, गोरकर, सुत्रावे, पाटील, सोनटक्के, खोडे गुरुजी व विवेक सरपटवार, केंद्राध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सभा पार पडली.

तिरोडा : दिनांक ११–७–८५ रोजी शाखेचे अध्यक्ष प्राचार्य गो. मो. कोलते यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळाची सभा पार पडली. सभेत ८५–८६ या वर्षात कोणते कार्यक्रम घेण्यात यावे यावर चर्चा व ठराव झाले. शाखेचे सभासद श्री. गो. मा. जोशी यांना नुकतीच इतिहास विषयात पीएच. डी. मिळाल्याबद्दल कार्यकारिणीने त्यांचे अभिनंदन केले.

नवीन मान्यता प्राप्त शाखा

१. धामणगाव (जि. अमरावती).

२. चिखलदरा (जि. अमरावती).

नवीन आजीव सभासद

(१) सुधीर प्रल्हाद जोशी, (२) टी. एन. सिध्रा, (३) सौ भारती जयंत सुदामे ; (४) मनोहर माधवराव ढोक, (५) डॉ सौ. यामिनी दिगंबर आळशी, (६) सुरेश घडयाळपाटील, (७) अॅड्. पराग लुले, (८) उदयन ब्रह्म, (९) डॉ. सुनील पारसे, (१०) सुनील टकले, (११) विवेक देवपुजारी, (१२) नारायण त्रिवेदी, (१३) रामभाऊ झंझाड, (१४) सौ. रोहिणी सावदेकर, (१५) श्यामकांत फडणीस, (१६) राजीव चिमोटे, (१७) दीपक जोशी. (१८) प्रभाकर चाफेकर, (१९) सुधीर देव, (२०) अॅड्. अनिल खेडीकर, (२१) अॅड्. विलास निलावार, (२२) अनिल शर्मा, (२३) डॉ. रूपा कुळकर्णी, (२४) श्रीपाद भालचंद्र जोशी, (२५) अॅड्. अविनाश गुप्ता, (२६) अॅड्. प्रमोद पाठक, (२७) बलवंत (बाळ) जनार्दन कुळकर्णी, (२८) तुकाराम नामदेव पाटील, (२९) सौ. अनुया अरुण आपटे, (३०) सौ. चित्रा रमेश अंभईकर, (३१) सौ. स्मीता उल्हास केळकर, (३२) सौ. स्वप्ना विनय वैद्य, (३३) सौ. संध्या सतीश सहस्त्रबुद्धे, (३४) सौ. मीनल दिलीप वाईकर, (३५) नरेश खंडेराव जोशी, (३६) विजय शरच्चंद्र देशपांडे, (३७) सौ. वैशाली जयंत चितळे, (३८) अनिलकुमार वैद्य, (३९) दिलीप मुळे, (४०) सौ. शोभा सुधीर आपटे, (४१) सौ. मृणाल पुराणिक, (४२) चंद्रकांत कुळकर्णी, (४३) प्रबोधचंद्र देशमुख, (४४) सौ. कल्याणी देशमुख, (४५) अ. म. मांजरखेडे, (४६) सुधाकर र. लोखंडे, (४७) सौ. सुनंदा विजय नारळे, (४८) शक्तीकुमार मदनलाल संचेती, (४९) सौ. विजया शक्तीकुमार संचेती, (५०) मोरेश्वर (बाळ) गजानन मंगरूळकर; (५१) अशोक शंकरराव मगरकर, (५२) सौ. ज्योत्स्ना धर्माधिकारी, (५३) सौ. प्रतिभा कुळकर्णी, (५४) कु. तनुजा मधुसूदन भांवुरकर, (५५) सौ. मंजिरी अनिरुद्ध ओक, (५६) अनिरुद्ध भिकाजी ओक, (५७) दिलीप मुकुंदराव वुटी, (५८) रवि शंकरराव डिघे, (५९) आनंद सूर्यकांत जैस्वाल, (६०) विनायक बालाजी वुटी, (६१) सौ. वासंती विनायक वुटी; (६२) अशोक व्यंकटेश मनोहर, (६३) अनिल रामकृष्ण नाईक, (६४) सौ. वासंती अनिल नाईक; (६५) सौ. वर्षा शशांक मनोहर, (६६) सौ. माधवी मधुसूदन भांवूरकर, (६७) सौ सिंधु श्रीधर बक्षी, (६८) श्रीधर दिवाकर बक्षी, (६९) सुनील व्यंकटेश मनोहर, (७०) रघुवीर खंडेराव जोशी, (७१) यशपाल (पाशा) वल्लभ रामावत, (७२) रमेश लक्ष्मण जोशी, (७३) स्नेहेंदुनाथ सान्याल, (७४) डॉ. विजय मोरेश्वर देशपांडे, (७५) हरीश अडयाळकर, (७६) डॉ. अनुराधा अरूण आगाशे, (७७) सुरेश रामभाऊ तापस, (सर्व नागपूर) (७८) निशिकांत लक्ष्मण पिपळापुरे (माजिवडे) (७९) विनय रामचंद्र दातार, (डोंबिवली पूर्व), (८०) [illegible] रत्नाकर ओक (ठाणे),

श्रीशिवाजी हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. नवघरे हे होते. प्रास्ताविक भाषण शाखेचे अध्यक्ष श्री. अरविंद सराफ यांनी केले.

परिसंवादांत डॉ. बिडवई, श्री. उमाळकर, श्री. जे. एल. दिनोरे, श्री. के. राम आखाडे, सौ. कमल सावजी, श्री. सरदार, श्री. बोंडगे, श्री. जोशी, श्री. कुळकर्णी, इत्यादी वक्त्यांनी भाग घेतला. तसेच अंजली पिंपरकर, कु. राखी, सावजी व सारंग उमाळकर ह्या विद्यार्थ्यांनीसुद्धा हजेरी लावली. आजच्या खालावलेल्या दर्जाला शासन, समाज, शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालकवर्ग व स्वत: विद्यार्थी जबाबदार असल्याचे प्रतिपादन प्रत्येक वक्त्याने केले. कार्यक्रम बराच वेळ चालला. कार्यक्रमाचे संचालन सचिव श्री. शिंगणे यांनी, तर आभारप्रदर्शन श्री. व्यवहारे यांनी केले. वरील प्रश्नावर विचारमंथन घडवून आणल्याबद्दल शाखेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जवाहरनगर : जवाहरनगर, आयुध निर्माणी, भंडारा, येथे नव्यानेच वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्यात आली. अस्थाई कार्यकारिणीत अध्यक्ष–प्रा. मधुकर गोविंदराव कणेर, उपाध्यक्ष–१. डॉ. चंद्रमोहन गुप्ता, २. श्री. माधव नत्थुजी ब्राम्हणकर, कार्यवाह–श्री. हिरामण तुळशीराम लांजे, सहकार्यवाह १. श्री. श्रीपाद जयकृष्ण नवरे, २. श्री. रूपरेशन उरकुडाजी रोटके, कोषाध्यक्ष श्री. संजीव अनंत सावरगांवकर, सदस्य सर्वश्री महाजन, नाकाडे, दक्षिणकर व हजारे.

उमरखेड : शाखेतर्फे शैक्षणिक क्षेत्रातील एक मान्यवर व्यक्तिमत्व, महाराष्ट्रातील व्यासंगी विचारवंत व सुप्रसिद्ध वक्ते प्रा. के. मा. मुन्शी ह्यांचे निधनाबद्दल शोकसभा घेऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

बुलढाणा : वार्षिक आम सभा दिनांक ६–७–८५ रोजी पार पडली. पुढील वर्षासाठी नवीन कार्यकारिणी एकमताने निवडून आली. अध्यक्ष श्री. गो. या. सावजी, उपाध्यक्ष अॅड्. सुधीर दामले, सचिव–पद्माकर काळकर, सहसचिव–श्रीपाद जोशी, कोषाध्यक्ष–श्री. रंगनाथ गायकवाड, कार्यक्रम प्रबंधक श्री. शंकर कऱ्हाडे, सदस्य सर्वश्री मधु इंगळे, वसंत गायकवाड, जे. एस. धांडे, गणेश हिंगे, करदळे, मुंधडा, म. पु. धोपे.

दिनांक १–८–८५ रोजी शाखा व अ. भा. मातंग समाज ह्यांच्या वतीने टिळक पुण्यतिथी व शाहीर अण्णाभाऊ साठे जयंती अॅड्. ढगे ह्यांचे अध्यक्षतेखाली झाली. ह्याप्रसंगी प्रमुख वक्ते प्राचार्य चव्हाण व प्रा. कुल्ली ह्यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन श्री. पद्माकर काळकर ह्यांनी केले.

३. दिनांक ४–८–८५ रोजी मासिक सभा होऊन त्यात कै. के. एम्. मुन्शी ह्यांना श्रद्धांजली वाहिली.

धामणगांव : दिनांक २४–७–८५ रोजी दुपारी ४ वाजता आदर्श महाविद्यालय, धामणगांव-रेल्वे येथे सभासदांच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते वि. सा. संघाची शाखा स्थापन करून खालील कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष प्रा. वा. द. महात्मे, उपाध्यक्ष १. श्री. ललित सोनोने २. श्री. संदीप देशमुख, सरचिटणीस–प्रा. सुखदेव ढाणके, चिटणीस १. श्री. अरूण लोहे २. श्री. भाऊ शेंदरे, ३. श्री. चेतनकुमार कोठारी, कोषाध्यक्ष–श्री. सुहास काटेकर, कार्यकारी सदस्य–सर्वश्री अण्णासाहेब घोडे, प्रा. शिरीष पाटील, सौ. गीता वाघमारे, श्री. गजानन देशमुख, काळे, तिवारी, व. चे. पसारी, सल्लागार मंडळ–सर्वश्री प्रा. सुभेदार, श्रीखंडे, वाघमारे, देशपांडे, डॉ. उजवणे, वानखेडे, जगताप व करकरे.

वणी : शाखेची सर्वसाधारण सभा दि. २४–७–८५ ला श्रीकृष्ण भुवनमध्ये पार पडली आरंभी प्रा. के. मा. मुन्शी ह्यांना मूक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नूतन सत्राकरिता खालील कार्यकारिणी अविरोध निवडल्या गेली. कार्याध्यक्ष श्री. दादासाहेब हूड, उपाध्यक्ष श्री. अनंतराव ढुमणे,

कोषाध्यक्ष श्री. रतीलाल जयस्वाल, चिटणीस-माधव सरपटवार, सरचिटणीस-श्री. कृष्णा लाडसे, कार्यक्रम प्रमुख प्रा. गुलाब भेंडोडकर, सदस्य सर्वश्री अ‍ॅड्. ढुमे, अ‍ॅड. कोंडावार, गोरकर, मुत्रावे, पाटील, सोनटक्के, खोडे गुरुजी व विवेक सरपटवार, केंद्राध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सभा पार पडली.

तिरोडा : दिनांक ११-७-८५ रोजी शाखेचे अध्यक्ष प्राचार्य गो. मो. कोलते यांचे अध्यक्षते-खाली कार्यकारी मंडळाची सभा पार पडली. सभेत ८५-८६ या वर्षात कोणते कार्यक्रम घेण्यात यावे यावर चर्चा व ठराव झाले. शाखेचे सभासद श्री. गो. मा. जोशी यांना नुकतीच इतिहास विषयात पीएच. डी. मिळाल्याबद्दल कार्यकारिणीने त्यांचे अभिनंदन केले.

नवीन मान्यता प्राप्त शाखा

१. धामणगाव (जि. अमरावती).

२. चिखलदरा (जि. अमरावती).

नवीन आजीव सभासद

(१) सुधीर प्रल्हाद जोशी, (२) टी. एन. सिध्रा, (३) सौ भारती जयंत सुरामे; (४) मनोहर माधवराव ढोक, (५) डॉ सौ. यामिनी दिगंबर आळशी, (६) सुरेश घडयाळपाटील, (७) अ‍ॅड्. पराग लुले, (८) उदयन ब्रह्म, (९) डॉ. सुनील पारसे, (१०) सुनील टकले, (११) विवेक देवपुजारी, (१२) नारायण त्रिवेदी, (१३) रामभाऊ झंझाड, (१४) सौ. रोहिणी सावदेकर, (१५) श्यामकांत फडणीस, (१६) राजीव चिमोटे, (१७) दीपक जोशी. (१८) प्रभाकर चाफेकर, (१९) सुधीर देव, (२०) अ‍ॅड्. अनिल खेडीकर, (२१) अ‍ॅड्. विलास निल्लावार, (२२) अनिल शर्मा, (२३) डॉ. रूपा कुळकर्णी, (२४) श्रीपाद भालचंद्र जोशी, (२५) अ‍ॅड्. अविनाश गुप्ता, (२६) अ‍ॅड्. प्रमोद पाठक, (२७) बलवंत (बाळ) जनार्दन कुळकर्णी, (२८) तुकाराम नामदेव पाटील, (२९) सौ. अनुया अरुण आपटे, (३०) सौ. चित्रा रमेश अंभईकर, (३१) सौ. स्मीता उल्हास केळकर, (३२) सौ. स्वप्ना विनय वैद्य, (३३) सौ. संध्या सतीश सहस्रबुद्धे, (३४) सौ. मीनल दिलीप वाईकर, (३५) नरेश खंडेराव जोशी, (३६) विजय शरच्चंद्र देशपांडे, (३७) सौ वैशाली जयंत चितळे, (३८) अनिलकुमार वैद्य. (३९) दिलीप मुळे, (४०) सौ. शोभा सुधीर आपटे, (४१) सौ. मृणाल पुराणिक, (४२) चंद्रकांत कुळकर्णी, (४३) प्रबोधचंद्र देशमुख, (४४) सौ. कल्याणी देशमुख, (४५) अ. म. मांजरखेडे, (४६) सुधाकर र. लोखंडे, (४७) सौ. सुनंदा विजय नारळे, (४८) शक्तीकुमार मदनलाल संचेती, (४९) सौ. विजया शक्तीकुमार संचेती, (५०) मोरेश्वर (बाळ) गजानन मंगरूळकर; (५१) अशोक शंकरराव मगरकर, (५२) सौ. ज्योत्स्ना धर्माधिकारी, (५३) सौ. प्रतिभा कुळकर्णी, (५४) कु. तनुजा मधुसूदन भांबुरकर, (५५) सौ. मंजिरी अनिरुद्ध ओक, (५६) अनिरुद्ध भिकाजी ओक, (५७) दिलीप मुकुंदराव वुटी, (५८) रवि शंकरराव विघ्ने, (५९) आनंद सूर्यकांत जैस्वाल, (६०) विनायक बालाजी वुटी, (६१) सौ. वासंती विनायक वुटी; (६२) अशोक व्यंकटेश मनोहर, (६३) अनिल रामकृष्ण नाईक, (६४) सौ. वासंती अनिल नाईक; (६५) सौ. वर्षा शशांक मनोहर, (६६) सौ. माधवी मधुसूदन भांबूरकर, (६७) सौ सिंधु श्रीधर बक्षी, (६८) श्रीधर दिवाकर बक्षी, (६९) सुनील व्यंकटेश मनोहर, (७०) रघुवीर खंडेराव जोशी, (७१) यशपाल (पाशा) वल्लभ रामावत, (७२) रमेश लक्ष्मण जोशी, (७३) स्नेहेंदुनाथ सान्याल, (७४) डॉ. विजय मोरेश्वर देशपांडे, (७५) हरीश अडयाळकर, (७६) डॉ. अनुराधा अरूण आगाशे, (७७) सुरेश रामभाऊ तापस, (सर्व नागपूर) (७८) निशिकांत लक्ष्मण पिंपळापुरे (माजिवडे) (७९) विनय रामचंद्र दातार, (डोंबिवली पूर्व), (८०) [illegible] रत्नाकर ओक (ठाणे),

(८१) सुरेश रामकृष्ण चुनेकर, (८२) डॉ. दत्तात्रय दिनकर पुंडे, (८३) डॉ. सौ. अंजली अरुण सोमण, (८४) डॉ. कल्याण वासुदेवराव काळे (सर्व पुणे) (८५) दामोदर सीताराम शिवनकर, (८६) तातोबा हगरूजी भुरे, (८७) खुशाल नत्थुजी मोटघरे, (सर्व लाखनी) (८८) नरेंद्रकुमार मथुरादासजी बरडीया, (राजूर, जि. अमरावती) (८९) डॉ. प्रभा दत्तात्रय अत्रे, माहीम, मुंबई, (९०) शरद काशीराम कळणावत, (९१) अशोक नारायणराव राणा, (९२) रमाकांत काशीनाथ कोलते, (सर्व यवतमाळ).

□ □

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

YUGWANI : Regd. No. NGP 275
युगवाणी, जुलै / ऑगस्ट १९८५, मूल्य : सहा रुपये

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर १२.
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १२.
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर वैद्य, मधुकर आर्टस्, धनतोली, नागपूर १२.

अनुक्रमणिका